SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, २६ डिसेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ५० | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### चिनी कंपन्यांची अंबानींसोबत भागीदारी

**नवी दिल्ली :** चिनी कंपन्या भारतात येण्याचे मार्ग शोधत आहेत. त्यांना थेट प्रवेश मिळत नसल्याने त्यांना भारतीय कंपन्यांच्या माध्यमातून भारतात व्यवसाय करावा लागत आहे. मुकेश अंबानींच्या रिलायन्स रिटेल, इपॅक ड्युरेबल्स, डिक्सन टेक्नॉलॉजीसारख्या कंपन्यांसोबत चिनी कंपन्या भारतात आपला जम बसवत आहेत. चीनची फॅशन ब्रॅण्ड कंपनी शीन पुन्हा भारतात परतली आहे. अंबानींच्या रिलायन्स रिटेल या कंपनीसोबत चीनने आपला व्यवसाय सुरू केला आहे.

### कंपनीकडून कर्मचाऱ्यांना कार, बाईकची भेट

**चेन्नई :** अनेकदा कंपन्या आपल्या कर्मचाऱ्यांना दिवाळीत भेटवस्तू देतात. चेन्नईतील एका कंपनीने नाताळाच्या निमित्ताने आपल्या कर्मचाऱ्यांना कार आणि बाईकसारख्या महागड्या वस्तू भेट म्हणून दिल्या आहेत. सर्माऊंट लॉजिस्टिक सोल्युशन्स प्रा. लि. असे या कंपनीचे नाव असून, त्यांच्या वतीने कर्मचाऱ्यांना टाटा कार आणि रॉयल एनफिल्ड मोटारसायकल भेट म्हणून दिल्या आहेत. दिलेले लक्ष्य पूर्ण करण्यासाठी एकूण २० कर्मचाऱ्यांना ही महागडी भेट देण्यात आली.

### संसदेबाहेर तरुणाचा आत्मदहनाचा प्रयत्न

**नवी दिल्ली :** दिल्लीतील नवीन संसद भवनाजवळील रेल्वे इमारतीसमोर बुधवारी दुपारी एका व्यक्तीने स्वतःला पेटवून घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेत तरुण गंभीर भाजला आहे. दिल्ली अग्निशमन सेवा अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, दुपारी ३.३५ वाजता कॉल आला. यामध्ये तरुणाने स्वतःला पेटवल्याचे सांगण्यात आले. आम्ही एक वाहन घटनास्थळी पाठवले होते. संसदेच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्या व्यक्तीला राम मनोहर लोहिया (आरएमएल) रुग्णालयात दाखल केले. त्याची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी पोहोचले त्यांना तेथे पेट्रोल, जळालेली पिशवी आणि बूट सापडले. तरुणाने ज्या ठिकाणी स्वतःला पेटवून घेतले त्या ठिकाणी बॅरिकेडिंग करण्यात आले आहे. सध्या तरुणाची माहिती समोर आलेली नाही.

### रशियातील मौलानांनी मागे घेतला चार बायकांचा फतवा

**मॉस्को :** रशियातील एका सर्वोच्च इस्लामिक संघटनेने मुस्लिम पुरुषांना चार बायका ठेवण्याची परवानगी देणारा वादग्रस्त फतवा मागे घेतला आहे. १७ डिसेंबर रोजी इस्लामिक बॉडीने फतवा जारी करून एकापेक्षा जास्त महिलांशी लग्न करण्याची परवानगी मागितली होती. यामध्ये पत्नीची तब्येत खराब असेल किंवा वृद्ध असेल, तर पुनर्विवाहाला परवानगी होती. फतव्यात म्हटले होते की, पुरुषाला चार बायका असू शकतात, जर त्याने सर्व बायकांना समान वेळ आणि दिलासा दिला असेल. दस्तऐवजात सर्व पत्नींना न्याय्य किंवा समान वागणूक देण्याच्या अटी देखील समाविष्ट आहेत. यावर देशभरातून टीका होत होती.

# दोन दिवस गारपिटीची शक्यता

**मुंबई, २५ डिसेंबर**

राज्याच्या हवामान खात्याने २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे याभागातील शेतकऱ्यांनी याची दखल घेऊनच शेतीचे नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

२७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वप्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहल्यानगर जिल्ह्यासह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल. यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यताही वर्तविण्यात आली आहे.

२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. *(तभा वृत्तसेवा)*



भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी जन्मशताब्दी समारंभाचे औचित्य साधून बुधवारी नागपूर येथे विदर्भातील भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांचा आणि मंत्र्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार केल्यानंतर फडणवीस यांनी वाकून नमस्कार करीत केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून आशीर्वाद घेतला. यावेळी व्यासपीठावर माजी राज्यसभा सदस्य अजय संचेती, आमदार चैनसुख संचेती, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, प्रदेश भाजपाचे अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कामगार मंत्री आकाश फुंडकर प्रामुख्याने उपस्थित होते

# सेवा म्हणून शाळा चालवणे व्रत

**सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन** | **सन्मित्र सैनिकी शाळेचा वार्षिकोत्सव उत्साहात**




**चंद्रपूर, २५ डिसेंबर**

शाळा चालवणे सोपे काम राहिले नाही. शिक्षण व आरोग्य या दोन्ही गोष्टी आता महाग झाल्या आहेत. त्यातही काही जण पैसा कमवण्यासाठी शाळा चालवतात. सेवा म्हणून शाळा चालवणे हे व्रत आहे. व्रत हे नेटाने आणि तेवढ्याच निष्ठेने चालवावे लागते. सन्मित्र सैनिकी शाळा तसा प्रयत्न करीत आहे ही आनंदाची आणि अभिनंदनाची गोष्ट आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी येथे केले.

बुधवारी सकाळी येथील सन्मित्र सैनिकी शाळेच्या ३० व्या वार्षिकोत्सवाप्रसंगी सरसंघचालक संबोधित करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सन्मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. परमानंद अंदनकर, सचिव ॲड. नीलेश चोरे, शाळेच्या प्राचार्य अरुंधती कावडकर, कमांडंट सुरेंद्रकुमार राणा व्यासपीठावर उपस्थित होते.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत म्हणाले, सेवा म्हणून शाळा चालवणे ही केवळ शाळा व्यवस्थापनाचीच जबाबदारी नाही, तर ती समाजाचीही आहे. पोट भरण्यासाठी शिक्षण हे संकुचित व्याख्या झाली. शिक्षणाचा खरा उद्देश मनुष्य विचारशील व्हावा हा आहे. सुबुद्धी देणारे, संवेदना निर्माण करणारे शिक्षण हवे. दुसऱ्याचा विचार करायला लावणारे शिक्षण हवे. स्वतः शिकून आपल्या कुटुंबाचे जीवन उन्नत करणाऱ्याला चांगले मानले जाते. कुटुंबासोबतच गावासाठी धावपळ करणाऱ्याला त्यापेक्षा जास्त मान दिला जातो. आपल्या देशासाठी कार्यरत राहिलेल्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी होते आणि जो अवघ्या जगासाठी झटतो त्याला साष्टांग नमस्कार घातला जातो. स्वामी विवेकानंदांसारखे जीवन असेल तर ते सार्थकी लागते, असे विचार त्यांनी मांडले.

प्रास्ताविक ॲड. नीलेश चोरे यांनी, तर संचालन व आभारप्रदर्शन अरुंधती कावडकर यांनी केले. यावेळी रा. स्व. संघाचे प्रांत संघचालक दीपक तामशेट्टीवार, जिल्हा संघचालक तुषार देवपुजारी, तालुका संघचालक लक्ष्मण ओलालवार, नगर संघचालक ॲड. रवींद्र भागवत, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, डॉ. मुकुंद अंदनकर, डॉ. प्रवीण पंत यांच्यासह जिल्ह्यातील गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

# रालोआतील समन्वय-सहकार्य वाढवण्यावर चर्चा

### जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी बैठक

**नवी दिल्ली, २५ डिसेंबर**

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या निवासस्थानी बुधवारी रालोआतील नेत्यांची बैठक झाली. रालोआतील घटक पक्षात समन्वय आणि सहकार्य वाढवण्यावर या बैठकीत चर्चा झाल्याचे समजते.

या बैठकीला नड्डा यांच्याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, जदएसचे एच. डी. कुमारस्वामी, जदयूचे राजीवरंजनसिंह उपाख्य ललनसिंह, हिंदुस्थान अवाम् मोर्चाचे जितनराम मांझी, लोकजनशक्ती पक्षाचे चिराग पासवान, शिवसेनेचे प्रतापराव जाधव, अपना दलाच्या अनुप्रिया पटेल, निषाद पक्षाचे संजय निषाद यांच्यासह रालाआेतील अन्य पक्षाचे नेते उपस्थित होते.

काँग्रेसने गेल्या काही महिन्यांत संविधानाचा मुद्दा लावून धरला आहे. भाजपावर विशेषत: मोदी सरकारवर संविधान बदलवण्याचा आरोप करणाऱ्या काँग्रेसने आतापर्यंत कितीवेळा संविधानाचे उल्लंघन केले, याचा पाढा अमित शाह आणि नड्डा यांनी वाचला. काँग्रेसच्या संविधानसंदर्भातील खोट्या प्रचाराला रालोआतील सर्व पक्षांनी बळी त पडता चोख प्रत्युत्तर देण्याची आवश्यकता शाह यांनी बैठकीत व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या कथित अवमानावरून काँग्रेस देशातील जनतेची दिशाभूल करीत आहे, मात्र शाह यांनी असे कोणतेही विधान केले नाही, याकडे लक्ष वेधत काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांच्या अपप्रचाराला रालाआेतील घटक पक्षांनी बळी पडू नये, असे आवाहनही यावेळी भाजपातर्फे करण्यात आले. जनता तसेच खासदारांच्या मनात यासंदर्भात जो संभ्रम आहे, त्याचे निराकरण एक कॅबिनेट आणि एका राज्यमंत्र्याने देशभर केले पाहिजे, असे ते म्हणाले. मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे आवाहनही करण्यात आले.

रालोआची ही नियमित स्वरूपाची बैठक असल्याचे समजते. रालोआच्या मागील बैठकीत दरमहिन्यात किमान एकवेळा रालोआची बैठक घेण्याचे ठरवण्यात आले होते. मात्र, महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणुकीमुळे अशी बैठक झाली नव्हती.

**दिल्ली-बिहार निवडणुकीवर चर्चा**

दिल्ली आणि बिहार विधानसभा निवडणुकीच्या मुद्यावर तसेच 'एक देश, एक निवडणूक' या मुद्यावरही यावेळी चर्चा झाल्याचे समजते. महाराष्ट्र आणि हरयाणा विधानसभा निवडणुकीत रालोआतील घटकपक्षांच्या उत्कृष्ट समन्वयामुळे रालोआला विजय मिळाला, याकडे लक्ष वेधण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

### काँग्रेस कार्यसमितीची आजपासून बेळगावात बैठक

**नवी दिल्ली, २४ डिसेंबर,**

काँग्रेस कार्य समितीची द्विदिवसीय विशेष बैठक कर्नाटकातील बेळगाव येथे गुरुवारपासून होत आहे. महात्मा गांधींनी काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्याला १०० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

अमित शाह यांनी राज्यसभेतील भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या केलेल्या कथित अवमानाचा मुद्दा लावून यावर मोदी सरकारला घेरण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. मोदी सरकारला घेरण्याच्या व्यूहरचनेला या बैठकीत अंतिम रूप दिले जाणार आहे. २७ डिसेंबरला काँग्रेसने बेळगाव येथे जाहीर सभा आयोजित केली आहे. या सभेचे नाव 'जय बापू, जय भीम आणि जय संविधान' असे ठेवण्यात आले आहे. डॉ. आंबेडकर यांच्या सन्मानार्थ काँग्रेस देशातील सर्व जिल्ह्यांत आंबेडकर सन्मान मार्च काढणार आहे, त्याचप्रमाणे अमित शाह यांच्या राजीनाम्याचे मागणीचे निवेदन राष्ट्रपतींना देणार असल्याचे समजते. काँग्रेसच्या २०२५ मधील कृती कार्यक्रमावरही या बैठकीत चर्चा होणार आहे. या बैठकीला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे, काँग्रेस सांसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, महासचिव प्रियांका वढेरा यांच्यासह देशभरातील दोनशे नेते उपस्थित राहणार आहेत.






## संक्षिप्त वृत्त



### साने गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त शामची आई पुस्तक भेट

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सोलापूर महापालिकेत साने गुरुजी यांची जयंती साजरी आली. निमित्ताने ११ अधिकारी व कर्मचाऱ्यांना साने गुरुजी लिखित शाम ची आई हे पुस्तक भेट देण्यात आले. सोलापूर महापालिकेच्या वतीने आज कॉन्सील हॉल येथे साने गुरुजी यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी साने गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक सहाय्यक आयुक्त गिरीष पंडित यांनी केले. याप्रसंगी लकी ड्रॉ मधून नावे काढून ११ अधिकारी व कर्मचारी यांना साने गुरुजी लिखित शामची आई हे पुस्तक भेट देण्यात आले. अतिरिक्त आयुक्त रवि पवार, संदीप कारंजे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. साने गुरुजी यांनी लिहिलेले शामची आई पुस्तक मूल्य शिक्षणाचे भांडार आहे, असे सांगितले. उपायुक्त आशिष लोकरे यांनी साने गुरुजी हे मराठीतले एक श्रेष्ठ गांधीवादी शिक्षक, समाजसुधारक आणि प्रतिभावंत लेखक तसेच विद्यार्थी घडविण्यामध्ये त्यांचे अमूल्य योगदान होते. आभार सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी मानले. यावेळी नगर सचिव प्रवीण दंतकाळे, विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर, महेश क्षीरसागर,नंदकुमार जगदनी,कामगार कल्याण ओमप्रकाश वाघमारे, कर सकलन प्रमुख युवराज गाडेकर, सामान्य प्रसासन विभागाचे रजाक पेंढारी, उद्यान अधिक्षक किरण जगदाळे उपस्थित होते.

### भारतीय कृषक समाजाचे उद्या नारायणगावात अधिवेशन

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

भारतीय कृषक समाजाचे अधिवेशन शुक्रवारी (ता. २७) नारायणगाव (ता. जुन्नर, जि. पुणे) येथील कृषी विज्ञान केंद्राच्या परिसरातील सभागृहात होणार असल्याची माहिती समाजाचे सोलापूर विभाग अध्यक्ष सिद्धेश्वर जोकारे यांनी दिली. भारतीय कृषक समाजाचे संस्थापक अध्यक्ष, देशाचे पहिले कृषी राज्यमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जयंती सोहळाही साजरा करण्यात येणार आहे. या अधिवेशनात राज्यातील शेतकरी हितासाठी कृषक समाजाचे कार्य व पुढील रूपरेषा ठरणार आहे. कृषक समाजाकडून राज्यातील शेती व शेतीशी संलग्न व्यवसायांत उत्कृष्ट कार्य केलेल्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते कृषिरत्न, कृषिभूषण, कृषी उद्योग भूषण, जलरत्न आदी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्णबीर चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली अधिवेशन होणार असून यावेळी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शेतकऱ्यांसाठी एफ.पी.ओ., सेंद्रीय शेती या विषयांसह महिला बचत गट, युवा व युवती उद्योजक यांना मार्गदर्शन केलेजाणार आहे. या अधिवेशनास राज्यभरातील शेतकऱ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जोकारे यांनी केले आहे. यावेळी समाजाचे राज्य अध्यक्ष डॉ. सुभाष नलांगे, महिला आघाडीच्या अध्यक्ष स्वाती बोरीकर आदी उपस्थित होते.



### सेवासदन प्रशालेत राष्ट्रीय गणित दिन साजरा

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सेवासदन प्रशालेत गणित दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दयानंद शिक्षणशास्त्र महाविद्यालयचे प्रा. किसन शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी गणित दिनाबद्दल शाळेतील विद्यार्थिनी हर्षदा आवारे हिने माहिती सांगितली तर गायत्री पाटील हिने गणितातील गमती जमती आणि पाढे तयार करणे याविषयी माहिती प्रात्यक्षिकासहित दाखवली. आर्या सुरडे हिने गणितीय गोष्ट सांगितली. गणितज्ज्ञ दत्तात्रय कापरेकर आणि शरदचंद्र श्रीखंडे यांच्याविषयी अल्फिया मुलाणी हिने माहिती सांगितली. त्यांना गीतांजली पेशवे आणि रूपाली पवार यांनी मार्गदर्शन केले. गणितीय गाणे नम्रता चव्हाण, तन्वी बाबर, श्रावणी पाटील, भाग्यलक्ष्मी दोडमणी यांनी सादर केले. त्यांना संगीत शिक्षक विलास कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. गीतांजली पेशवे आणि रूपाली पवार यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, सतीश घंटेनवरु उपस्थित होते.

### पूर्व वैमनस्यातून मारहाण करणाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

पूर्व वैमनस्यातून फरशीच्या तुकड्याने मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत जुनेद अब्बास तांबोळी (वय ४३, रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सद्दाम नालवार, जैनोद्दीन नालवार, फयाज कोसगीकर, महेबुब कोसगीकर (रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ६ डिसेंबर रेजी सायंकाळी जुनेद तांबोळी व त्यांचा भाचा अझरोद्दीन हे नमाज पठण करून परत येत होते. त्यावेळी झी हॉटेलसमोरील लब्बैक कट्टा येथे आल्यानंतर सद्दाम नालवार व इतर आरोपींनी येऊन मागील भांडणाचा राग मनात धरून जुनेद यांस फरशीच्या तुकड्याने तसेच विटांनी मारहाण केली. यावेळी अझरोद्दीन यास देखील मारहाण करून जखमी करण्यात आले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बामणे पुढील तपास करीत आहेत.

### भवानी पेठेतून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

शहरातील भवानी पेठेतील मस्के बिल्डींग येथे हॅन्डल लॉक करून ठेवलेली ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत ऋषभ संजय हरिया (वय ३०, रा. मस्के बिल्डींग, भवानी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऋषभ हरिया याने त्याची एमएच १३ डीसी २०६४ क्रमांकाची दुचाकी २२ डिसेंबर रोजी रात्री मस्के बिल्डींग येथे हॅन्डल लॉक करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार आरेनवरू पुढील तपास करीत आहेत.

# बाजार समितीच्या निवडणुकीला हिरवा कंदील?

## ● जुन्याच मतदार याद्यांवर घेणार निवडणूक?; निवडणूक कार्यालय घेणार लवकरच अंतिम निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक संपन्न झाल्यानंतर आता, स्थानिक स्वराज्य संस्था, महापालिका, नगरपालिका तसेच बाजार समिती निवडणूकीचे वेध लागलेले आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणुकीची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार सर्व कामकाज देखील सुरू करण्यात आले होते. परंतु विधानसभा निवडणुकीमुळे सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणूकीला शासनाने स्थगिती दिली होती.

आता या स्थगितीला देण्यात आलेली ३१ डिसेंबर २०२४ पर्यंतची मुदत संपुष्टात येत आहे. त्यामुळे बाजार समितीच्या निवडणूकीचा पुढील प्रारुप कार्यक्रम तयार करुन लवकरच सहकार निवडणूक प्राधिकरणाला पाठविण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. प्राधिकरणाने मंजूरी दिल्यानंतर बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया सुरु होणार आहे. त्यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार हालचाली सुरू झालेल्या दिसत आहेत.

दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात भाजपचे आ.विजयकुमार देशमुख, आ.




सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे हे चार आमदार आहेत. पूर्वी विजयकुमार देशमुख हे सभापती होते. त्यानंतर बाजार समितीमध्ये प्रशासकराज सुरू झाला. प्रशासकांच्या काळात निवडणुकीचे पडघम वाजण्यास सुरुवात होईल. त्यामुळे भाजपाने ही निवडणूक आता स्वबळावर लढण्याची तयारी सुरु केली आहे. काँग्रेस नेत्यांनीही विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव पत्करल्यानंतर बाजार समितीची निवडणूक मनावर घेतलेली दिसत आहे. दरवेळेस प्रमाणे काँग्रेसकडून सुरेश हसापुरे हे बाजार समितीचे किंगमेकर ठरणार का? का, दक्षिणचे माजी आमदार दिलीप माने हे मार्केट यार्डचे किंगमकर ठरणार याकडे देखील सर्व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. त्यामुळे या निवडणुकीत माजी आमदार दिलीप माने यांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत जवळपास ५ हजार ४७० मतदारांची नोंदणी झालेली आहे. तर यामध्ये सर्वाधिक मतदार १२७६ हे व्यापारी मतदारसंघात आहेत, तर त्या पाठोपाठ हमाल तोलार मतदारसंघात १ हजार ८५ आहेत. त्यानंतर विकास कार्यकारी सोसायटी मतदारसंघात दक्षिण सोलापूर तालुक्यात १ हजार ३९ मतदार आहेत. तर उत्तर सोलापूर तालुक्यात ६६३ मतदार आहेत. विकास कार्यकारी सोसायटी मतदारसंघातील ११ जागेवर मात्र सुरेश हसापुरे आणि माजी आमदार दिलीप माने यांचाच दबदबा कायम राहणार असल्याचे सांगण्यात येते. हमाल तोलार, व्यापारी मतदारसंघातही भाजपा कमाल करण्याची शक्यता आहे. विकास सोसायटी मतदारसंघात मात्र हसापुरे आणि माने बाजी मारतील त्यामुळे काँग्रेसच्या पॅनलमध्ये कोण असणार? भाजपा बरोबर कोण जाणार? का गत वेळेप्रमाणे सुभाष बापू यांना शह देण्यासाठी, एकत्रित येऊन पॅनल करणार ? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. भाजप आणि काँग्रेस पक्षांतर्गत यावर साधक बाधक चर्चा सुरू असून, या चर्चेनंतरच बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीचे भवितव्य अवलंबून असणार आहे.

### जुनीच मतदारयादी अंतिम राहणार ?

यापूर्वी १ जुलै २०२४ ही अहर्ता दिनांक लक्षात घेवून निवडणूक अधिकाऱ्यांनी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी ५ हजार ४७० मतदारांची यादी जाहीर केली होती. त्यापैकी अनेक मतदार अपात्र अथवा मयत असण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदारयादी पुन्हा करण्याची मागणी काहीनी केली होती. मात्र निवडणूक कार्यक्रम जरी जाहिर झाला तरी मतदारयादी तीच अंतिम राहणार असल्याचा निर्वाळा निवडणूक कार्यालयाच्या वतीने देण्यात आला आहे. मात्र जोवर निवडणुकीचा प्रारूप कार्यक्रम जाहीर होत नाही तोपर्यंत यावर बोलणे अंतिम असणार नाही असेही सांगण्यात येत आहे. तसेच ३१ डिसेंबर नंतर पुन्हा या निवडणूकीचा कार्यक्रम सुरु होणार आहे. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांनी वरिष्ठांना याबाबत विचार केल्याची चर्चा आहे. पुढील कार्यक्रम ठरवून लवकरच त्याची घोषणा होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# १ जानेवारीला जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे बुधवार दि. १ जानेवारी २०२४ रोजी शिवस्मारक सभागृहात कै. अनंतराव कुलकर्णी स्मृती वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

दि. १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक सभागृहात स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. इयत्ता ५ वी ते ७ वी, ८ वी ते १० वी आणि महाविद्यालयीन गट अशा तीन गटांमध्ये ही स्पर्धा होईल. इयत्ता ५ वी ते ७ वी गटासाठी शिवरायांचे बालपण, माझे आवडते पुस्तक, माझी शाळा विद्येचे आणि संस्काराचे मंदिर, मोबाईलचा मी अनुभवलेला चांगला उपयोग हे विषय असणार आहेत. ८ वी ते १० वी गटासाठी मोबाईल व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन, महाभारतातील माझे आवडते व्यक्तिमत्व, वंदे मातरम महामंत्राची १५० वर्षे वृक्षारोपण काळाची गरज, तर महाविद्यालयीन गटासाठी रामायणातील समाज पोषक मूल्ये , जागतिक पटलावर आजचा भारत, स्वातंत्र्य लढ्यातील महापुरुषांची प्रेरणा-महाभारत, बांगलादेशात सध्या काय चालले आहे? हे विषय असणार आहेत.

ही वक्तृत्व स्पर्धा मराठी व हिंदी भाषेत होणार आहे. सर्व स्पर्धकांना या स्पर्धेत विनाशुल्क प्रवेश असून प्रत्येक स्पर्धकास आठ मिनिटांचा वेळ दिला जाईल. या स्पर्धेसाठी प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम मुदत ३० डिसेंबर पर्यंत आहे. प्रत्येक गटातून स्वतंत्र




पारितोषिके दिली जाणार आहेत. प्रथम विजेत्यास ३ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र, द्वितीय विजेत्यास २ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र तर तृतीय विजेत्यास १ हजार रुपये स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल. अधिक माहितीसाठी मल्लिनाथ व्हटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी केले. या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, स्पर्धा प्रमुख प्रसाद जिरांकलगीकर, संचालक धनंजय कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर आदी उपस्थित होते.

# १ हजार ६८४ शेततळ्यांना गतवर्षी ११ कोटी १० लाखाचे अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेद्वारे सोलापूर जिल्ह्यात मागेल त्याला शेततळे ही योजना ऑनलाईन पध्दतीने राबवून २०२३-२४ या आर्थिक वर्षात १ हजार ६८४ शेतकऱ्यांना शेततळ्यासाठी ११ कोटी १० लाख रूपयांचे अनुदान वर्ग करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

जलकोष म्हणून शेतकऱ्यांसाठी शेततळे ही संकल्पना वरदान ठरली आहे. मोठ्या शेततळ्यात मुबलक पाणी बसत असल्याने बोअर्सद्वारेही पाणी या तळ्यात टाकून त्याचा वापर हिवाळी आणि पावसाळी हवामानात शेतकरी करू शकतात. मागेल त्याला शेततळे या योजनेसाठी शेतकरी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करू शकतात. आपल्या जिल्ह्यातील ऑनलाईन पध्दतीने अर्ज केलेल्या २५ हजार ३३१ शेतकऱ्यांचे अर्ज लॉटरी पध्दतीने काढण्यात आले होते. त्यातील योग्य लाभार्थी म्हणून १८६० जणांची ११ तालुक्यातून निवड करून त्यांना खोदाईला पूर्वसंमती देण्यात आली होती. यातील १८ जणांचे तांत्रिक अडचणीमुळे अनुदान पेंडिंग पडले असून, इतर १६८४ जणांना हे अनुदान मिळाले आहे. उर्वरित ८५ जणांचे अनुदान निधीअभावी पेंडिंग आहे. गतवर्षी ११ कोटी १० लाख रूपये लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाले असून, उर्वरित पैसेही लवकरच वर्ग होतील.



### चालू आर्थिक वर्षात ७ हजार ४७० जणांचे अर्ज

मागेल त्याला शेततळे या योजनेसाठी शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला असून, चालू आर्थिक वर्षात (२०२४-२५) मध्ये जिल्ह्यातील ७ हजार ४७० जणांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरले असून, त्यांनाही शेततळे मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा चालू आहे. फळबागा आणि द्राक्षबागांसाठी अशा शेततळ्यांचा मोठा फायदा होतो. जिल्ह्यातील काही बलाढ्य शेतकऱ्यांनी तर स्वत: स्वर्चानेही मोठ-मोठी शेततळी आपल्या शेतात घेतल्याचीही माहिती काही शेतकरी बांधवांकडून मिळाली.

# लिंगायत समाजाचा मंगळवारी वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

चालता बोलता वीरशैव लिंगायत मोफत वधू वर सूचक सोलापूर ग्रुपच्या वतीने लिंगायत समाजाचा राज्यस्तरीय वधु वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष इरण्णा पनशेट्टी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वाजता सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालय येथे हा मेळावा होणार आहे. जय भारत माता सेवा समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री श्री हवा मल्लिनाथ महाराज यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. सचिन कल्याण शेट्टी, श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक राजशेखर पाटील, संचालक शिवानंद पाटील, शिवा बाटलीवाला आदी उपस्थित राहणार आहेत.

या मेळाव्यात वीरशैव स्वामी, लिंगायत समाजातील सर्व जाती, पोट जातीतील इच्छुक वधू वर व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन इरण्णा पनशेट्टी यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेस राघवेंद्र बिराजदार, विश्वनाथ कापसे, बसवंतराव आळगी, बसवराज याबाजी, कार्तिक स्वामी आदीजण उपस्थित होते.

# सारथी अंतर्गत कृषी संलग्न प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाणून घेतल्या सारथी संस्थेच्या अडचणी
- पुणे येथील नव्या इमारतीची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**पुणे, दि. २५ डिसेंबर-**

सारथी संस्थेच्या कृषी संलग्न प्रशिक्षण योजनेचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाला. दरम्यान, कृषी विज्ञान केंद्र बारामती आणि सारथी यांच्यात सामंजस्य करारही करण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री पवार यांनी सारथी संस्थेच्या अडचणी जाणून घेतल्या.



राज्यामधील कृषी विज्ञान केंद्राद्वारे कृषी व कृषी संलग्न प्रशिक्षणे आयोजित करणे या सारथीच्या नव्या योजनेचा शुभारंभ पुणे येथील सारथी कार्यालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाला. या नव्या योजनेच्या प्रारंभासह कृषी विज्ञान केंद्र बारामती आणि सारथी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. उपमुख्यमंत्री पवार यांनी पुणे येथील सारथी संस्थेच्या नव्या इमारतीची पाहणी केली. यावेळी सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर, सारथीचे संचालक मंडळातील कोकाटे, दांगट, पासलकर, व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे (आयएएस) यांच्यासह सारथीचे निबंधक व अन्य अधिकारी यांची उपस्थिती होती. छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अभिवादन केले. सारथीचे अध्यक्ष अजित निंबाळकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वागत केले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सारथी संस्थेच्या कामकाजाची माहिती घेतली. अडीअडचणी व प्रश्न समजून घेत त्यावरील ठोस उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी सारथीच्या लाभार्थी उमेदवारांनी मनोगत व्यक्त केले.

# जिल्ह्यात १ कोटी २७ लाखांचे गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेबाबत योग्य पाठपुरावा करुनही विमा कंपनीच्या कार्यपद्धतीत सुधारणा होत नसल्याने या योजनेमध्ये सुधारणा करुन गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबविण्यास दि. १९ एप्रिल २०२३ च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली आहे. यामध्ये अपघातग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी दोन लाखांचे सानुग्रह अनुदान मिळणार आहे. सोलापूर जिल्ह्यात २०२३ ते नोव्हेंबर २०२४ पर्यंत अशा पध्दतीचे शेतकऱ्यांचे २०० दावे मंजूर केले असून, याद्वारे १ कोटी २७ लाखाचे अनुदान वर्ग केले असल्याची माहिती सोलापूर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून मिळाली तर अजून २ कोटी ७० लाख अनुदानाची मागणी प्रलंबित आहे.



शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात तसेच अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू होतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तीस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होऊन अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघाग्रस्त शेतकऱ्यांस, त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्यासाठी राज्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी ही योजना चालू केली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी रस्ता, रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, जंतूनाशके हाताळतांना अथवा अन्य कारणामुळे विषबाधा, विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरुन पडून झालेला अपघात, सर्पदंश व विंचुदंश, नक्षलाईटकडून झालेल्या हत्या, जनावरांच्या हल्ल्यामुळे, चावण्यामुळे जखमी, मृत्यू, बाळंतपणातील मृत्यू, दंगल व अन्य कोणतेही अपघात अशा या अपघाताचा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातून २०२३-२४ मध्ये प्रलंबित, कार्यवाहीत, जिल्हास्तरीय समितीकडे अपीलाचे प्रस्ताव ७५ होते आणि २०२४-२५ चे २४२ प्रस्ताव दावे प्राप्त होते. अशा एकूण ३१८ दाव्यांपैकी मृत्युचे मंजूर दावे १९४ आणि अपंगत्वाचे ४ दावे असे एकूण २०० दावे मंजूर होवून त्यांना १ कोटी २७ लाखाचा निधी मिळाला आहे. तर यातील नामंजूर विमा दावे २० आहेत, कागदपत्राअभावी ६१ दावे प्रलंबित आहेत तर कार्याहीत ३७ दावे आहेत. यासाठी आयुक्तालयाकडून १२७ कोटीचा निधी वितरीत झाला असून, तो पूर्णत: वाटत शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग झाला आहे. तर अजून २७० कोटीच्या निधीची मागणी करण्यात आली आहे.

**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :** सातबारा उतारा, मृत्यूचा दाखला, शेतकऱ्यांचे वारस म्हणून गाव कामगार तलाठ्याकडील गाव नमुना नं. ६-क नुसार मंजूर झालेली वारसाची नोंद, शेतकऱ्यांच्या वयाच्या पडताळणीसाठी शाळा सोडल्याचा दाखला, आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र तसे ज्या कागदपत्राआधारे ओळख, वयाची खात्री होईल असे कोणतेही कागदपत्रे, प्रथम माहिती अहवाल, स्थळ पंचनामा, पोलीस पाटील माहिती अहवाल, अपघाताच्या स्वरुपानुसार अंतिम विमा प्रस्तावासोबत सादर करावयाची कागदपत्रे इत्यादी.


# सोलापूर स्मार्ट सिटीच्या सीईओपदी गोपीचंद कदम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सोलापूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ)पदी गोपीचंद कदम यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षापासून महापालिकेच्या आयुक्त शितल तेली - उगले यांच्याकडे या पदाचा कार्यभार आहे.



देवेंद्र फडणवीस सरकारकडून राज्यातील १२ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यामध्येच सोलापूर स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी गोपीचंद कदम यांची पदोन्नतीने बदली करण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त म्हणून शितल तेली - उगले यांनी दि. २१ नोव्हेंबर २०२२ रोजी महापालिकेत आपला पदभार घेतला होता. रुजू झाल्यानंतर अवघ्या चारच दिवसानंतर म्हणजे २५ नोव्हेंबर २०२२ रोजी त्यांची स्मार्ट सिटीच्या सीईओ पदीही शासनाने नियुक्ती केली. तत्कालीन सीईओ ढेगळे- पाटील यांच्या जागी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. यामुळे प्रशासक तथा महापालिका आयुक्त आणि सीईओ या पदांची जबाबदारी त्यांच्यावर शासनाने सोपवली. सोलापुरात स्मार्ट सिटी योजना सुरुवातीपासूनच वादग्रस्त ठरली. सत्ताधारी भाजपच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांनीही या योजनेअंतर्गत केलेल्या कामांना विरोध केला. गंभीर आरोपही करण्यात आले होते. या प्रकल्पातील विविध कामे पूर्ण जरी झाली असली तरी निकृष्ट दर्जा असल्याचा आरोप झाला. यापैकी बहुतांश प्रकल्प हे देखभाल दुरुस्ती अभावी बंद असल्याने शहरवासीयांमधून ओरड आहे. शासनाने स्मार्ट सिटीच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नवा अधिकारी नियुक्त केला आहे.



माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या शंभराव्या जयंतीनिमित्त 'सदैव अटल' या त्यांच्या स्मृतिस्थळावर बुधवारी आदरांजली अर्पण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

# कझाकस्तानात विमान कोसळून ४२ प्रवासी ठार

**२२ जण जखमी**

**अपघातापूर्वी मागितली होती इमर्जन्सी लॅण्डिंगची परवानगी**

**◆ मॉस्को, २५ डिसेंबर**

कझाकस्तानमधील अकताऊ येथे बुधवारी सकाळी एक प्रवासी विमान कोसळले. विमानात ६७ प्रवासी आणि चालक दलाचे पाच सदस्य होते. यापैकी २५ जणांना वाचवण्यात यश आले आहे. २२ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या अपघातात ४२ जणांचा मृत्यू झाल्याची भीती आहे. हे विमान अझरबैजानहून रशियाच्या चेचन्या प्रांताची राजधानी ग्रोझनीकडे जात होते. पण, त्याला कझाकिस्तानच्या अकताऊ शहरापासून तीन किमी अंतरावर आपत्कालीन लॅण्डिंग करावे लागले.

दाट धुक्यामुळे विमानाचा मार्ग बदलण्यात आला होता. कोसळण्यापूर्वी विमानाने विमानतळावर काही फेऱ्या मारल्या होत्या. त्यानंतर त्याला आपत्कालीन लॅण्डिंग करावी लागली. अपघातग्रस्त विमान अझरबैझान एअरलाईन्सचे असल्याचे सांगितले जात आहे. समाज माध्यमांवर व्हायरल होणाऱ्या



अपघातानंतर विमानाची अशी अवस्था झाली

व्हिडीओत दिसून येत आहे की, विमान कोसळताच ला आग लागली. लगेचच आग विझवण्यात आली.

**बळीसंख्या वाढण्याची शक्यता**

कझाकिस्तानच्या आपत्कालीन मंत्रालयाच्या माहितीनुसार, या दुर्घटनेत ४२ जण मृत्युमुखी पडल्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही वृत्तसंस्थांच्या मते, या अपघातात ७० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. मात्र, याला अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. अपघातातील बळीसंख्या वाढण्याची शक्यता अधिकाऱ्यांनी वर्तवली.

## ब्राझीलमध्ये दुसरी विमान दुर्घटना

दरम्यान, ब्राझीलमध्ये नुकत्याच झालेल्या दुसऱ्या विमान दुर्घटनेची आठवण या घटनेने करून दिली आहे. रविवारी, ब्राझीलमधील पर्यटकप्रिय ग्रामाडो शहरात लहान विमान कोसळून १० जणांचा मृत्यू झाला होता. हे विमान घराच्या चिमणीला धडकून एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर कोसळले आणि शेवटी मोबाइल दुकानावर आदळले. या दुर्घटनेत १० प्रवासी आणि विमानातील कर्मचारी ठार झाले, तर जमिनीवर असलेल्या १२ हून अधिक जणांना गंभीर दुखापत झाली होती.

**अपघातामागे कमी दृश्यमानतेची शक्यता**

प्राथमिक माहितीनुसार, धुक्यामुळे ग्रोजनी विमानतळावर उतरण्याची परवानगी मिळाली नाही, त्यामुळे त्याला मार्ग बदलावा लागला. मात्र, प्रत्यक्ष दुर्घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अझरबैजान एअरलाईन्सने या दुर्घटनेवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाली होती. हे कारण अपघातामागे असू शकते, असे बोलले जात आहे. *(वृत्तसंस्था)*

# पाकिस्तानचा अफगाणिस्तानात हवाई हल्ला; ४५ ठार

## बदला घेण्याची तालिबानने घेतली शपथ

**◆ इस्लामाबाद, २५ डिसेंबर**

पाकिस्तानने मंगळवारी रात्री अफगानिस्तानच्या पक्तिका प्रांतातील बर्मल जिल्ह्यात हवाई हल्ला केला. यामध्ये महिला आणि मुलांसह ४५ लोक ठार झाले. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. मंगळवारी रात्री केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये लमनसह सात गावांना लक्ष्य केले.

पाकिस्तानी लढाऊ विमानांनी हा बॉम्बहल्ला केला. या हल्ल्यात बर्मलमधील मुर्ग बाजार गाव पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. हवाई हल्ल्यांमध्ये अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला असून, मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला आहे. पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यानंतर या भागातील तणाव आणखी वाढला आहे. प्रभावित भागात मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

तालिबानच्या संरक्षण मंत्रालयाने बर्मलवर पाकिस्तानच्या हवाई हल्ल्यानंतर बदला घेण्याची शपथ घेतली आहे. तालिबानने एका निवेदनात म्हटले की, अफगाणिस्तानला आपली जमीन आणि सार्वभौमत्वाचे संरक्षण करण्याचा पूर्ण अधिकार आहे. या हल्ल्याचा निषेध करताना तालिबानच्या संरक्षण मंत्रालयाने दावा केला की, पाकिस्तानी लढाऊ विमानांनी बॉम्बफेक केलेल्या लक्ष्यांमध्ये वझिरीस्तानचे निर्वासितही होते. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या हवाई हल्ल्याला अधिकृतपणे दुजोरा दिला नसला, तरी पाकिस्तानी लष्कराच्या सांगितले की, हे हवाई हल्ले सीमेजवळील तालिबानच्या ठिकाणांना लक्ष्य करून करण्यात आले. *(वृत्तसंस्था)*

**दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आरोप**

पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील वाढत्या तणावादरम्यान ही घटना समोर आली आहे. पाकिस्तानी तालिबान किंवा तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानने अलिकडच्या काही महिन्यांत पाकिस्तानमध्ये हल्ले वाढवले आहेत. तालिबान या दहशतवाद्यांना अफगाणिस्तानात आश्रय देत असल्याचा आरोप पाकिस्तानने केला आहे. तालिबान संरक्षण मंत्रालयाचे प्रवक्ते इनायतुल्ला खावरजामी यांनी पाकिस्तानच्या दाव्याचे खंडन केले आहे.

## गुटेरस यांची भारतीय शांतिसैनिकांना आदरांजली

**◆ संयुक्त राष्ट्रसंघ, २५ डिसेंबर**

संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी गोलन हाइट्स येथे यूनडीओएफ सोबत सेवा बजावताना हुतात्मा झालेले भारताचे ब्रिगेडियर जनरल अमिताभ झा यांना आदरांजली वाहिली.

संयुक्त राष्ट्रांच्या शांतता राखण्यासाठी त्यांच्या नेतृत्व आणि अटल वचनबद्धतेसाठी ते स्मरणात राहतील. ब्रिगेडियर झा हे संयुक्त राष्ट्रसंघाचे डेप्युटी फोर्स कमांडर म्हणून कार्यरत होते. एप्रिल २०२३ पासून डिसएंगेजमेंट ऑब्झर्व्हर फोर्समध्ये युनडीओएफचे कार्यवाहक फोर्स कमांडर म्हणून काम केले होते. २००५ ते २००६ मध्ये लष्करी निरीक्षक म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या शांतता राखण्यासाठी त्यांचे नेतृत्व आणि अतूट वचनबद्धतेसाठी स्मरण केले जाईल, असे गुटेरस यांनी म्हटले. *(वृत्तसंस्था)*

# छत्तीसगडमधील ६२ फुटांचे माओवादी स्मारक उद्ध्वस्त

**माओवाद्यांचा गड नेस्तनाबूत केल्याचा संकेत**



## छत्तीसगडमध्ये नक्षल विरोधी मोठी कारवाई

**◆ सुकमा, २५ डिसेंबर**

छत्तीसगडच्या बिजापूर आणि सुकमा जिल्ह्यात पोलिस दलाने नक्षल्यांविरोधात मोठी कारवाई केली आहे. बिजापूरमध्ये माओवाद्यांनी उभारलेले ६२ फूट उंच नक्षल स्मारक उद्ध्वस्त करण्यात पोलिसांना यश आले आहे. या माध्यमातून माओवाद्यांचा गढ नेस्तनाबूत केल्याचा संकेत पोलिसांनी दिला आहे.

पोलिस चकमकीत किंवा अन्य कारणाने मारल्या गेलेल्या माओवाद्यांच्या स्मरणात असे स्मारक उभारले जातात. मात्र, हे स्मारक देशातील सर्वात मोठे स्मारक असून, त्याला ध्वस्त करण्यासाठी स्फोटकाचा वापर करण्यात आले आहे. देशात माओवाद संपवण्यासाठी त्या प्रकारे पावले उचलली जात आहे. त्याचेच हे एक उदाहरण आहे. या कारवाईमुळे पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

गडचिरोलीसह महाराष्ट्रात नक्षलवाद्यांची कंबर अक्षरशः तुटली आहे. स्थानिक नागरिकांनी नक्षलवाद्यांना मदत करणे बंद केले आहे. स्थानिक तरुणांना आता बंदुकीपेक्षा विकास प्रकल्प आणि त्याच्यातून निर्माण होणारे रोजगार आकर्षित करीत आहेत. त्यामुळेच गेल्या पाच वर्षांत आम्ही एकही स्थानिक तरुणाला नक्षल दलममध्ये रुजू करून घेऊ शकलो नाही. बंदुकीचा मार्ग चुकीचा असून गोरगरिबांचे रक्षण फक्त संविधानच करू शकतो, त्यामुळे संविधानाचा मार्गच योग्य आहे, अशी प्रांजळ कबुली नक्षली कमांडर राहिलेल्या आणि आत्मसमर्पण केलेल्या माजी कमांडर गिरीधर याने दिली आहे. *(वृत्तसंस्था)*

# राज्यात २७,२८ डिसेंबरदरम्यान गारपीट अन् मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

**शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

येत्या २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला असून, हवामानाचा अंदाज घेवून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेतीचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

२७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि



बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.

२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल. २९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल.

**जनावरे आणि पिकांना सुरक्षित ठेवावे**

यामुळे शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

# तरूणास अडवून रोकड चोरून नेणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल


**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

शहरताल मजरेवाडी परिसरातील विष्णु नगरात तरूणास अडवून त्याच्याकडील ८ हजार ५०० रुपयांची रोकड जबरदस्तीने चोरून नेणाऱ्या चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहन चंद्रकांत थळंगे (वय ३८, रा. बाळ शिवयोगी नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलमान पटेल, बाबर पटेल, सैफन जमादार, जुनैद मुल्ला (रा. विष्णु नगर भाग २, मजरेवाडी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ डिसेंबर रोजी मोहन थळंगे हे रात्री पावणे दहाच्या सुमारास समीर चौधरी यास सोडण्यासाठी विष्णु नगर येथे गेले होते. त्यावेळी सलमान पटेल याने जबरदस्तीने पैसे काढण्यासाठी मोहन थळंगे यांस अडवून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी सलमान याच्या सोबत असलेल्या बाबर, जुनैद व सैफन यांनी आरडा ओरड करून थळंगे यांना मारहाण केली. यावेळी थळंगे यांनी जोरदार आरडाओरड केल्याने आजूबाजूचे लोक जमा झाले व त्यांनी थळंगे यांना सोडविण्यासाठी प्रयत्न केला. त्यावेळी सलमान याने हातात दगड घेऊन लोकांना शिवीगाळ करून याला सोडविण्यासाठी आलात तर त्याला व तुम्हांलापन खल्लास करून टाकण्याची धमकी दिली. सलमान व त्याच्या साथीदारांनी दहशत पसरविल्याने लोक सोडून गेले व आपापल्या घराचे दरवाजे व खिडक्या बंद केला. त्यावेळी बाबर याने थळंगे यांच्या खिशातून रोख ८ हजार ५०० रुपये जबरदस्तीने काढून घेतले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक चंदनशिव पुढील तपास करीत आहेत.

## चित्रपट वार्ता

### बडजात्यांचा 'प्रेम' बदलला



**मुंबई** : सूरज बडजात्या यांच्या अनेक सिनेमांमध्ये सलमान खानने काम केले आहे. परंतु, बडजात्या यांच्या आगामी सिनेमात सलमान खान नव्हे, तर बॉलिवूडमधील एका लोकप्रिय अभिनेत्याला काम करण्याची संधी मिळाली आहे. बडजात्या त्यांच्या आगामी सिनेमामध्ये पुन्हा एकदा कौटुंबिक मनोरंजनात्मक कथानक सर्वांच्या भेटीला घेऊन येणार आहेत. या आगामी सिनेमात भारतीय संस्कृतीच्या मूल्यांना जोडणारी कथा दिसणार आहे. बडजात्यांच्या आगामी सिनेमात सलमान खान नव्हे तर आयुष्मान खुराणा प्रमुख भूमिका साकारताना दिसणार आहे. आयुष्मानला सिनेमाची स्क्रीप्ट खूप आवडली असून, सध्या सिनेमासंबंधी अभिनेता चर्चा करीत आहे. सूरज बडजात्या त्यांच्या आगामी सिनेमाचे चित्रीकरण २०२५ पासून सुरू करणार आहेत. यात अभिनेत्री कोण राहणार, हे मात्र अद्याप गुलदस्त्यातच आहे.

### इम्तियाजच्या सिनेमातून फहादचे हिंदीत पदार्पण



**मुंबई** : मल्याळम, तामिळ सिनेमांमध्ये दिसलेला अभिनेता फहाद फासिलने प्रेक्षकांवर भुरळ घातली. 'आवेशम', 'पुष्पा' या सिनेमांमुळे तो जगभरात प्रसिद्ध झाला आहे. फहाद नुकताच 'पुष्पा-२' मध्येही दिसला. यामध्ये तो व्हिलनच्या भूमिकेत होता. आता त्याच्या बॉलिवूड पदार्पणाविषयी ही माहिती समोर आली आहे. दिग्दर्शक इम्तियाज अलीच्या सिनेमातून फहाद फासिल हिंदीमध्ये डेब्यू करणार आहे. इम्तियाज अलीने स्वत:च ही माहिती दिली. ते म्हणाले, ही घोषणा खूपच आधी झाली. म्हणजे सिनेमा करणारच आहे पण कदाचित लगेच पुढचा सिनेमा तोच नसेल. पण, हो मला बऱ्याच काळापासून हा सिनेमा बनवायचा आहे. याचे नाव 'द इडियट ऑफ इस्तांबुल' असे असणार आहे.

### बलात्काराचा आरोपी कोरिओग्राफरचे कौतुक करून कियारा अडचणीत

**मुंबई** : कियारा अडवाणी लवकरच राम चरणसोबत 'गेम चेंजर' या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट १० जानेवारी २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. नुकतेच या चित्रपटातील 'धोप' हे गाणे प्रदर्शित झाले. दरम्यान, कियाराने तिच्या सोशल मीडियावर या गाण्याच्या डान्स रिहर्सलचा एक व्हिडीओ शेअर केला होता. यात उल्लेख केलेल्या नृत्यदिग्दर्शक मास्टर जानीवर बलात्काराचा आरोप आहे. यानंतर यूजर्स कियारावर भडकले. कियाराने नंतर तिचे कॅप्शन बदलले. खरे तर, कियाराने तिच्या इन्स्टाग्रामवर एका पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते, मला आठवते जेव्हा मी मास्टर जानीची कोरिओग्राफी पाहिली तेव्हा मला आश्चर्य वाटले की आम्ही ते कसे करू, परंतु आमच्या कामाची ही खास गोष्ट आहे की आम्ही नेहमीच काहीतरी करीत असतो- नवीन गोष्टी शिकतो.



# प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांकडून होणार सक्तीची वसुली

**निधी घेतला परंतु घरकूल न बांधणाऱ्या लाभार्थ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सी.ई.ओ यांच्या सक्त सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यात आपले स्वतः चे घर असावे, यासाठी शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून घरकूल हवे म्हणून अर्ज केला. सोलापूर जिल्हा परिषदेने कागदपत्रांची पडताळणी करून तो अर्ज मंजूर केला. घरकूल बांधण्यासाठी पैसे सुद्धा दिले, पण लाभार्थ्यांनी ते घरकूल पूर्णच केले नाही. पैसे घेऊनही घरकूल अपूर्ण ठेवलेल्या लाभार्थ्यांकडून आता घरकुलाचे पैसे वसूल करण्यात येणार आहे.

त्यासंदर्भात ग्रामसेवकांना सीईओंनी अपूर्ण घरकूल पूर्ण करण्यासाठी शेवटचा ईशारा दिला आहे. दरम्यान, सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधीत सोलापूर जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेतंर्गत




घरकूल मंजूर करण्यात आले. जिल्ह्यातील अनेक कुटुंबांनी पोटाची खळगी भरण्यासाठी गाव सोडले आहेत. त्यात घरकूल योजनेच्या लाभार्थ्यांचाही समावेश आहे. वाळू, स्टिल व मजुरीचा दर वाढल्याने शासनाच्या एक लाख २० हजार रुपयांच्या अनुदानात घर बांधणे कठीण झाले आहे. फाउंडेशनसाठी पैसे नाहीत. त्याम ुळे अनेकांनी घरकूलाचे बांधकाम अपूर्ण ठवेले आहेत. बैठकीत सदरचे कारण समोर आले आहे. यावर तात्काळ उपाय योजना करण्याचे आदेश बैठकीत देण्यात आले आहेत.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यासाठी ४४ हजार २२७ घरकूल मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी ३९ हजार १७४ घरकूल पूर्ण झाली असून, ५०५३ घरकूलाचे काम अपूर्ण आहे. अपूर्ण घरकूलांपैकी ज्या ग्रामपंचायतमध्ये १० पेक्षा जास्त घरकूले अपूर्ण असलेल्या ग्रामसेवकांची आढावा बैठक सीईओंनी घेतली.

वास्तविक पाहता, घरकूलाच्या लाभार्थ्यांनी योजना मंजूर झाल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त ९० ते १०० दिवसांत घराचे बांधकाम पूर्ण करणे बंधनकारक आहे. पूर्वी हा कालावधी ३६० दिवसाचा होता, दरम्यान, जिल्ह्यातील लाभार्थ्यांनी पैसे घेऊनही घराचे बांधकाम पूर्ण केले नाही. शासकीय रकमेचा गैरवापर केल्याचा गुन्हा दाखल होऊ शकतो, असेही ग्रामीण विकास यंत्रणेने सांगितले.

**लाभार्थ्यांनी घरकूल पूर्ण करणे बंधनकारक**

सीईओनी घेतलेल्या बैठकीत २६ डिसेंबर २०२४ पर्यंत अपूर्ण घरकूले पूर्ण करण्याच्या सूचना ग्रामसेवक यांना देण्यात आल्या. दिलेल्या मुदतीत काम न करणाऱ्या लाभार्थ्यांवर पैसे वसुलीची कारवाई करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांनी अपूर्ण घरकूल पूर्ण करावे.

**- सुधीर ठोंबरे, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा**

**सोलापूर जिल्ह्यातील अपूर्ण घरकुलाची आकडेवारी**

- अक्कलकोट १३५
- बार्शी ९०
- मोहोळ ११८
- पंढरपूर १४८
- उत्तर सोलापूर ३४
- दक्षिण सोलापूर १७९
- करमाळा २४०
- माढा २१३
- माळशिरस २३७
- मंगळवेढा ६६४
- सांगोला ६६४

## 'सिम स्वॅप'च्या माध्यमातून साडेसात कोटींची फसवणूक

**मुंबई, दि.२५ डिसेंबर-**

सिम स्वॅपच्या माध्यमातून मुंबईतील एका खाजगी कंपनीच्या मालकाची साडेसात कोटी रुपयांनी फसवणूक करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. सिम स्वॅपच्या मदतीने कंपनीच्या बँक खात्यात घोटाळेबाजांना प्रवेश मिळाला आणि त्यांनी अनेक अनाधिकृत व्यवहार केले. काही मिनिटांत पैसे विविध बँक खात्यांमध्ये हस्तांतरित केले.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कंपनी मालकाने सायबर पोलिसांना माहिती दिली. पीडिताने अनाधिकृत व्यवहाराची माहिती देणारा ई-मेलही पाठवला. सायबर गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ संबंधित बँकेच्या नोडल अधिकाऱ्याशी संपर्क साधला आणि त्याच वेळी नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंगवर तक्रार टाकली.

सोलापूर तरुण भारत

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पूर्वसुरींच्या संघर्षाचे स्मरण

लोकमाता स्व. सुमतीताई सुकळीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा सांगता समारोह २४ डिसेंबर २०२४ रोजी नागपुरात पार पडला. या कार्यक्रमात भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ताईंना आदरांजली अर्पण करताना वेगळ्या तारा छेडल्या. त्या तारा होत्या इतिहासाच्या. त्या तारा होत्या ताईंसारख्या भारतीय जनता पार्टीच्या पूर्वसुरींच्या योगदानाच्या, बलिदानाच्या, संघर्षाच्या! भाजपाला आज जे वैभव प्राप्त झाले आहे, ते ताईंसारख्या लोकांनी केलेल्या संघर्षाचे, कष्टाचे फलित होय आणि याची आठवण नव्या पिढीतील भाजपा कार्यकर्त्यांनी ठेवली पाहिजे, त्यांच्या त्यागाप्रति व योगदानाप्रति कृतज्ञ असले पाहिजे, असे या दोन्ही नेत्यांनी उपस्थितांना सांगितले. एका अर्थाने ते 'जरा याद करो कुर्बानी'च्या आशयाचे आवाहन होते. सुमतीताईंच्या निमित्ताने जुन्या अनेक गोष्टींना, घटनांना उजाळा मिळाला. नितीन गडकरी यांनी तर त्या काळाचे शब्दचित्र साऱ्यांपुढे उभे केले. ते म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जनता पार्टीच्या चिन्हावर निवडणूक लढवली गेली तेव्हा नागपुरात अनाऊन्समेंट करायला मी फिरलो. रिक्षावर फिरायला अनेक लोक तयार नसायचे. कारण पार्टीचा रिक्षा दिसला की लोक दगड मारायचे आणि पोस्टर फाडून टाकायचे. पोस्टर्स फाडली जाऊ नयेत म्हणून विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांशी दोस्ती करून त्यांच्या मदतीने उंच ठिकाणी ती लावली जायची. प्रचंड कष्टाचे दिवस होते. जनसंघाबद्दल प्रचंड अपप्रचार झाला होता. पक्षाला आदर नव्हता, सन्मान नव्हता आणि लोकमान्यताही नव्हती. तरीही आमच्यासारख्या छोट्या कार्यकर्त्यांना सोबत घेऊन ताईंनी पक्षाचे काम पुढे नेले. सुमतीताई झोपडपट्टीत जाऊन लोकांची सेवा करायच्या. पक्ष आणि संघटना संकटात असतानाही ताईंनी राष्ट्रकार्य सोडले नाही. सुमतीताई व त्यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी आयुष्यभर संघर्ष सोसला म्हणून आपल्या पक्षाला चांगले दिवस आले आहेत. आज आपल्या पक्षाला, विचारांना जागतिक मान्यता मिळाली आहे. त्याचे श्रेय ताईंसारख्या जुन्या कार्यकर्त्यांना आहे, याची जाणीव नवीन पिढीतील कार्यकर्त्यांनी ठेवणे आवश्यक आहे, असे गडकरी म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही बालपणापासून आत्याच्या स्वरूपात वाट्याला आलेल्या ताईंच्या कार्याचा गौरव करून आपल्या भावना व्यक्त केल्या. एकुणात हा सोहळा जरी सुमतीताईंच्या जन्मशताब्दीच्या सांगतेचा असला तरी भाजपाच्या समस्त कार्यकर्त्यांसाठी नव्य प्रकारचे चिंतन आणि कृतज्ञतेचा सांगावा देणारा होता. ताई चार वेळा निवडणूक लढल्या आणि पराभूत झाल्या. त्यांना निवडणूक लढवण्याची हौस होती म्हणून त्या लढल्या नाहीत. त्यांना पक्ष आणि विचार पुढे न्यायचा होता, यासाठी त्या लढल्या. भाजपाच्या कार्यकर्त्यांनी या निष्ठेचे मर्म समजून घेतले पाहिजे. आता भाजपा हा जागतिक पातळीवर मान्यता पावलेला पक्ष झालेला आहे. दशकभराहून अधिक काळ भाजपाचे सरकार केंद्रात आहे. वीसहून अधिक राज्यांत सत्ता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपाचा बोलबाला आहे. २ खासदार ते ३०३ खासदार असा टप्पा या पक्षाने गाठला आणि नंतर सातत्याने सत्तेचे सोपान हा पक्ष चढत राहिला हे आपसूक घडलेले नाही. ते केवळ काँग्रेस आणि अन्य विचारांच्या पक्षांची पीछेहाट झाली म्हणूनही घडलेले नाही. हे घडून आले ते ताईंसारख्या कर्मठ कार्यकर्त्यांच्या संघर्षामुळे. थोडे मागे वळून पाहिले तर असे दिसते की, १९५१ मध्ये डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. सांस्कृतिक ऐक्य, आर्थिक स्वावलंबन आणि राष्ट्रवादी आदर्शांचे समर्थन करण्यासाठी जनसंघ राजकीय व्यासपीठ म्हणून उदयास आला. काँग्रेस पक्षाचे सार्वत्रिक वर्चस्व आणि प्राबल्य असलेल्या युगात जनसंघाचा आरंभ झाला तो काळ अत्यंत प्रतिकूलतेचा होता. डॉ. मुखर्जी यांनी पक्षाची सुरुवातीपासून उभारणी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. १९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत फक्त तीन जागा या पक्षाला जिंकता आल्या. १९५३ मध्ये जम्मू-काश्मीरमधील परमिट सिस्टम संपवण्याच्या प्रयत्नांदरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असताना डॉ. मुखर्जी यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांचा मृत्यू झाला की हत्या झाली, हे आजही गूढ आहे. राष्ट्रवादी आणि राष्ट्रप्रेमी विचारांसाठी स्वतंत्र भारताच्या इतिहासात पडलेली ही पहिली आहुती होती. जनसंघाची विचारधारा सांस्कृतिक राष्ट्रवादावर आधारलेली होती. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्यासारख्या नेत्यांनी या विचारांचा विस्तार करून 'एकात्म मानववादा'ची संकल्पना मांडली. आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांसह आर्थिक प्रगतीची सांगड घालणारे हे तत्त्वज्ञान. आणि मार्क्सवादाला विरोध करणारा हा विचार. त्यानंतर आणिबाणीचे पर्व आले. जनसंघासह विरोधकांनी लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी लढा दिला. १९७७ मध्ये जनसंघाने इतर विरोधकांना सोबत घेऊन जनता पक्षाची स्थापना केली. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत जनता पक्षाच्या विजयात अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी आणि इतर नेत्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या सोबत सुमतीताईंसारखे कार्यकर्ते होते. त्या साऱ्यांच्या प्रयत्नांतून स्वतंत्र भारताच्या इतिहासात प्रथमच काँग्रेसेतर पंतप्रधान म्हणून मोरारजी देसाई यांचे सरकार आले. तोही काळ मागे पडला आणि १९८० मध्ये भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली. वाजपेयी आणि अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने आपल्या राष्ट्रवादाप्रति असलेल्या बांधिलकीचा पुनरुच्चार केला. याही टप्प्यावर सुमतीताईंसारखे लोक पक्षात होते. 'एकात्म मानववाद' तत्त्वज्ञानाने भाजपाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनाला वैचारिक पाया प्रदान केला आणि परंपरेला प्रगतीशी जोडले. सुमतीताई सुकळीकर आणि इतर तळागाळातील असंख्य कार्यकर्त्यांनी पक्षाचा प्रभाव वाढवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. सार्वजनिक सभा आयोजित केल्या, साहित्य वाटप केले, गरिबांची सेवा केली आणि वैयक्तिक पातळीवर मतदारांशी संवाद साधला. आजच्या भाजपाचे हे एका अर्थाने बीजारोपण होते. भाजपाची सुरुवातीच्या निवडणुकीतील कामगिरी देखील तशी माफकच होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ आणि जनता पार्टीच्या मुशीत तयार झालेले बिनीचे कार्यकर्ते व नेते असल्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना यश मिळू लागले. वारंवार पराभव होऊन लढाई सुरू ठेवावी लागते, याचे धडे त्या काळच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांकडून घेतले. जनसंघ आणि जनता पार्टी यांच्याप्रमाणेच भाजपालाही आरंभी थट्टा आणि उपहासाचा सामना करावा लागला. संघर्ष संपत नव्हता आणि तो केवळ राजकीय नव्हता. घरावर तुळशीपत्र ठेवून पायाला भिंगरी लागल्यागत फिरायचे, मिळेल तेथे व मिळेल ते खायचे, कार्यकर्त्यांच्या घरीच मुक्काम करायचा, स्वस्तात स्वस्त प्रवास करायचा, मोजके कपडे, मोजक्या वस्तू. १९८० आणि १९९० चे दशक हा भाजपासाठी परिवर्तनाचा काळ होता. रामजन्मभूमी आंदोलनाने पक्षाला राष्ट्रीय राजकारणात मोठा हात दिला. वाजपेयी आणि अडवाणी यांच्या करिष्माई नेतृत्वाचा उदय झाला आणि पक्षाच्या वाटचालीचा पुढचा मार्ग सुकर झाला. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली १३ दिवसांचे सरकार ते राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे मातब्बर सरकार असा टप्पा भाजपाने याच काळात पाहिला. आता भाजपात मोदी पर्व सुरू आहे. सलग तिसऱ्यांदा केंद्रात भाजपाचे सरकार आले आहे. भारताच्या प्रगतीची घोडदौड सुरू आहे. अशा स्थितीत कार्यकर्ते थोडेसे निवांत होणे, काहीसा उर्मटपणा येणे, स्वार्थ बोकाळणे हे सारे स्वाभाविक आहे. त्यावर मात केली पाहिजे. पूर्वसुरींच्या कष्टांमुळेच हे दिवस आपल्या वाट्याला आलेले आहेत, हे भाजपाच्या कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. सत्ता माणसाला भ्रष्ट करते आणि निरंकुश सत्ता पूर्णपणे भ्रष्ट करते, असे एक सुभाषित आहे. त्या सुभाषिताचा मथितार्थ असा की, सत्तेच्या पदांवर बसलेल्यांनी पूर्वसुरींच्या संयमी आणि सहनशील अशा व्यक्तिमत्त्वांचे नेहमी स्मरण करीत राहिले पाहिजे आणि सत्तेला चिकटून येणाऱ्या दुर्गुणांपासून दूर राहिले पाहिजे. सुमतीताईंना आदरांजली अर्पण करीत असताना गडकरी आणि फडणवीस या दोन्ही नेत्यांनी केलेल्या आवाहनाचा अर्थ हाच आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# राष्ट्रीय वनवासी क्रीडा स्पर्धा

सक्षम नेतृत्व मिळताच देश सर्वच क्षेत्रांत प्रगतिपथावर आहे असे आजचे चित्र आहे. अर्थ, संरक्षण, संसाधन विकास, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत होणारी प्रगती आज दृश्यमान आहे. याला अपवाद फक्त एकच क्षेत्र दिसते आहे आणि ते म्हणजे क्रीडाक्षेत्र होय. आजही ऑलिम्पिकच्या पदक तालिकेत भारताचा नंबर खालून सापडतो. खेळांचा प्रकार कोणताही असो, भारतीय संघाची कामगिरी यथातथाच असते. भारतीयांच्या क्रीडाक्षेत्रात सातत्याने पिछाडीवर असण्याला प्राकृतिक, सामाजिक आणि मानसिक अशी कारणे आहेत. पण पैशाचे पाठबळ, संधीची कमतरता आणि माहितीचा अभाव ही विशेष कारणे होत असेच म्हणावे लागते. जागतिक पातळीवर भारतीय लोकांची नसलेली नैसर्गिक शारीरिक क्षमता हे एक महत्त्वाचे प्राकृतिक कारण होय. अनेक खेळ जसे की फुटबॉल, ॲथ्लेटिक्स, व्हालिबॉल, बास्केटबॉल, बॉक्सिंग, कुस्ती या क्रीडा प्रकारात लागणारी मजबूत शारीरिक क्षमता नैसर्गिकरीत्या भारतीयांकडे नाही. हरयाणा आणि पंजाब या दोनच राज्यांतील स्त्री व पुरुषांकडे जागतिक स्तरावर वरील क्रीडा प्रकारात उत्तम कामगिरी करता येण्याजोगी शारीरिक क्षमता आढळते. इतर राज्यांमधील स्त्री-पुरुष हे निसर्गतः जागतिक प्रमाणाच्या तुलनेत कमी शारीरिक क्षमतेचे असल्याने वरील क्रीडा प्रकारात कौशल्य प्राप्त करूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके किंवा क्रमवारीता प्राप्त करण्यात कमी पडतात. ही नैसर्गिक मर्यादा लक्षात आल्यावर या देशातील क्रीडातज्ज्ञांनी यावर उपाययोजना शोधण्यास सुरुवात केली. तेव्हा लक्षात आले की, जागतिक स्तरावर इतर काही खेळांमध्ये उत्तम कामगिरी करणे भारतीयांना या नैसर्गिक मर्यादांसह शक्य आहे. हे खेळ म्हणजे आर्चरी, शूटिंग, ॲक्वेटिक्स, हॉकी, बॅडमिंटन यासारखे अनेक खेळ जे काही तरी 'साधनं' वापरून खेळले जातात. मग भारतीय खेळ प्राधिकरणाने भारतातील काही प्रदेश, ज्या प्रदेशात ठरावीक कौशल्यांची निसर्गतः जोपासना केली जाते, असे प्रदेश आणि ठरावीक उपजत गुणांची आवश्यकता असणारे खेळ यांची सांगड घालून 'एरिया गेम्स' ही ठरावीक क्रीडा प्रकारांच्या विकासाची योजना लागू केली. या योजनेसाठी संशोधन करताना आर्चरी आणि ॲथ्लेटिक्स या दोन खेळांत आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्यासाठी लागणारे गुण आणि क्षमता या देशातील वनवासी क्षेत्रातील जनजातींमध्ये विशेषत्वाने आढळून आले. तेथूनच वनवासी जनजाती राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांना सुरुवात झाली. याच सुमारास भारतातील वनवासी जनतेचे होणारे धर्म परिवर्तन लक्षात घेऊन, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने वनवासी कल्याण आश्रमाच्या माध्यमातून वनवासी जनजातींमध्ये कल्याण व विकास कार्य हाती घेतले. वनवासी कल्याण म्हणजे फक्त आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास एवढाच याचा आयाम असणारच नव्हता. वनवासी जनजातींचे होणारे धर्मांतरण रोखण्याबरोबरच या समाजाचा सर्वांगीण विकास करणे हे प्रमुख उद्दिष्ट होते. अर्थात् त्यामुळे क्रीडा हा विषय देखील प्राधान्यक्रमात होता. वनवासी जनजातींमधील प्रतिभावान खेळाडूंना राष्ट्रीय पातळीवर चमकण्याची संधी मिळावी या हेतूने १९८८ मध्ये मुंबई येथे वनवासी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे वनवासी कल्याण आश्रमाने आयोजन करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून सातत्याने वनवासी कल्याण आश्रम फक्त वनवासी जनजातीच्या खेळाडूंकरिता दरवर्षी राष्ट्रीय स्तरावर या स्पर्धांचे आयोजन करीत आहे. यावर्षी रायपूर येथे होणाऱ्या या स्पर्धांचे हे २४ वे वर्ष आहे. हा उपक्रम हाती घेतल्यापासून वनवासी कल्याण आश्रम ही स्पर्धा आर्चरी (धनुर्विद्या) आणि इतर कोणता तरी एक खेळ अशा दोन खेळांसाठी आयोजित करीत असते. या वर्षीच्या आर्चरी आणि त्याबरोबर फुटबॉल या दोन क्रीडा प्रकारांत या स्पर्धा घेतल्या जात आहेत. या क्रीडा स्पर्धा छत्तीसगड राज्याची राजधानी असलेल्या रायपूर येथे २७ ते ३१ डिसेंबर २०२४ या काळात घेण्यात येत आहेत. या क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटन समारंभासाठी केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविय आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णुदेव सहाय हे प्रमुख अतिथी असणार आहेत. या वर्षीच्या या आयोजनाची जबाबदारी छत्तीसगड वनवासी कल्याण आश्रमाने घेतली आहे. वनवासी क्षेत्राने आज भारताला अनेक उत्कृष्ट खेळाडू दिलेले आहेत. वानगीदाखल लिंबाराम, कविता राऊत, मनीष डामोर अशी अनेक नावे सहजपणे सांगता येतील. मात्र या सर्व खेळाडूंना कोणत्या कठीण परिस्थितीतून वाटचाल करावी लागते याची सामान्य माणसाला जाणीवही नसते. जिथे साधे 'प्राथमिक आरोग्य केंद्र' देखील दहा बारा किलोमीटर दूर असते, अशा दुर्गम आणि मागास क्षेत्रातील पालकांना फक्त खेळासाठी वेळ देणे, ही गोष्ट आजही मान्य होणारी नाही. जिथे आरोग्याला आवश्यक अशा सुविधांची वानवा आहे अशा प्रदेशात खेळांसाठी शारीरिक आणि मानसिक तयारीकरिता आवश्यक अशा सुविधा मिळणे ही अत्यंत कठीण गोष्ट ठरते. आज राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना शारीरिक व मानसिक अशा दोन्ही स्तरांवर तयारी करण्याची आवश्यकता असते. खेळाडूंना मैदानावर जशी मजबूत शारीरिक क्षमतांची निर्मिती आणि जोपासना करणे गरजेचे आहे तसेच मैदानाबाहेर त्याची मानसिक तयारी करून घेणे देखील तितकेच गरजेचे असते. त्याचवेळी खेळाडूंना स्पर्धेत जेथे परफॉर्मन्स द्यायचा असतो, त्या ठिकाणी असलेल्या वातावरणात आपले सर्वोत्तम देऊन पदके मिळवणे हे अत्यंत अवघड असे आव्हान असते. कारण अनेकदा खेळाडू सराव करीत असलेल्या ठिकाणचे वातावरण आणि ज्या ठिकाणी स्पर्धा असतात तेथील वातावरण अत्यंत विषम असू शकते. क्रीडा क्षेत्रात उपजत असलेल्या प्रतिभेला वाव देणे हा फक्त अर्धाच भाग होतो. त्या प्रतिभेची जोपासना करणे, त्याला पैलू पाडून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर विजयी करणे हे नेहमीच अत्यंत कठीण असे आव्हान असते. कारण खेळाडूंची अंगभूत प्रतिभा लक्षात आल्यानंतर त्याची योग्य तयारी करून घेण्यासाठी काही वर्षांचा कालावधी लागत असतो. तरुण खेळाडूमधील प्रतिभा लक्षात घेणे, मग त्याची जोपासना आणि योग्य आकार देणे, खेळाडूची शारीरिक तयारी, मानसिक कणखरपणा, आणि योग्य असा काळ किंवा वेळ या सगळ्या गोष्टी एकत्र आल्या तरच क्रीडा क्षेत्रात विजेते होता येते. यातील एकही बाब हुकली तर वर्षोनुवर्षे घेतलेली मेहनत अक्षरशः वाया जात असते.

वनवासी जनजातींना या देशाच्या संस्कृतीपासून तोडण्याचे कारस्थान ख्रिश्चन चर्च आणि इस्लाम अनेक दशकांपासून करीत होते. वनवासी बांधव जरी निसर्गपूजक असले तरी ते हिंदू आहेत याविषयी शंका नाही. पण शहरांपासून दूर अरण्यात रहिवास असलेला हा समाज मधल्या काही काळात दुर्लक्षित होता. आधुनिक शिक्षणाचा या वनांमध्ये अभाव असल्याने, हिंदू धर्मातील एक मोठा वर्ग धर्मांतरित करण्यासाठी या आधीच्या काळात बरेच प्रयत्न झाले. वनवासी कल्याण आश्रमाच्या कार्यामुळे याला फार मोठ्या प्रमाणावर आळा बसलेला दिसून येतो. मात्र बुद्धिभेद करून, कपट कारस्थानाने या वनवासी बंधूंच्या मनात वेगळेपणाची भावना रुजवण्याचा प्रयत्न ख्रिश्चन चर्च सातत्याने करताना दिसते. ही तुटलेपणाची किंवा इतर हिंदू समाजापेक्षा आपण वेगळे आहोत ही भावना वनवासी बांधवांच्या मनात निर्माण होऊ नये यासाठी वनवासी कल्याण आश्रम कार्य करीत आहे. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक विकास आणि समरसता असे चार आयाम क्रीडा क्षेत्राला असतात. राष्ट्रीय पातळीवर वनवासी क्षेत्रातील खेळाडूंना चमकण्याची संधी क्रीडा स्पर्धा देतात. त्यामुळेच शहरी समाजाने या स्पर्धांना प्रेक्षक या नात्याने हजेरी लावून या खेळाडूंचे कौतुक करणे जसे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे विविध खेळांतील तज्ज्ञ मार्गदर्शकांनी देखील या वनवासी क्षेत्रातील खेळाडूंच्या प्रतिभेला जोखण्यासाठी, टॅलेंट हंटकरिता अशा स्पर्धांना हजेरी लावणे देशाच्या क्रीडा क्षेत्राला अधिक उंची गाठण्यासाठी सहायक ठरेल.

९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# बाणेदारपणे मृत्यू स्वीकारणारे साहिबजादे

अमरावती येथील कठोरा परिसरात असलेल्या अंबा अपार्टमेंटमधील रहिवासी अद्याप १५ मेची सायंकाळ आठवल्यानंतर शहारतात. या दिवशी अंबा अपार्टमेंटच्या बी विंगमधील दुसऱ्या माळ्यावर असलेल्या फ्लॅटमधून धूर निघत असल्याचे दिसले. हे पाहून अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला. तर भयभयीत होऊन आता काय होईल, असा प्रश्न काहींच्या मनात उभा राहून ते थबकले. पण त्याच वेळी अवघ्या १७ वर्षांची करिना थापा धूर निघत असलेल्या फ्लॅटकडे धावली. फ्लॅटचे कुलूप तोडून तिने आत प्रवेश केला. आग आणि धुराचे लोट येत होते. मात्र, तिने पाण्याचा मारा करीत सिलेंडरलगत लागलेली आग आटोक्यात आणली. एवढेच नव्हे तर सिलेंडर बाहेर काढले. जर आगीतून सिलेंडर बाहेर काढले नसते तर सिलेंडरचा स्फोट होण्याची शक्यता होती. करिना थापाचे साहस, समयसूचकतेमुळे मोठी घटना टळली. अंबा अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या ७० कुटुंबांनी सुटकेचा निःश्वास सोडला. अनपेक्षित संकट ओढवल्यावर त्या संकटावर मात करण्यासाठी चालून जाण्याची वृत्ती उपजतच असावी लागते. शौर्य, धाडस, समयसूचकता या गुणांचे एकत्रीकरण झाले की, करिना थापासारखे शौर्य समोर येते. करिना थापाला आज अर्थात २६ डिसेंबर रोजी 'वीर बाल दिवस' कार्यक्रमात राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. शौर्य आणि पराक्रमाचा वारसा, इतिहास आमच्या समाजाला असून याच शृंखलेतील साहिबजादा जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार केंद्र शासनाने २०२२ सालापासून सुरू केला.

आपल्या देशाचा इतिहास हा त्याग, बलिदान आणि शौर्याचा आहे. इतिहासातील अनेक प्रसंग चिरकाल प्रेरणादायी आहेत. शिखांचे दहावे गुरू श्रीगुरुगोविंदसिंगांचे साहिबजादा जोरावरसिंग, फतेहसिंग ही दोन मुले. त्यातील मोठ्याचे वय ९ वर्षे तर लहाना अवघ्या ७ वर्षांचा. या दोघांचेही धर्म रक्षणासाठीचे शौर्य, बलिदान चिरस्मरणीय असेच म्हणावे लागेल. तो काळ मोगलांच्या अन्याय, अत्याचाराचा होता. मोगल सैन्याचे आक्रमणही नित्याचेच. मोगल सैन्याने आनंदपूर किल्ल्याला वेढा घातला. या वेढ्यामुळे अन्न, धान्य आणि पाण्याचा तुटवडा किल्ल्यात जाणवू लागला. किल्ला सोडाल तर नागरिकांना सुरक्षित बाहेर जाऊ देऊ, असा निरोप मोगलाच्या सेनापतीने कुराणाची शपथ घेऊन पाठविला. त्यानंतर ८ महिन्यांनी गुरुगोविंदसिंग आई-पत्नी, चार मुले आणि साथीदारांसह किल्ला सोडून निघाले. पण कुराणाची शपथ न पाळता मोगल सैनिकांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. या गदारोळात जोरावरसिंग, फतेहसिंग आणि त्यांची आजी यांची ताटातूट झाली. त्यातच ज्या ठिकाणी हे तिघेही थांबले होते त्यांनी दागिन्यांच्या मोहाने मोगलांना माहिती दिली. मोगलांनी या तिघांनाही अटक केली. मोगलांनी अटक केल्यानंतर किती छळ केला असेल याची कल्पना इतिहासातील अनेक दाखल्यांवरून करता येऊ शकते. या अवघ्या ९ आणि ७ वर्षांच्या दोन्ही मुलांना मोगलांचा सरदार वझीरखान याच्या समोर नेण्यात आले. त्यावेळी वझीरखानने 'इस्लाम स्वीकारा, तुम्ही मागाल ते मिळेल', असा प्रस्ताव ठेवला. त्यावेळी साहसाने ओतप्रोत असलेल्या या दोघांनीही 'आमचा धर्म आम्हाला प्राणाहूनही प्रिय आहे, आम्ही तो सोडणार नाही. आम्ही गुरुगोविंदसिंगांची मुले आहोत. आमच्यासमोर आमचे आजोबा श्रीगुरू तेगबहादूरसिंह यांचा आदर्श आहे. त्यांनी धर्मरक्षणासाठी प्राण दिले. आम्ही आमचा धर्म सोडणार नाही', असे बाणेदार उत्तर दिले. त्यानंतर या कोवळ्या मुलांना भिंतीत चिरडून मारण्याचा आदेश देण्यात आला. दोघांच्याहीभोवती भिंती उभारल्या जाऊ लागल्या. पण दोघांच्याही चेहऱ्यावर मृत्यूचे भय नव्हते. मात्र, काही वेळानंतर वयाने मोठा असलेल्या जोरावरसिंगाच्या डोळ्यात अश्रू आले. ते पाहून लहाना फतेहसिंग म्हणाला 'तुझ्या डोळ्यात अश्रू, मृत्यूची भीती वाटत आहे का?' यावर जोरावरसिंगाने उत्तर दिले की, 'अरे मी मोठा असूनही बलिदानाचा पहिला मान तुला मिळणार आहे याचे वाईट वाटते'. लहान्याची उंची कमी असल्याने पहिले बलिदान फतेहसिंगाचे होणार होते. त्यातून हा संवाद झाला. त्यानंतर २६ डिसेंबर १७०५ रोजी वझीरखान याने या दोघांनाही निर्घृणपणे ठार केले. त्यांनी हसत-हसत हौतात्म्य स्वीकारले. देश, धर्मासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचा इतिहास स्वातंत्र्यानंतरही अनेक वर्षे सांगितलाच गेला नाही. हे दुर्दैवच. पण या पराक्रम, शौर्य, साहसाचा वारसा असणाऱ्यांचे शासन केंद्रात येताच या सर्वांचे यथोचित स्मरण करण्याचा पायंडा सुरू केला आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# बिहार निवडणूक आणि नितीशकुमार

२०२५ मध्ये म्हणजे नवीन वर्षात दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. दिल्ली विधानसभेची निवडणूक फेब्रुवारी महिन्यात, तर बिहार विधानसभेची निवडणूक वर्षाच्या अखेरीस होणार आहे. बिहार विधानसभेच्या निवडणुकीला जवळपास वर्षभराचा कालावधी असला तरी त्याच्याही हालचाली सुरू झाल्या आहेत. बिहारमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून जदयू आणि भाजपा युतीचे सरकार आहे, या सरकारचे नेतृत्व जदयूचे नेते नितीशकुमार यांच्याकडे आहे, म्हणजे नितीशकुमार बिहारचे अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री आहेत. नितीशकुमार यांनी देशात सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रमही केला आहे. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे अजितदादा पवार राज्यात कोणाचेही सरकार असले तरी जसे उपमुख्यमंत्रिपदावर कायम असतात, तसेच बिहारमध्ये सरकार रालोआचे असो की संपुआचे मुख्यमंत्री नितीशकुमारच असतात. अजितदादा पवार यांचा जन्म जसा उपमुख्यमंत्रिपदासाठी झाला तसाच नितीशकुमार यांचा जन्म मुख्यमंत्रिपदासाठी झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही. यावेळीही राज्यातील विधानसभेची निवडणूक भाजपा आणि जदयू एकत्र लढवणार आहे, या आघाडीत चिराग पासवान यांचा लोकजनशक्ती पक्ष आणि जितनराम मांझी यांचा हिंदुस्थान अवाम मोर्चाही आहे. पासवान आणि मांझी हे दोघेही मोदी सरकारमध्ये मंत्री आहेत. बिहार विधानसभेच्या निवडणुकीत रालोआचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण राहील, असा प्रश्न केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना एका वाहिनीवरील मुलाखतीत विचारण्यात आला होता, त्यावर त्यांनी आम्ही एकत्र बसून याबाबतचा निर्णय घेऊ, असे उत्तर दिले. या उत्तरात काही गैर नव्हते. मात्र मुख्यमंत्री नितीशकुमार नाराज झाल्याची आणि ते पुन्हा राजदसोबत जाऊ शकतात, अशी चर्चा बिहारमध्ये सुरू झाली होती. खरं म्हणजे या चर्चेला काही आधार नव्हता. पण राजकारणात अशा कोणत्याही शेंडाबुडुक नसलेल्या चर्चा सुरू होतात.

बिहार प्रदेश भाजपा अध्यक्ष संजय जयस्वाल तसेच उपमुख्यमंत्री आणि भाजपा नेते सम्राट चौधरी यांना, राजधानी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात पत्रपरिषद घेत बिहार विधानसभेची निवडणूक आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वातच लढवणार असल्याचे सांगावे लागले. केंद्रातील नरेंद्र मोदी यांचे सरकार नितीशकुमार यांची जदयू आणि चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम अशा दोन मोठ्या पक्षांच्या पाठिंब्यावर आहे. जदयूचे राजीवरंजनसिंह ऊर्फ लल्लनसिंह तर मोदी यांच्या मंत्रिमंडळातही आहे. त्यामुळे बिहार विधानसभेच्या निवडणुकीत भाजपा जदयूला दुखावेल असे वाटत नाही. ज्याप्रमाणे भाजपा नितीशकुमार यांना सोडू शकत नाही, त्याचप्रमाणे आता नितीशकुमार यांनाही भाजपाची साथ सोडता येणार नाही. वारंवार भूमिका बदलल्यामुळे नितीशकुमार यांची प्रतिमा पहिलेसारखी विश्वसनीय राहिली नाही, त्याचप्रमाणे राज्यात पलटूराम म्हणून त्यांच्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. ही आपली प्रतिमा नितीशकुमार यांना पुसून काढायची आहे. महत्त्वाचे म्हणजे आपला पक्ष एकसंध ठेवायचा असेल तर नितीशकुमार यांना भाजपासोबत राहावे लागणार आहे. बिहारच्या राजकारणात सध्यातरी नितीशकुमार यांना पर्याय नसला तरी नितीशकुमार यांच्यासमोर आता फारकाही पर्याय उरले नाहीत. भाजपासोबत राहण्यातच नितीशकुमार यांचा सर्वाधिक राजकीय फायदा आहे. राजदसोबत जाऊन नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपद मिळणे यावेळी शक्य नाही, कारण तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्याच्या दिशेने राजद आणि लालूप्रसाद यादव कामाला लागले आहेत. २०२२ मध्ये पर्याय नसल्यामुळे राजदने नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपद दिले होते. त्यावेळी नितीशकुमार यांना राष्ट्रीय राजकारणाची तसेच पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली होती. त्यामुळे आपण राष्ट्रीय राजकारणात गेल्यानंतर तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री करण्याची आणि २०२५ ची विधानसभा निवडणूक त्यांच्या नेतृत्वात लढवण्याची घोषणाही नितीशकुमार यांनी केली होती, पण तो आता इतिहास झाला. या घोषणेनंतर नितीशकुमार राजदची साथ सोडत भाजपासोबत आले. त्यामुळे 'रात गयी सो बात गयी' सारखे त्यांच्या या घोषणेचे झाले आहे. भाजपाने बिहार विधानसभेची निवडणूक नितीशकुमार यांच्या नेतृत्वात लढवली आणि जिंकली तरी नितीशकुमार आता फारकाळ मुख्यमंत्रिपद सांभाळू शकतील, असे वाटत नाही. कारण विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत वयाची ७५ वी त्यांनी गाठली असेल. शारीरिकदृष्ट्या ते आता पहिलेसारखे तंदुरुस्त राहिले नाहीत. चालताना त्यांना त्रास होता, कोणाचा तरी आधार घेतल्याशिवाय त्यांना चालता येत नाही. तसेच आता त्यांना विस्मरणही होत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर जदयू आणि भाजपा आघाडीला बहुमत मिळाले तरी नितीशकुमार मुख्यमंत्री होण्याची शक्यता फार कमी आहे. सुरुवातीला काही काळासाठी भाजपा नितीशकुमार यांना मुख्यमंत्री करू शकेल, पण नंतर मात्र मुख्यमंत्रिपद भाजपाला आपल्याकडेच घ्यावे लागेल.

यावेळी बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपाचे सर्वाधिक आमदार निवडून येऊ शकतात. आतापर्यंत बिहारमध्ये जदयूपेक्षा भाजपा आमदारांची संख्या जास्त असतानाही भाजपाने युती-धर्माचे पालन करत मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडे दिले होते. यावेळी युती-धर्माचे पालन करण्याची वेळ नितीशकुमार आणि जदयूवर येऊ शकते. नितीशकुमार यांच्यानंतर जदयूला फारकाही राजकीय भवितव्य नाही. नितीशकुमार यांनी जदयूत नेतृत्वाची दुसरी फळी तयार होऊ दिली नाही. जदयूत नेते अनेक असले तरी नितीशकुमार यांचा राजकीय उत्तराधिकारी होईल, असा कोणताही नेता नाही. नितीशकुमार यांनी आपल्या मुलाला राजकारणात आणले नाही. नितीशकुमार यांच्या मुलाने राजकारणात यावे, नितीशकुमार यांची जागा घेत जदयूचे नेतृत्व करावे, अशी जदयूतील अनेक नेत्यांची इच्छा असली तरी त्यांचा मुलाचा ओढा हा अध्यात्माकडे आहे. राजकारणात येण्याची शक्यता त्याने फेटाळून लावली आहे. त्यामुळे नितीशकुमार यांचा राजकीय उत्तराधिकारी कोण हा जदयूत गंभीर असा प्रश्न आहे. जदयूतील कोणालाही नितीशकुमार यांनी आपला राजकीय उत्तराधिकारी केले तरी तो नेता पक्षाचे नेतृत्व करू शकेल का, तसेच पक्षातील अन्य नेते त्याचे नेतृत्व मान्य करतील का हा दुसरा प्रश्न आहे. नितीशकुमार यांच्या राजकीय निवृत्तीची वेळ जवळ आली आहे. आता ते फारकाळ राजकारणात सक्रिय राहतील असे वाटत नाही. त्यामुळेच भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री गिरिराजसिंह यांनी नितीशकुमार यांना भारतरत्न देण्याची मागणी केली आहे. गिरिराजसिंह यांनी नितीशकुमार यांच्यासोबत ओडिशाचे माजी मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनाही भारतरत्न देण्याची मागणी केली आहे. नवीन पटनायक यांना नसले तरी नितीशकुमार यांना भाजपाने भारतरत्न दिले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. नितीशकुमार यांच्या सन्मानपूर्वक राजकीय निवृत्तीचा तो एक संकेत असेल.

९८८१७१७८१७

### संकल्प संपूर्ण आयुष्याचा करा!

डिसेंबर संपत आला की वेध लागतात ते नववर्षाचे! रंगीबेरंगी चैतन्याचे सळसळणारे स्वप्नाळू नवे दिवस असतात ते. प्रत्येकजण काही ना काही तरी स्वप्न पाहात असतो. नवीन वर्ष, नवी उमेद, नवी आशा, अन आकांक्षा. या दिवसात प्रत्येक जण स्वतःशी काही ना काही तरी निश्चय-संकल्प करत असतो. पुढे त्या संकल्पाचा कितीसा पाठपुरावा होतो? तो पार पाडण्यासाठी चिकाटी, जिद्द व मेहनत किती जण दाखवतात हा भाग वेगळाच. तसे पाहायला गेले तर 'संकल्प' हे आपण स्वतःला दिलेले वचन असते. आपण स्वतःला दिलेले वचन पाळत शकत नसू, तर दुसऱ्याला दिलेले कसे पाळणार? नवीन वर्ष २०२५ सुरू होणार आणि जुने वर्ष संपणार. अर्थातच बहुतेक मंडळी संकल्प ठेवणार (नेहमीप्रमाणे) वर्ष जरी नवीन असले तरी आपण त्यापलीकडे जाऊन मूळ प्रश्न स्वतःला विचारणे आवश्यक आहे. आपल्या जीवनदृष्टीचे काय? तुम्ही स्पष्ट बघू शकता की तुम्ही कोणत्या दिशेने चालला आहात? आपल्या दैनंदिन आयुष्यातील सांसारिक क्रियांमध्ये इतके अडकतो की कोणत्या मार्गाने चाललो आहोत हे आपल्याला दिसत नाही. बरेचदा आपण केलेले संकल्प अनेक प्रलोभनामुळे व इच्छाशक्तीच्या अभावामुळे मोडले जातात. क्वचितच त्यातले काही पूर्ण करतो. म्हणून प्रथम संकल्प नेहमी वास्तविक असायला पाहिजेत; जेणेकरून ते आपल्या आयुष्यात परिवर्तन घडवून आणण्याची ताकद ठेवतात. आपण आपल्या संकल्पाला चिकटून असतो, तेव्हा आपण अधिक मजबूत होतो, आपला आत्मविश्वास वाढतो, संकल्पात शब्द व त्यामागचा अर्थ महत्त्वाचा असतो. जीवनाचा हेतू साध्य करायचा असल्यास अर्थरूपी संकल्प हवा. जीवनात ध्येय, हेतू महत्त्वाचे असतात. ते प्राप्त करण्यासाठी सावधगिरी बाळगा. संतुलित जीवन जगण्याचा प्रयत्न करा, अतिरेक टाळा, जागरूक राहा. आपले अस्तित्व किंवा हेतूंचे कारण काय आहे हे बघण्याची दृष्टी निर्माण करा, दुसऱ्याचे कौतुक करायला शिका. कृतज्ञता व्यक्त करायला शिका, कृती करण्यापूर्वी विचार करा, कला, संगीत, साहित्य, कविता, शिल्पकला इत्यादींपासून आनंद घ्यायला विसरू नका. झालेल्या चुका पुन्हा होणार नाहीत याची काळजी पुढील वर्षी घ्या. परंतु हे करताना कोणताही ताण घेऊ नका. सहजतेने जगा. संघर्ष टाळा. उत्सव ज्या मानसिकतेने साजरा करता त्याच मानसिकतेने आयुष्यही संकल्पच्या माध्यमातून जगा, यश जास्त मिळेल.

**डॉ. चंद्रकांत कुलकर्णी**/९९६०९६७१३२

## वाचक पत्रे

### शिक्षणात परीक्षा हवीच!



सरसकट उत्तीर्ण धोरण रद्द करण्याचा केंद्र शासनाने घेतलेला निर्णय अत्यंत योग्य आणि स्तुत्य असाच आहे. मात्र केवळ पाचवी व आठवीसाठी हा निर्णय न ठेवता तो पूर्वीप्रमाणे सर्व विषयांसाठी असावयास हवा. सुरुवातीपासूनच शैक्षणिक पाया मजबूत करण्यासाठी, शिक्षणाची एक एक पायरी गाठण्यासाठी परीक्षा ही संकल्पना महत्त्वपूर्ण असून त्याचे गांभीर्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रारंभपासूनच समजणे तितकेच महत्त्वाचे आहे. देशातील सर्वच राज्यांनी हे धोरण स्वीकारणे आवश्यक असल्याचे वाटते.

**विश्वनाथ पंडित**/९५८८४५०४४२

### विरोधकांच्या अपरिपक्व राजकीय विचारांचा पर्दाफाश

लोकसभा व विधानसभेया निवडणुकाच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी भाजपा उमेदवारासाठी झंझावाती प्रचार करीत होते व त्यामुळे त्यांचे उमेदवार निवडून येतही होते. कारण जनतेला त्यांनी केलेल्या विकासकामांची कल्पना होती. लोकसभेच्या निवडणुकीनंतर पंतप्रधान हे संपूर्ण देशाचे होतात. नरेंद्र मोदी तसा देशाचा म्हणजे पर्यायाने सर्वांचाच विचार करीत असावे व देशाची उन्नती, प्रगती व्हावी अशी त्यांची भावना आहेच. तरी काही विघ्नसंतोषी असतात की पंतप्रधान असताना फक्त भाजपाचा प्रचार न करता सर्व पक्षांच्या उमेदवारांचा प्रचार करावा असे अपरिपक्व विचार मांडतात. त्याला उबाठाचे नेते उद्धव ठाकरे अपवाद नाहीत. निवडणूक लढताना प्रत्येक पक्षाचे काही ध्येयधोरणे असतात. आपला पक्ष लोकांच्या भल्यासाठी काय करता येईल अशी विचारसरणी ठेवून त्या त्या पक्षाचा एक अजेंडा, जाहीरनामा व निवडणुकीनंतर त्यानुसार कार्य करीत असतो. पण काही पक्षातील धुरंधरांना ते पटत नाही व विरोध करीत असतात आणि आपले ज्ञान प्रकट करतात. सक्षम विरोधी पक्ष हा सत्ताधाऱ्यांचे कुठे चुकते आहे, हे सांगत असतो. सोबतच देशाच्या प्रगतीसाठी झटतो. नुसता विरोधासाठी विरोध करणे हे देशासाठी योग्य नाही. ऋग्वेदातील एक मंत्र आहे की,

समानी न आकूतिः समाना हृदयानी वः
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासती

अर्थात तुमचे संकल्प एक होवोत, तुमचे हृदय एक होवोत जेणेकरून तुम्ही संपूर्णतः संघटित होऊन आदर्श सामुदायिक जीवन व्यतीत करू शकाल. पण हे लक्षात कोण घेत? स्वार्थासाठी संविधानाची प्रत उंच उभारून दाखवण्यात अर्थ नाही असे वाटते.

**म. ल. भावे**/७६२०६२९७२८

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



**सोलापूर : लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडचे चेअरमन तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते सन २०२५ वर्षाच्या दिनदर्शिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी लोकमंगल बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

# १९ गोवंशांना कत्तलीपासून जीवदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

बजरंग दलाच्या सोलापूरच्या गोरक्षकांची न भूतो न भविष्यती अशाप्रकारे दिवसभरात ४ ठिकाणी धडाकेबाज कारवाई करीत १९ गोवंशांना कत्तलीपासून जीवनदान दिले. यावेळी २ गाई मृत अवस्थेत मिळून आल्या.

दि.२० डिसेंबर २०२४ रोजी मंद्रूप मार्गे गायींची कत्तलीच्या उद्देशाने तस्करी होणार आहे अशी माहिती मिळाली. त्यावेळी बजरंग दल सोलापुरातील गोरक्षकांनी मंद्रूप पोलीस स्टेशन येथील पोलिसांच्या मदतीने मंद्रूप हद्दीत एमएच ११ आर ४७८९ ही आयशर अडवून पाहणी केली असता आतील बाजूस १२ गोवंश जिवंत अवस्थेत तर २ गोवंश मृत अवस्थेत आढळले. वाहन चालक वाहन सोडून फरार झाला.

२० डिसेंबरलाच जेलरोड पोलीस स्टेशन हद्दीत एक व्यक्ती गाई कत्तलीच्या उद्देशाने चालत घेऊन जात आहे अशी माहिती गोरक्षकांना मिळाली. गोरक्षकांनी सोलापूर कंट्रोल रूम येथे संपर्क साधून सदर घटनेचे सविस्तर माहिती दिली त्वरित पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर व्यक्ती ताब्यात घेत चौकशी केली प्रथमतः त्या व्यक्तीने उडवा उडवीची उत्तरे दिले. काहीच वेळात योग्य पुरावे निष्पन्न होत नसल्याने सदर व्यक्ती हा कत्तलीच्या उद्देशाने चालत घेऊन जात होता असे निष्पन्न झाले. सदर व्यक्तीवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

सकाळी आठ वाजताच्या दरम्यान सदर बाजार पोलीस स्टेशन हद्दीत फॉरेस्ट येथे एका घरात देशी बैल कत्तलीच्या उद्देशाने डांबून ठेवण्यात आले आहे अशी माहिती मिळाली असता गोरक्षकांनी सदर माहिती सदर बाजार पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक श्री अजित लकडे साहेब यांना दिली. त्वरित संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी रेड केली असता सदर बैलाचे चारी पाय दोरीने बांधून आडव पाडण्यात आलेले होते. काहीच वेळात त्यांची कत्तल होणार होती असे धक्कादायक कृत्य पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास झाले. गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे सदर खिलार जातिवंत नंदीबैलाचे जीव वाचवण्यात गोरक्षकांना यश आले.



रात्री १० दरम्यान मोहोळ मार्गे कार मधून चोरीछुप्या पद्धतीने गाईंची तस्करी होणार आहे अशी माहिती गोरक्षकांना मिळाली. त्यानुसार पोलीस प्रशासनाची मदत घेत बाळे येथे सापळा रचण्यात आला. काहीच वेळात टोयोटा इनोवा कंपनीचे वाहन क्र. एमएच ०८ आर ०५५१ हे वाहन गोरक्षकांच्या संशयास्पद निदर्शनास आल्याने पोलिसांची मदत घेत सदर वाहन बाळे येथे गोरक्षकांनी पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. कारच्या आतील बाजूस पाठीमागील सर्व सीट काढून तेथे ४ मोठे गाई अतिशय क्रूर पद्धतीने अधिक दाटीवाटीने बांधून कत्तलीसाठी घेऊन जात आहे असे निष्पन्न झाले. सदर वाहन चालक व क्लिनर यांच्यावर फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

अशाप्रकारी २० डिसेंबर रोजी दिवसभरात ४ ठिकाणीकारवाई करण्याकरिता सोलापूर शहर पोलीस उपायुक्त विजय कबाडे, मंद्रूप, जेलरोड, सदर बझार तसेच फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या प्रशासनातील पोलीस कर्मचाऱ्यांचे तसेच मानद पशुकल्याण अधिकारी महेश भंडारी, गोसेवक गोपाल सोमानी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

ही कारवाई यशस्वी करण्याकरिता बजरंग दल सोलापूर जिल्हा गोरक्षा प्रमुख प्रशांत परदेशी, बजरंग दल सहजिल्हा गोरक्षा प्रमुख पवनकुमार कोमटी, बजरंग दल जिल्हा संयोजक सिद्राम चरकुपल्ली, गोरक्षक अविनाश कैयावाले, राकेश बिज्जरगी, अनिकेत गोरट्याल, पवन बल्ला, कुमार आंबट, शुभम फलमारी तसेच आदी गोरक्षकांनी अथक परिश्रम घेतले.

# साकव फाउंडेशनच्यावतीने शनिवारपासून उत्सव दान हे प्रदर्शन

## सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या देणगीदारांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

साकव फाउंडेशनच्या वतीने दि. २८ व २९ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात उत्सव दानाचा हे विविध कार्य करणाऱ्या सामाजिक संस्थांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या देणगीदारांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थापक अध्यक्ष डॉ. जगदीश पाटील यांनी पत्रकार परिषदेत केले आहे.

शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन पद्मश्री राहीबाई पोपरे (बीज माता) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी पोलीस आयुक्त एम राजकुमार , डॉ. प्रशांत दोंड , माऊली झांबरे आदी मान्यवरांचे प्रमुख उपस्थिती राहणार आहे. फाउंडेशनच्या वतीने सामाजिक प्रकल्प व सामाजिक संस्थांच्या सक्षमीकरणासाठी हा उपक्रम घेण्यात येतो. साकव म्हणजे माणसाला माणसाशी जोडून देणारा माणुसकीचा पुल आहे. त्याचाच भाग म्हणून छत्रपती संभाजी नगर, बीड, कुर्डूवाडी व सोलापूर मधील विविध १० सामाजिक संस्थांची निवड या प्रदर्शनासाठी केली आहे. नवीन वर्षाची सुरुवात सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्यांनी अनोख्या पद्धतीने करावी, असे आवाहनही यावेळी संस्थापक अध्यक्ष डॉ. जगदीश पाटील व विश्वस्त राहुल बिराजदार यांनी केले आहे.

# दोन दुचाकीची समोरासमोर धडक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

निंबर्गी ते चडचणकडे दुचाकीवरून जाताना सादेपूर गावाजवळ समोरून आलेल्या (दुचाकी क्रमांक एम एच ०९ ए आर ३४३६) या वाहनाने धडक दिल्याने बिराप्पा शेजाळ (वय ४५, रा. हुलजंती, ता. मंगळवेढा) हे जखमी झाले. त्यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

# क्राईम वृत्त

## शेतीच्या कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

शेतीच्या कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत नारायणसिंग मोहनसिंग रजपूत (वय४६, रा. कुमठे, ता. उत्तर सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नामदेवसिंग रजपूत, प्रकाश रजपूत, शारदारबाई रजपूत, हनुमान रजपूत (सर्व रा. कुमठे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नारायणसिंग रजपूत हे २३ डिसेंबर रोजी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास कुमठा गावातील जुना सर्व्हे नं. १६१, नविन गट नं. ३३६,३३७ येथे नारायणसिंग रजपूत यांचा चुलता नामदेवसिंग रजपूत याला चारा का कापून घेऊन जाता असे विचारले असता नामदेवसिंग रजपूत याने नारायणसिंग यास तुम्ही कोर्टाचा निकाल लागे पर्यंत शेतात यायचे नाही असे म्हणून शिवीगाळ करून हाताने मारहाण केली. तसेच प्रकाश रजपूत याने रॉडने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार बर्हिजे पुढील तपास करीत आहेत.

## वटवटे कारखान्यात कामगार जखमी

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

मोहोळ तालुक्यातील वटवटे येथील कारखन्यात काम करताना कमगार जखमी झाला. अमोल निसाद (वय २५, रा. उत्तर प्रदेश सध्या रा. वटवटे कारखाना कॉलनी, वटवटे, ता. मोहोळ) असे जखमीचे नाव आहे. २४ डिसेंबर रोजी सायंकाळी वटवटे कारखान्यात काम करताना अमोलच्या डोक्यात कॉस्टीक सोडा गेल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## शेतीच्या कारणावरून वृध्दास मारहाण

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

शेतीच्या कारणावरून आहेरवाडी (ता. दक्षिण सोलापूर) येथे वृध्दास लाकडाने मारहाण करण्यात आली. शिवानंद सिध्दप्पा सिंदगी (वय ६०, रा. आहेरवाडी) असे जखमीचे नाव आहे. शिवानंद सिंदगी हे २४ डिसेंबर रोजी स्वतःच्या शेतात काम करीत असताना शेतीच्या जागेच्या वादातून प्रकाश पाटील, बाबुराव पाटील यांनी लाकडाने शिवानंद यांस मारहाण करून जखमी केले. त्यामुळे शिवानंद यांना मुलगा संतोष यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## जुना पूना नाका येथील ब्रिजच्या लोखंडी अँगलला धडकून दुचाकीवरील दोघे जखमी

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

जुना पूना नाका येथील ब्रिजच्या लोखंडी अँगलला धडकून दुचाकीवरील दोघे जखमी झाले. सतिश अंबादास गाडपेल्ली (वय २०, रा. देसाई नगर, सोलापूर) आणि अंबादास दिकोंडा (वय २२, रा. देसाई नगर, सोलापूर) अशी जखमींची नाव आहेत. २५ डिसेंबर रोजी दुपारी एकच्या सुमारास सतिश व अंबादास हे दोघे दुचाकीवरून डबलशीट मार्केट यार्ड ते मोहोळ असे जात होते. त्यावेळी जुना पूना नाका येथील ब्रिजवर दुचाकील आल्यानंतर त्यांचा दुचाकीवरील ताबा सुटल्याने दुचाकी ही ब्रिजच्या लोखंडी अँगलला धडकून दुचाकीवरील दोघेही ब्रिजवरून खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यामुळे दोघांनाही उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## सर्पदंश झालेल्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

मोहोळ तालुक्यातील सय्यद वरवडे येथे शेतात काम करताना दोन्ही पायास सर्पदंश झाल्याची घटना २१ डिसेंबरला घडली. यात महादेव जगन्नाथ विरपे (वय ३५, रा. सय्यद वरवडे, ता. मोहोळ) यांना उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना २३ डिसेंबरला दुपारी पावणे एक वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# सीसीएच ॲप फसवणुकीतील आरोपी येरंकल्लू यास जामीन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

सी. सी. एच. ऑनलाईन ॲप फसवणूकीच्या खटल्यात चांदीचे दागिने करणाऱ्या व्यापाऱ्यास अतिरिक्त सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी २ लाख रुपयांचा जामीन मंजूर केला.

सोलापूर येथील व्यापारी अनंत प्रकाश येरंकल्लू (वय ४७, रा. अशोक नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांची सी.सी. एच. ऑनलाईन ॲपचे माध्यम ातुन ९१ लाख रुपयांच्या फसवणूकीच्या खटल्या प्रकरणी सोलापूर येथील विशेष न्यायाधीश राणे यांनी जामीन मंजूर केला.



जुन २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये सोलापूरात सी.सी.एच. ऑनलाईन ॲपच्या नावाखाली बऱ्याच लोकांच्या मोबाईल वर एक आकर्षक गुंतवणूक लाभ दर्शविणारा ॲप येत होता. त्याद्वारे सोलापूरातील एकूण ८३ गुंतवणूकदारांची फसवणूक झाली होती. त्यामध्ये येरंकल्लू बंधूमार्फत गुंतवणूक झाली असा काही गुंतवणुकदारांनी आरोप करुन फिर्याद दाखल केली होती. त्यावर पोलीसांनी गुन्हा दाखल करुन १० जानेवारी २०२३ रोजी येरंकल्लु बंधु यांना अटक केली होती. पोलीसांनी तपास करुन न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. त्याचा खटला सोलापूर येथील विशेष न्यायालयात सुरु आहे.

सदर बाबत यातील मुख्य आरोपी अनंत प्रकाश येरंकल्लु यांनी विशेष न्यायालयात जामीन अर्ज ठेवला होता. त्याची सुनावणी विशेष न्यायालयासमोर झाली. यातील आरोपी हे स्वतः याप्रकरणात पिडीत (बळी) आहेत. ॲनेटा नावाच्या व्यक्तीने त्यांचीच फसवणूक केली आहे. यातील आरोपीने कोणाचीही फसवणूक केली नाही. आरोपातील गुंतवणूकी एवढीच आरोपीची वैयक्तीक मालमत्ता पोलीसांनी जप्त केलेली आहे. आरोपी दीड वर्षापासुन जेलमध्ये आहे. आरोपी कोठेही पळून जाणार नाही असा युक्तीवाद आरोपींच्या वकिलांनी केला. सदर युक्तीवाद विचारात घेऊन विशेष न्यायालयाने समाजातील स्वतंत्र व्यक्तीच्या २ लाखाच्या जामीनावर आरोपीची मुक्तता करण्याचा आदेश दिला. सदर प्रकरणात सरकारतर्फे ॲड. दत्ता पवार यांनी तर आरोपी तर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. स्वप्नील सरवदे, ॲड. आशुतोष पुरवंत, ॲड. अतिश नागणकेरी यांनी काम पाहिले.

# दुचाकीवरून पडल्याने तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

डफरीन चौक ते सात रस्त्याकडे दुचाकीवरून जाताना पु. ना. गाडगीळ शोरूमजवळ दुचाकीवरून पडल्याने सुमित चव्हाण (वय २१, रा. नेहरूनगर, विजापूर रोड) हा जखमी झाला. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.

**सत्तरफूट रस्त्यावर एक जखमी**

**सोलापूर :** कुमठा नाका ते लक्ष्मीनारायण टॉकीज जवळ ७० फूट रोड जवळ गाडी वळवताना नारायण कोटलापुरे (वय ८५, रा. ७० फूट रोड) हे जखमी झाले. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले.



# आईवडिलांचा सन्मान करण्याची परंपरा घरोघरी निर्माण व्हावी : माजी आ. सावंत

## भालशंकर गौरव समितीचे राज्यस्तरीय पुरस्कार वितरण : शिष्यवृत्तीचे वाटप, ग्रंथाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

आईवडिलांचा सन्मान करण्याची परंपरा घरोघरी निर्माण झाली पाहिजे. अशी परंपरा समाजभूषण अण्णासाहेब भालशंकर यांनी गेली २६ वर्ष पूर्वीपासून सुरू केली आहे. अण्णासाहेब भालशंकर त्यांच्या आईवडिलांचा सन्मान करतात, त्यांची मुले त्यांचा सन्मान करतात. अशी सन्मानाची परंपरा राज्य आणि देश पातळीवर सुरू व्हावी, असे प्रतिपादन पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांनी केले.

नामदेवराव भालशंकर यांच्या ८६ व्या जयंतीनिमित्त नामदेव बंडूजी भालशंकर गौरव समिती, मातोश्री रुक्मिणी फाउंडेशन आणि सम्यक अकॅडमी व लोकराजा फाउंडेशन यांच्यावतीने सोलापुरातील शिवस्मारक सभागृहात आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण आणि शिष्यवृत्ती वाटप प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गौरव समितीचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक व कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर हे होते. याप्रसंगी पुणे विभागाचे माजी आ. दत्तात्रय सावंत यांच्यासह महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजयकुमार राठोड, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख, मातोश्री रुक्मिणी भालशंकर, गौरव समितीचे सचिव बोधिप्रकाश गायकवाड, नीलकंठ शिंगे, नानासाहेब भालशंकर, अशोक पाचकुडवे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

रवी देवकर यांनी भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून घेतल्यानंतर निवृत्त पोलीस उपनिरीक्षक केरू जाधव आणि परभणी येथील हुतात्मा सोमनाथ सूर्यवंशी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून दहा व्यक्तींना पुरस्कार देऊन गौरविले. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ, शाल, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. त्यानंतर मातोश्री रुक्मणी फाउंडेशनच्या वतीने स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच गरीब, गरजू निराधार विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचे वितरण झाल्यानंतर सम्यक अकॅडमी आणि लोकराजा फाउंडेशन यांच्यावतीने संविधान दिनी आयोजित सविधान गौरव परीक्षेतील उत्तीर्ण स्पर्धकांना पारितोषिक व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन राज्य कर निरीक्षक बुद्धजय भालशंकर व युवराज भोसले यांनी केले तर अशोक पाचकुडवे यांनी आभार मानले.

### 'मोहब्बत की किताब' पुस्तकाचे प्रकाशन

याच समारंभात राज्य कर निरीक्षक बुद्धजय भालशंकर लिखित जागृती पब्लिकेशन प्रकाशित भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करणाऱ्या ''मोहब्बत की किताब'' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. याच पुस्तकावर आधारित बुद्धजय भालशंकर लिखित आणि दिग्दर्शित केलेल्या मोहब्बत की किताब लघु नाटिकेचे सादरीकरण करण्यात आले. या नाटिकेत स्वतः बुद्धजय भालशंकर तसेच मोनाली भालशंकर-मेश्राम यांची प्रमुख भूमिका होती.

### यांचा झाला पुरस्काराने सन्मान

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार शशिकांत जाधव, भगवान गौतम बुध्द जीवनगौरव पुरस्कार अंबादास कदम, माता रमाई भिमराव आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार जयसाबाई हांडे, कर्मवीर भाऊराव पाटील जीवनगौरव पुरस्कार युवराज सांगळे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणवंत पत्रकार पुरस्कार शरीफ सय्यद , क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत युवती उद्योजिका पुरस्कार वृषाली भुरले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज गुणवंत युवा उद्योजक पुरस्कार अमोल शिंदे , महात्मा जोतीबा फुले गुणवंत कामगार सेवक पुरस्कार बापूसाहेब सदाफुले ,क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले गुणवंत शिक्षिका पुरस्कार प्रतिभा पांडव या सत्कारमुर्तीचा सपत्नीक सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ, शाल, वृक्षाचे रोपटे देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# निधन वृत्त...

## मोहन मामडयाल



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

आनंदम विहार येथील रहिवासी मोहन सिद्राम मामडयाल (वय ७६) यांचे बुधवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मोहन मामडयाल यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी ९ वाजता राहत्या घरापासून निघणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. डिटीपी ऑपरेटर राजेश मामडयाल यांचे ते वडील होत.

## वसंत राऊत



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

वसंत रामचंद्र राऊत यांचे वयाच्या ७० व्या वर्षी हृदयविकाराच्या उपचारादरम्यान रुबी रुग्णालय, पुणे येथे द. २४ डिसेंबर रोजी सकाळी ६ वाजता निधन झाले. ते महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, सोलापूर येथे चालक म्हणून सेवेत होते. त्यांनी स्वच्छा सेवानिवृत्ती घेऊन शेती व्यवसाया सोबत समाज कार्य करित होते. त्यांचे मुळगाव सौंदणे, (ता. मोहोळ) होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली सूना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

Classifieds

**पाहिजेत**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीण मध्ये**
**9850702170**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## सावधानतेची जाहीर नोटीस

या सावधानतेच्या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर, सब डि.व तालुका मोहोळ पैकी मौजे मोहोळ येथील जिरायत शेतजमीन, यासी गट नंबर ६३६/५/अ/२ संपूर्ण, क्षेत्र हे. ०१-६१ आर, आकार रुपये १-२० पैसे यासी चतुःसीमा पूर्वेस - गट नंबर ६३६/५/अ/१, पश्चिमेस - गट नंबर ६३६/१ ते ४, दक्षिणेस रस्ता, उत्तरेस - ६३६/५/ब व ६३६/५/अ/१ येणेप्रमाणे वर नमूद केलेली शेतजमीन रामचंद्र माधव जोशी यांचे मालकी वहिवाटीची होती. त्यांनी हयात असताना सदर मिळकतीचे साठेखत सौ. माधुरी उर्फ येसू यशवंत गुंड यांना दि. १९/०८/२००३ रोजी करून दिलेले होते. रामचंद्र जोशी हे जिवंत असताना त्यांनी सदर मिळकतीचे साठेखतात नमूद अटीवर माधुरी गुंड यांना वर नमूद मिळकतीचे खरेदीखत करून देण्यास तयार होते व त्यांचे मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस बाळकृष्ण रामचंद्र जोशी, प्रशांत दामोदर जोशी, प्रवीण दामोदर जोशी, रीमा सतीश पराडकर, मनीषा क्रिस्टोफर त्रिभुवन, वर्षा संजय मोकाशी, सुरेश रामचंद्र जोशी, रजनी रामचंद्र जोशी हे देखील तयार होते व आहेत. परंतु सौ. माधुरी उर्फ येसू यशवंत गुंड या सदर मिळकतीचे खरेदीखत त्यांच्या हक्कात नोंदवून घेण्यास वारंवार टाळाटाळ करीत आहेत. तरी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून ७ (सात) दिवसाचे आत सौ. माधुरी उर्फ येसू यशवंत गुंड, रा. मोहोळ. ता. मोहोळ, जि. सोलापूर यांनी वर नमूद वारसांशी संपर्क करून साठेखतात नमूद अटींची पूर्तता करून सदर मिळकतीचे अस्सल खरेदीखत त्यांचे हक्कात नोंदवून घ्यावे. अन्यथा वर नुमूद साठेखताचा दस्त रद्द झाला असे समजून आमचे अशिल अन्य व्यक्तीशी सदर मिळकतीचा विक्री व्यवहार करणार आहेत. त्याचे होणार परीणामास आपण सर्वस्वी जबाबदार रहाल म्हणून हि सावधानतेची जाहीर नोटीस दिली.
ता. २३/१२/२०२४.

**सही/-**
**ॲड. प्रमोद बलभिम जाधव**
**बी.ए., एल.एल.बी., सी.सी.एफ., ॲन्ड एम.जे.**
**नगर परिषदेजवळ, किल्ला विभाग,**
**करमाळा, ता. करमाळा, जि. सोलापूर**
**मो.नं. ९९२३४२२३७६ / ९४०३२९०३०२**

## जाहीर प्रकटीकरण

**दि. कि. अर्ज नं. १०३/२०२४**
पुढील नेमलेली तारीख २७/०१/२०२५

**बार्शी येथील मा. दिवाणी न्यायाधीश सो. कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**१) श्रीमती अश्विनी किशोर पाटील,** वय ४० वर्षे, धंदा- घरकाम, रा. नारी (भांडेवाडी), ता. बार्शी, जि. सोलापूर
**२) ओम किशोर पाटील,** वय २१ वर्षे, धंदा- शिक्षण, रा. सदर
**३) श्रेया किशोर पाटील,** वय १७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर
**४) त्रिवेणी राजेंद्र पाटील,** वय ८० वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर
**अर्जदार**

**- विरुद्ध -**

**कोणी नाही** — **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदार हे वर नमूद ठिकाणचे रहिवासी असून अर्जदार नं. २,३ चे वडील म्हणजेच अर्जदार नं. ४ चे पती व अर्जदार नं. १ चे पती किशोर राजेंद्र पाटील हे होते. ते दि. ५/६/२०१३ रोजी उपचारादरम्यान सदर सोलापूर येथील गंगामाई हॉस्पिटलमध्ये दवाखान्यात मयत झाले. मयतास अर्जदार हेच वारस असून मयतास अर्जदारांशिवाय न्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना त्यांचे कायदेशीर अडचणीचे निवारणाकरीता व अर्जदार नं. २ यास अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून घेणेकरीता अर्जदार हे किशोर राजेंद्र पाटील यांचे कायदेशीर वारस असलेबाबत वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची गरज भासलेली आहे. सदर वारस/हेअरशिप अर्जदाराकडे नसलेने अर्जदारास अनेक कायदेशीर अडचणीस सामोरे जावे लागत आहे असे कथन करुन अर्जदाराने वारस/हेअरशिप प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, कथनांसंबंधाने वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क, हितसंबंध, आक्षेप असलेस वा मयतास अन्य कोणी वारस असलेस संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अथवा पुढील नेमले तारीख २७/०१/२०२५ रोजी मे कोर्टात स्वतः वा माहितगार ॲडव्होकेटमार्फत हजर होवून आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रारी, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे पुढील योग्य ते हुकूम होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे.
तारीख : २४/१२/२०२४

सही/-
**वरिष्ठ लिपीक**

सही/-
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### भावतेघ, गनेमतने जिंकले स्कीटमध्ये सुवर्णपदक

**नवी दिल्ली** : येथील कर्णीसिंग शूटिंग रेंज येथे आयोजित ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत स्कीट प्रकारात



पुरुषांत जागतिक विद्यापीठ सुवर्णपदक विजेता भावतेघ सिंग गिलने, तर महिला विभागहात गनेमत सेखोनने सुवर्णपदकाचा मान मिळविला. भावतेघने एअर इंडियाचा आंतरराष्ट्रीय वैमानिक फतेहबीर सिंग शेरगिल याचा ५४-५१ असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. भावतेघने वाईट दृश्यमानता इतर सर्वांपेक्षा चांगली हाताळली आणि पात्रता अव्वल खेळाडू फतेहबीर याला पराभूत करण्यात यशस्वी झाला. ऑलिम्पियन मैराज अहमद खान याने आणखी एक ऑलिम्पियन वीरसिंग बाजवा याला पराभूत करून कांस्यपदक पटकावले, तर संयुक्त पात्रता अव्वल खेळाडू मुनेक बतुला सहाव्या स्थानावर आहे. महिलांच्या स्कीटमध्ये गणेमत सेखोनने असीस छिना हिला हरवून सुवर्णपदक पटकावले. महेश्वरी चौहान व अनंतजीत सिंग नारुका या राजस्थानच्या स्कीट मिश्र सांघिक राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत या जोडीने उत्तर प्रदेशच्या मैराज अहमद खान व अरीबा खान यांच्यावर ४४-४३ असा विजय मिळवला.

### आशियाई भारोत्तोलनात मार्टिना देवीलै रौप्यपदक

**दोहा** : कतारच्या दोहा येथे आयोजित आशियाई कनिष्ठ गट भारोत्तोलन स्पर्धेत बुधवारी महिलांच्या ज्युनियर +८७ किलो गटात भारतीय लिफ्टर मार्टिना देवी हिने रौप्यपदक जिंकले. मणिपूरच्या १८ वर्षीय मार्टिनाने एकूण २२५ किलो (९६ किलो + १२९ किलो) वजन



उचलून तीन-लिफ्टर क्षेत्रात दुसरे स्थान पटकावले. तिने तिच्या क्लीन ॲण्ड जर्कमधील प्रयत्नासाठी रौप्यपदक व स्नॅचसाठी कांस्यपदक जिंकले. तिची ही कामगिरी मात्र देवीच्या वैयक्तिक सर्वोत्तम कामगिरीपासून दूर होती. या वर्षाच्या सुरुवातीला झालेल्या कनिष्ठ गट जागतिक स्पर्धेत या किशोरीने स्नॅचमध्ये १०१ किलो आणि क्लीन ॲण्ड जर्कमध्ये १३६ किलो वजन उचलून राष्ट्रीय विक्रमी कामगिरी केली होती. स्नॅच, क्लीन आणि जर्क आणि कॉन्टिनेंटल, विश्वचषक स्पर्धेत एकूण लिफ्टसाठी पदके स्वतंत्रपणे दिले जातात.

### दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान कसोटी आजपासून

**मेलबर्न** : एकाकडी २६ डिसेंबरपासून भारत व ऑस्ट्रेलिया यांच्यात चौथा कसकोटी क्रिकेट सलामना खेळला जाणार आहे, तर तिकडे सेंच्युरिअन येथे दक्षिण आफ्रिका व पाकिस्तान यांच्यात पहिला कसोटी क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी भारत, दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया हे संघ प्रबळ दावेदार मानला जात आहे. सध्या हे तिन्ही संघ गुणतालिकेत अव्वल ३ स्थानांवर विराजमान आहेत. दक्षिण आफ्रिकेचा संघ सर्वाधिक पीसीटीसह पहिल्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलियाचा संघ दुसऱ्या स्थानावर तर भारत तिसऱ्या स्थानावर आहे. या दोन सामन्यांनंतर गुणतालिकेत आणखी एक मोठी चढाओढ पाहायला मिळणार असली तरी अंतिम फेरीचे चित्रही बऱ्याच अंशी स्पष्ट होणार आहे.

### भारत मराठी विद्यालयात क्रीडा सप्ताह उत्साहात सुरु

**सोलापूर** : मजरेवाडी येथील भारत मराठी विद्यालयात क्रीडा सप्ताह मोठ्या उत्साहात सुरू झाला. याचे उद्घाटन मुख्याध्यापक एस. के. सरसंबे, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक उमाकांत तिर्थकर यांच्या हस्ते झाले. सहशिक्षिका टी.टी. वडावराव यांनी कार्यक्रम ाचे प्रास्ताविक केले. यावेळी सहशिक्षक एस. एम. ढाकणे व वाय.एम. देवणगांवकर यांनी बाल आनंद मेळावा व क्रीडा सप्हाताचे महत्त्व आपल्या मनोगतातून व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी व्यवहार ज्ञान आत्मसात करुन आपले जिवन सक्षम बनवावे असे आवाहन मनोगतातून व्यक्त केले. अध्यक्षांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. यावेळी एन. झेड. सय्यद, मुस्कान मंगळूरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका एच. ए. बागवान यांनी केले. एस. एम. शेख यांनी आभार मानले.

# बॉक्सिंग-डे कसोटीत चमकदार कामगिरी करण्यास सज्ज

### रोहितच्या फॉर्मबाबत चिंता

◆ **मेलबर्न, २५ डिसेंबर**

गुरुवारपासून भारत-ऑस्ट्रेलियादरम्यान बॉक्सिंग-डे चौथ्या कसोटी क्रिकेट सामन्याला प्रारंभ होणार आहे. ब्रिस्बेनमध्ये पाऊस व तळाच्या फळीतील फलंदाजांमुळे तिसरी लढत अनिर्णीत राहिल्यामुळे भारताचा ढासळत चाललेला उत्साह कदाचित उंचावला असेल, परंतु फॉर्मात नसलेला कर्णधार रोहित शर्माची फलंदाजीची स्थितीमुळे भारतीय संघात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

बॉर्डर-गावस्कर पाच सामन्यांच्या कसोटी क्रिकेट मालिकेत भारत व ऑस्ट्रेलिया सध्या १-१ ने बरोबरीत आहे.

नाताळाच्या पूर्वसंध्येला सराव सत्रात फटके मारणारा भारताचा कर्णधार रोहित शेवटचा खेळाडू होता. तो संघाचा सर्वात विश्वासू सलामीवीर केएल राहुलची जागा घेऊ शकतो, असा अंदाज लावला जात आहे.

तसे झाल्यास, राहुल तिसऱ्या क्रमांकावर येईल, तर शुभमन गिल मधल्या फळीत खेळू शकेल किंवा अंतिम एकादशमध्ये ध्रुव जुरेलसाठी मार्ग काढू शकेल.

२०१९ मध्ये रोहित शर्मानि सलामीच्या स्थानावर परत आल्यानंतर मधल्या फळीत फलंदाजी करणे थांबवले, परंतु



शुभमन गिल



सॅम कोन्स्टास

पहिल्या कसोटीतील शतकवीर यशस्वी जयस्वालला अंतिम एकादशमध्ये सहभागी करून घेण्यासाठी त्याने ॲडिलेड व ब्रिस्बेनमध्ये मधल्या फळीत उतरणे पसंत केले, मात्र ही चाल एक अपयशी ठरली.

आता जर रोहितला सलामीला पाठवले, तर गिलला पाचव्या क्रमांकावर फलंदाजीसाठी पाठवतात की, त्याला वगळतात, हे बघणे शिल्लक आहे.

तीन सामन्यांनंतर मालिका १-१ ने बरोबरीत आहे व हे स्पर्धेचे योग्य प्रतिबिंब आहे, परंतु मेलबर्न क्रिकेट मैदानावर स्थिती बदलू शकते, असे दोन्ही कर्णधारांना वाटते.

ॲडिलेडमधील गुलाबी चेंडूच्या कसोटीतील पराभवानंतर गॅबा येथे पावसाने प्रभावित झालेला

**भारत-ऑस्ट्रेलिया चौथा कसोटी सामना आजपासून**
**स्थळ** : मेलबर्न
**वेळ** : पहाटे ५.०० वाजतापासून
थेट प्रसारण : स्टार स्पोर्ट्सवर

अनिर्णीत सामना भारतासाठी दिलासादायक ठरला.

पण आता ऑस्ट्रेलियन संघ आपल्या आवडत्या ठिकाणी परतला आहे व या ठिकाणी २०१४ च्या मालिकेपासून ऑस्ट्रेलिया कसोटीत अपराजित राहिला आहेत.

तीन युवा खेळाडू- यशस्वी जयस्वाल, ऋषभ पंत व शुभमन गिल, आणखी एक आत्मविश्वासू सलामीवीर केएल राहुल व दिग्गज विराट कोहली याच्यासह ही फळी फारशी खात्रीशीर दिसत नाही. मात्र त्यांना ऑस्ट्रेलिया संघाविरुद्ध आपले सर्वोत्तम प्रदर्शन करावे लागेल.

रोहित शर्मासाठी कसोटी फलंदाज म्हणून त्याची स्वतःची प्रतिष्ठा पणाला लागली आहे, तर कोहलीला आपल्यातील विजेता खेळाडू दाखण्याची इच्छा आहे.

**भारतीय गोलंदाजी संयोजन**

यजमाना ऑस्ट्रेलियासाठी सर्वांच्या नजरा किशोरवयीन सॅम कोन्स्टासवर असतील. त्याला जसप्रीत बुमराहशी स्पर्धा करण्यासाठी आक्रमक खेळी करायची आहे. मात्र बुमराहने त्याचा सहकारी नॅथन मॅकस्विनीच्या कारकिर्दीला ब्रेक लावला आहे, हे कोन्स्टासने जाणून घेतले पाहिजे.

ऑस्ट्रेलियाचा ट्रॅव्हिस हेड पूर्णपणे तंदुरुस्त आहे व तो रोहितसाठी डोकेदुखी ठरू शकतो. ट्रॅव्हिस हेड बुधवारी सराव सत्रात खूप घाम गाळताना दिसला.

**प्रतिस्पर्धी संघ**

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), केएल राहुल, यशस्वी जैस्वाल, शुभमन गिल, विराट कोहली, ऋषभ पंत (यष्टिरक्षक), रवींद्र जडेजा, नितीश रेड्डी, जसप्रीत बुमराह, मोहम्मद आकाश दीप, वॉशिंग्टन सुंदर, प्रसीद कृष्णा, हर्षित राणा, तनुष कोटियन, सरफराज खान, अभिमन्यू इसवरन, ध्रुव जुरेल, देवदत्त पडिक्कल.

**ऑस्ट्रेलिया** : पॅट कमिन्स (कर्णधार), उस्मान ख्वाजा, सॅम कोन्स्टास, मार्कस लॅबुशेन, स्टीव्ह स्मिथ, ट्रॅव्हिस हेड, मिचेल मार्श, ॲलेक्स कॅरी (यष्टिरक्षक), मिचेल स्टार्क आणि स्कॉट बोलॅंड.

तापमान जवळपास ४० अंश राहण्याचा अंदाज आहे व त्यानंतर दुसरा दिवसही तितकाच गरम असेल, त्यामुळे अतिरिक्त फिरकीपटूच्या भूमिकेकडे संघ व्यवस्थापन गांभीर्याने पाहत आहे. परंतु मेलबर्नमधील अलीकडील कसोटीतील संघांवर नजर टाकल्यास, दुसऱ्या तज्ज्ञ फिरकीपटूचा पर्याय कधीही व्यवहार्य दिसत नाही.

अशा परिस्थितीत वॉशिंग्टन सुंदर, नितीश रेड्डी की आकाश दीपला विश्रांती मिळते, हे बघणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

(वृत्तसंस्था)

# सोलापुरच्या कोंढारेला रौप्य, सागर मदरी ब्रॉँझचा मानकरी



### अखिल भारतीय आंतर विद्यापीठ डायव्हिंग स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर , दि. २५ डिसेंबर-**

चेन्नई येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय अंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेतील डायव्हिंग प्रकारात बुधवारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाच्या श्रीकांत कोंढारे याने रौप्य पदक तर बाटू विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करणाऱ्या सागर मदरी याने ब्राँझ पदक पटकाविले

एस.आर.एम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ कटाणगुलतुर (तामिळनाडू) येथील जलतरण तलावावर स्पर्धा सुरू आहेत या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाचा कोंढारे याने १९५.३० गुण घेत रौप्य तर बाटू विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व करणाऱ्या ऑर्किड महाविद्यालयाचा मदरी याने ब्राँझ पदक मिळवले. सोलापूर विद्यापीठाचा वरूण दोरणाल याने १५६. ९५ गुण मिळवत पाचवा तर मयूर खलाटे ८७.२० गुण घेत अकरावा आला. मुलींच्या गटात सोलापूरच्या सिद्धेश्वर अभियांत्रिकी महिला महाविद्यालयाची सृष्टी शेटे ही ११७.६० गुण मिळवत पाचवी तर सोलापूर विद्यापीठाची शुभांगी माचर्ला ही १११.१५ गुण मिळवित सहावी आली. त्यांना प्रशिक्षक श्रीकांत शेटे, मनीष भावसार, प्रा. बाळासाहेब वाघचवरे प्रा दिपक भोसले यांचे मार्गदर्शन लाभत आहे

# राज्य कराटे स्पर्धेत सोलापूरच्या ३१ खेळाडूंना ४७ पदके

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

लातूर येथे पार झालेल्या ११व्या राज्य कराटे स्पर्धेत येथील ३१ स्पर्धकानी आपआपल्या वजनी व वयोगटात ७ सुवर्ण, १० रौप्य व ३० कांस्यपदके अशी ४७ पदके पटकवून स्पर्धेतील विजेतेपदाच सांघिक चषक पटकविला.

विजेत्यांची जानेवारी २०२५ मध्ये होणाऱ्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या कराटेपटूंना मुख्य कराटे प्रशिक्षिका, आंतरराष्ट्रीय पंच शिहान अनुराधा महादेव थोरात, सुजीत बिराजदार, सोनिया सतीशकुमार थोरात, रिया पाटील, वीर सुरा, शिवराज कलादगी, अक्षरा पंडिल्ला प्रतीक्षा सुनकारे, निशा गायकवाड, विनायक गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

**कामगिरी** : काता व कुमिते- सुवर्ण, कांस्य : वेदिका मिठाकोल, अध्या एकबोटे, सिंधुजा सिंगम, सुनाक्षी माळी. रौप्य व कांस्य : मयुरेश गुंटुक, धानेश बिराजदार, अदनान शेख, अथर्व खुणे, प्रगती पवार, समीक्षा राऊत.सुवर्ण : निरंजन हनगंडी (२), प्रणाली गुजर (सुवर्ण). रौप्य : दिलनवाज पठाण, विहारिका



पवार, ऋतुजा माळगे, अजिंक्य पवार. कांस्य : कौस्तुभ आडम, शालिनी योहान, समर्थ माळी, सच्चीदानंद येलदी, श्वेता कुणी (प्रत्येकी २), प्रथमेश चौधरी, ओंकार साखरे, विश्वराज गरड, अंशुल गुंटुक, प्रियेश सुंकपल्ली, मयांक चौधरी,आदिती पवार, माहेविश शेख, सेजल कोरे, शिवप्रिया येलदी.

# राज्य सब ज्युनिअर धनुर्विद्या स्पर्धेत सोलापूरचा दबदबा



**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

नाशिक येथे झालेल्या राज्य सब ज्युनिअर धनुर्विद्या स्पर्धेत सोलापूरने आपला दबदबा कायम ठेवला आहे.

### मुलांना रौप्य, मुली ब्रॉँझच्या मानकरी

रिकर्व्ह गटात मुलांच्या संघाने रौप्य तर मुलींच्या संघाने ब्रॉँझ पदक प्राप्त केले.

या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक दिपक चिकणे, विठ्ठल माळी, अजित वसेकर, सागर सावंत या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे उपाध्यक्ष व सोलापूर जिल्हा संघटनेचे सचिव प्रा. हरिदास रणदिवे यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी केलेला संघ**

**रिकर्व्ह प्रकार** : मुले : सिद्धार्थ साखरे , शिवम चिकले , साईराज हानमे, पृथ्वीराज घाडगे. मुली : गाथा खडके, प्रगती शिंदे, रेश्मा लोकरे, सायमा शेख. मिश्र : ब्राँझ : सिद्धार्थ साखरे, प्रगती शिंदे.

**कंपाऊंड प्रकार** : मुले- रौप्य : स्वरीत ढवण,अर्थव वसेकर, गौरव पवार, सुजित गायकवाड. मिश्र -रौप्य : स्वरीत ढवन व वैष्णवी पाटील

### व्हॅलेंटाईन स्कूलच्या राघव गज्जमची १ कि.मी. सागरी जलतरण शर्यत पूर्ण



**सोलापूर** : महाराष्ट्र व सिंधुदुर्ग जिल्हा जलतरण असोसिएशनच्या वतीने झालेल्या १४ वी राज्य सागरी जलतरण शर्यतीत व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलचा विद्यार्थी राघव नरेश गज्जम याने १ किलोमीटर शर्यत पूर्ण केली. मालवन येथे ही स्पर्धा पार पडली. त्याला प्रशिक्षक श्रीकांत दोरनाल, क्रीडा शिक्षक संतोष पाटील व लावण्या दुस्सा, शिवाजी आवताडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, उपसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर यांनी कौतुक केले.

# सेंट जोसेफ स्कूलमध्ये क्रीडा दिन, स्नेहसंमेलन उत्साहात



**सोलापूर, दि. २३ डिसेंबर-**

येथील सेंट जोसेफ स्कूलमध्ये क्रीडा दिन आणि वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. याचे उद्घाटन शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते याचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्याध्यापक फादर आनंद गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. यामधील विजेतांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली.

वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये अतुल्य भारत ही थीम घेऊन विद्यार्थ्यांनी भारतातील विविध राज्यातील पारंपारिक नृत्य सादर केले. रंगीत भारत, अखंड भारत यामाध्यमातून दर्शविन्यात आला. सर्व पालकांना मंत्रमुग्ध करणारा हा कार्यक्रम होता. मुख्याध्यापक फादर आनंद गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली पर्यवेक्षीका पद्मा नरवटे, सह शिक्षिका सौम्या कपाली आणि रोमा रोर्हा यांनी उत्कृष्ट नियोजन केले. सर्व क्रीडा स्पर्धांचे व्यवस्थापन शारीरिक शिक्षण शिक्षक सनी भोसले यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पानगल प्रशालेच्या मुलांना विजेतेपद

### शालेय फुटबॉल टेनिस स्पर्धा, मुली उपविजेत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि, २४ डिसेंबर-**

शालेय फुटबॉल स्पर्धेत एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या मुलांच्या संघाने १९ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकाविले.

मुलींच्या गटात त्यांना उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कुमठा नाका इनडोर हॉलमध्ये झालेल्या या स्पर्धेतील मुलांच्या अंतिम सामन्यात त्यांनी सेंट थॉमस प्रशालेस २-० असे नमविले. मुलींचा अंतिम सामन्यात मात्र त्यांना सेंट थॉमसकडून पराभव स्वीकारावा लागला. संघास प्रशालेचे क्रीडा शिक्षक अल्ताफ सिद्दिकी, नावेद मुनशी, इकबाल दलाल यांचे मार्गदर्शन लाभले. संघाचे प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ.सुरैय्या परविन जहागीरदार, निकहत नल्लामंदू, मो.अली शेख, सैफुल्ला शेख, मुबारक बागबान आदींनी अभिनंदन केले.

**विजयी संघ मुले :**
अयान बागवान, अबू जैद हन्नुरे, मुजम्मिल पटेल, अफवान कुतकुंडे, अब्दुल्ला पटेल.
**उपविजयी संघ मुली :**
निकहत बागवान, अलमिनाज शेख, अकसा बागवान, खतिजा शेख व असिला शेख.






# इस्माईल उर्दू विद्यालयाच्या क्रीडा सप्ताह उत्साहात सुरू

**सोलापूर, दि. २४ डिसेंबर-**

पै.म.इस्माईल अल्पसंख्या शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर, संचलित इस्माईल उर्दू स्कूलच्या क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. याचे उद्घाटन मुख्याध्यापिका मेहजबीन शेख यांच्या हस्ते ५० मीटर धावणेचे शर्यतीने सुरुवात करण्यात आली. पाटील कमरुनिसा म हयात,खेरदी बिलकिस लियाकत, शेख मेहजबीन निजाम,लुंजे परवीन इरफान अहमद,शेख उजमा मुस्ताक,शेख उमामा मुस्ताक इ सहशिक्षिका उपस्थित होते. या क्रीडा सप्ताहामध्ये खो-खो, डॉजबॉल, लंगडी,५० मीटर रनिंग रेस,लिंबू चमचा,पोत्यातील उड्या, बेडूक उड्या, बलून रेस अशा वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धा अतिशय चुरशीच्या होत आहेत. नियोजनबद्ध सुरु झालेल्या क्रीडा सप्ताहाचे संस्थेचे संस्थापक सचिव हाजी बी. एम. शेख यांनी कौतुक केले.

## संक्षिप्त वृत्त



### बार्शीतील फिनिक्स पोदार लर्न स्कूलचे यश

**बार्शी, दि. २५ डिसेंबर-**

कोणतेही क्लासेसमध्ये किंवा कोणत्याही स्पर्धेमध्ये आपल्या शाळेचा विद्यार्थी यशस्वी झाल्यावर त्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्याची अनोखी पद्धत. त्याप्रमाणे अबॅकस तृतीय पातळी स्पर्धेमध्ये बार्शीच्या अथर्व शिंदेला प्रथम पारितोषिक डिजिटल जगताप क्लासेस संचलित जगताप अबॅकस लर्निंगमार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय तृतीय पातळी स्पर्धेमध्ये बार्शीतील अथर्व अभिजीत शिंदे याने प्रथम पारितोषिक मिळवित बार्शीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. जगताप लर्निंग क्लासेस येथे पार पडलेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यात त्यास पारितोषिक प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रम प्रसाठी बार्शीतील कर्तव्यदक्ष पोलीस उपनिरीक्षक सिंधू देशमुख यांचेसह जगताप क्लासेसचे संचालक प्रा. तानाजी गलांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्यांसह जगताप अबॅकस लर्निंगच्या संचालिका सौ. प्रणाली जगताप, सहशिक्षिका सौ. अमृता पवार फिनिक्स पोदार लर्न स्कूल बार्शी अनोख्या पद्धतीने विद्यार्थ्यांचर करतात कौतुकाची थाप यांनी दिली. हनुमंत चव्हाण सर, माया सावंत मॅडम, प्रतिमा हावळे मॅडम, तानाजी अंकुशे सर जगताप क्लासेसमार्फत दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी राज्य पातळी, राष्ट्रीय पातळी तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धांमध्ये बार्शी शहर व तालुक्यासह महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवितात. अबॅकसमध्ये अतिशय अवघड मानल्या जाणाऱ्या तृतीय पातळी स्पर्धेमध्ये अथर्वने मिळविलेल्या या यशासाठी सर्व स्तरातून त्याचे कौतुक व अभिनंदन होत आहे.

### अभाविप देवगिरी प्रदेशाध्यक्षपदी प्रा. डॉ. सचिन कंदले यांची निवड

**अणदूर, दि. २५ डिसेंबर-**

अणदूरचे सुपुत्र, बीड येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात संस्कृत विभाग प्रमुख प्रा. डॉ. सचिन कंदले यांचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेशाध्यक्षपदी पुनर्निर्वाचन करण्यात आले आहे. त्यांच्या निवडीचे अणदूर परिसरातील जनतेने स्वागत केले आहे. प्रदेश मंत्री म्हणून वैभवी ढिवरे यांची पुनर्निवड करण्यात आली आहे. अभाविपच्या प्रदेश कार्यालयातून निर्वाचन अधिकारी प्रा. डॉ. राहुल कुलकर्णी यांनी केलेल्या घोषणेनुसार जबाबदारीचा कार्यकाळ एक वर्षाचा असणार असून दोन्ही पदाधिकारी २ जानेवारी रोजी लातूर येथे होणाऱ्या ५९ व्या देवगिरी प्रदेश अधिवेशनात आपली जबाबदारी स्वीकारणार आहेत. प्रा. डॉ. सचिन कंदले हे १९९२ पासून अभाविपचे सक्रिय कार्यकर्ते असून विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत ते सतत करीत असतात. पूर्वीव कार्यकर्ते ते महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष अशा अनेक पदावर त्यांनी विद्यार्थी परिषदेचे कार्य केले आहे. विद्यार्थ्यांच्या अनेक आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग नेहमी असतो. त्यांच्या निवडीबद्दल अणदूर येथील खडकाळी मॉर्निंग क्लब, जयमल्हार पत्रकार संघ व ८-फार्मा ग्रुपने अभिनंदन केले आहे.



### पंढरपूर सिंहगड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**पंढरपूर, दि. २५ डिसेंबर-**

सी.बी.एस.ई. बोर्ड अंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील सर्व सी.बी. एस.ई शाळांच्या वतीने मुलांच्या सर्व कला गुणांना, खेळाला व त्यांच्या कौशल्यात्मक व्यक्तिमत्वाला विशेष वाव व संधी देण्यासाठी सोलापूर सहोदया कॉम्प्लेक्स स्पर्धेची उभारणी केली आहे. याअंतर्गत शिवरत्न पब्लिक स्कूल अकलूज या ठिकाणी झालेल्या सोलापूर सहोदया कॉम्प्लेक्स अंतर्गत क्रिकेट स्पर्धेमध्ये सिंहगड पब्लिक स्कूलच्या १६ वर्ष वयोगटातील मुलांनी प्रथम क्रमांक मिळविला तसेच १६ वर्षे वयोगटातील मुलींनी प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. मुला मुलींच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक एम एन नवले, कॅम्पस डायरेक्टर कैलास करांडे, शाळेच्या प्राचार्या स्मिता नवले, मुख्याध्यापिका स्मिता नायर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मुला मुलींचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.या स्पर्धेसाठी मुला-मुलींना क्रीडा शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### प्रा. वैभव ऐदाळे यांना पीएच. डी प्रदान


**पंढरपूर, दि. २५ डिसेंबर-**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकारी माजी आमदार जिवाप्पा ऐदाळे यांचे पणतू असणारे प्रा. वैभव अनिल ऐदाळे यांना नुकतेच पीएचडी पदवी बहाल करण्यात आली. सध्या ते एस.पी.जैन कॉलेज राजगुरुनगर पुणे येथे इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांना डॉ. अर्जुन मासाळ यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राथमिक शिक्षण गौतम विद्यालय पंढरपूर तर महाविद्यालयीन शिक्षण उमा महाविद्यालय पंढरपूर व पदव्योत्तर शिक्षण मॉडर्न कॉलेज पुणे येथे झाले.

### राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग प्रदेश सरचिटणीसपदी तुकाराम साळुंखे-पाटील

**नातेपुते, दि. २५ डिसेंबर-**



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरद पवार सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस पदी तुकाराम साळुंखे पाटील यांची नेमणूक करण्यात आली साळुंखे हे संघटक सचिव म्हणून काम करत होते त्यांनी पक्षाचे संघटक म्हणून लोकसभा, विधान सभा यावेळेस चांगल्या प्रकारे काम केल्याने पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्ष खासदार सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, जयदेव गायकवाड, राज्यप्रमुख पंडित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तुकाराम साळुंखे पाटील यांना महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सामाजिक न्याय विभाग म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली साळुंखे हे महाराष्ट्र राज्य घडशी समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आहेत तसेच ते राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे कार्यकर्ते आहेत.

# समृद्ध गाव अभियान प्रभावीपणे राबवणार

## आ. सुभाषबापू देशमुख : सांगोला येथे स्नेहसंवाद कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्याला गतवैभव प्राप्त करण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने व सहभागातून समृद्ध गाव अभियान प्रभावीपणे राबवणार असल्याचे राज्याचे माजी सहकार मंत्री व दक्षिण सोलापूरचे आ.सुभाषबापू देशमुख यांनी सांगितले. ते सांगोला येथे आयोजित स्नेहसंवाद कार्यक्रमात बोलत होते.

पुढे बोलताना आ.सुभाषबापू देशमुख म्हणाले, सोलापुर जिल्ह्यामध्ये कृषी, सहकार, पर्यटन, उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा सर्व क्षेत्रामध्ये प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी सर्वांचे सहकार्य घेवून सोलापूर जिल्ह्याचे नाव महाराष्ट्र राज्यामध्ये अग्रेसर राहण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांनी कष्टाच्या बळावर नंदनवन फुलविले आहे.

सांगोला तालुक्यातील उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ व भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी सामाजिक कार्यातील योगदाना बद्दल आपुलकी प्रतिष्ठानचा सन्मान करण्यात आला. तसेच ॲड. गजानन भाकरे, पोपट बंडगर, मोहन मिसाळ, संजय तोडकरी, दादासाहेब खडतरे, तानाजी केदार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी विजय कुलकर्णी, सी.ए.उत्तम बनकर, डॉ. शिवराज भोसले, लोकमंगल बँकेचे शाखाधिकारी प्रविण भोसले व पतसंस्थेचे शाखाधिकारी दत्तात्रय दिवसे, कर्मचारी तसेच सांगोला तालुक्यातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक वैभव लांबोरे, सुत्रसंचलन शंभु माने, आभार विजय कुलकर्णी यांनी मानले.



### ७७ हजार वह्यांचे वाटप करणार : ॲड. गजानन भाकरे

आ. सुभाषबापू देशमुख यांच्या सत्कारासाठी हार, फेटे, शाली यापेक्षा वह्या आणण्याचे आवाहन आयोजकांनी केले होते. या आवाहनास सांगोलेकरांनी चांगला प्रतिसाद दिला. यावेळी बापू ७७ हजार मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल लोकसभागातून सांगोला तालुक्यातील शाळांमध्ये ७७ वह्यांचे वाटप करणार असल्याचे ॲड. गजानन भाकरे यांनी सांगितले.

## भाळवणीत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या गुलालाचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२५ डिसेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील श्री शाकंभरी देवी सभा मंडपात ब्रह्मचैतन्य श्री गोंदवलेकर महाराज यांच्या १११ व्या पुण्यतिथी निमित्त गुलालाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गावातील प्रमुख मार्गावरून महाराजांच्या पादुकांची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली होती. यावेळी श्रीराम जय राम जय जय राम या मंत्राच्या जयघोशाने परिसर मंत्रमुग्ध झाला होता.यावेळी भजनी मंडळींनी जागर केला. यावेळी सरपंच रणजीत जाधव,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पंढरपूर तालुका महिला अध्यक्षा राजश्री ताड, सलीम तांबोळी, आनंद देशपांडे, राजाभाऊ शिंदे, महादेव कोले, बाळू कलढोणे, सदाशिव वाघमारे, अक्षय म्हेत्रे, विलास कोले, नागनाथ निराळी, जीवन बोधे, राजाभाऊ ताड, सतीश साळवे, प्रशांत माळवदे, गजानन माने, बंडू वेदपाठक, सारंग शहाणे, गणेश मायनकर, संजय कोले व भाविक भक्तांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी जय भवानी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रम पार पाडण्यासाठी सहकार्य केले. यावेळी प्रसादाचे वाटप करण्यात आले.



## बार्शी तहसीलमध्ये ग्राहक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

बार्शी तहसिलमध्ये ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी तहसिलदार शेख, निवासी तहसिलदार मुंढे, भदे, तहसिलचे अधिकारी, कर्मचारी, तसेच बार्शी बार असोशिएनचे विद्यमान अध्यक्ष काकासाहेब गुंड उपस्थित होते.

अखिल भारतिय ग्राहक पंचायतचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष ॲड. विजय कुलकर्णी यांनी आपण अगदी परवापरवापर्यंत ग्राहक संरक्षण कायदा १९८६ असे म्हणत होतो. पण आता मात्र आपण ग्राहक संरक्षण कायदा १९८६ असं न म्हणता ग्राहक संरक्षण कायदा २०१९ असे म्हणणार आहोत. हा नवीन ग्राहक संरक्षण कायदा २०१९, २० जुलै २०२० पासून संपूर्ण भारतात अमलात आला. हा नवीन कायदा अस्तित्वात येण्याचं मूळ कारण म्हणजे १९८६ ची परिस्थिती आणि २०२० मधील आर्थिक परिस्थिती यामध्ये खूपच अंतर पडलेले आहे. एक ग्राहक म्हणून आपल्याला कोणत्या ही गोष्टीची फसवणूक झाली तर आपण सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या दरम्यान १८००११४००० किंवा १४४०४ या दोन पैकी एका हेल्पलाइनवर कॉल करून आपली तक्रार दाखल करू शकता. विजे संबंधी १८००२३३३४३५ या क्रम ांकावर तक्रार करू शकता. आपण जागृत राहा फसू नका दुसऱ्यालाही फसू देऊ नका. आपण फसला तर लगेच सर्वांना सांगा म्हणजे फसवणुकीची हि चेन लगेच तोडता येईल, असे सांगितले.



## उजनीचे पाणी तलावात सोडा

### बुक्कानवरे यांची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

गेल्या काही वर्षापासून देगांव कालव्याचे काम रखडले होते. आता मात्र त्या कामाला सुरवात होत आहे.देगांव कालव्याचे काम पुर्ण झाल्यास शेताच्या बंधाऱ्यावर पाणी सोडले जाणार आहे. त्याचप्रमाणे जेऊर, मंगरूळ व नागणसुर जिल्हा परिषद गटातील सर्व छोटे-मोठे तलाव देगाव कालव्याच्या पाण्याने भरून घेण्यासाठी प्रशासनानी सूक्ष्म नियोजन करावे. या आशेचे पत्र तहसीलदार यांच्याकडे शिवसेना तालुकाप्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आला आहे.

स्वातंत्र्यापासून अक्कलकोट तालुका हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो.एक वर्ष पाऊस पडतो. तर दोन-चार वर्ष म्हणावा तसा पाऊस पडत नाही. त्यामुळे येथील शेतकरी अनेक संघटना तोंड देत आहे यापुढे तरी शेतकऱ्यांचा नियोजन व्हायला पाहिजे. देगाव एक्सप्रेस कालव्यातून येणाऱ्या पाण्याचा नियोजन शासन व प्रशासनाने करण्याची गरज आहे. नागणसूर जिल्हा परिषदमधील नागणसूर, नाविंदगी, गौडगांव, कडबगांव, डडगी, गळोरगी, तोळणूर, हैद्रा, गुरववाडी, मराठवाडी,बासलेगांव या परिसरात असलेल्या छोटे मोठे तलाव पाण्याने भरून घ्यावा. हे शक्य झाल्यास शेतकऱ्यांचा मार्ग सुखकर होणार आहे.

कर्नाटक राज्याकडे जाणाऱ्या भिमानदीचे पाणी हिळ्ळी, खानापूर, आळगी येथे अडविण्यात यावे आणि या ठिकाणी बॅरेज बांधून पंप हाऊस लिप्ट करुन त्या पंप हाऊसद्वारे भीमा नदीचे पाणी अक्कलकोटच्या दक्षिण भागातील तलावात सोडण्यात यावे.तसेच कुरनूर धरणाते सोडण्यात येणाऱ्या उजनी धरणाचे पाणी चपळगाव, सलगर, वागदरी, मैदर्गी, दुधनी अक्कलकोट शहर परिसरातील तलावात पाणी सोडण्यात यावे. ते भरून घ्यावे. हे शक्य झाल्यास तालुक्यातील शेतकऱ्यांची प्रगती होण्यास मदत मिळेल. या सर्व म गणीचा गांभीर्यपुर्वक विचार करुन या सर्व शेतकऱ्यांच्या मागण्यावर येत्या ५जानेवारी पर्यंत सकारात्मक तोडगा निघावा.तसे न झाल्यास शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने संबधित सर्व पीडीत शेतकऱ्यांना सोबत घेऊन जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा संपर्कप्रमुख उमेश सारंग यांच्या सूचनेनुसार तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. यावेळी शरण सुरवसे, शांतवीर कळसगुंडा, शाखाप्रमुख मल्लिनाथ कल्याण, स्वामीनाथ प्रचंडे, नितीन मोरे, कांतू दरगुंडासह उपस्थित होते.





## मानेंचा वटवृक्ष मंदिरात सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

येथील फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव माने यांचा मराठा मंदिर मुंबई संचलित येथील निर्मलाराजे कन्या प्रशाला या म ाध्यमिक प्रशालेचे स्थानिक सदस्य म्हणून निवड झाल्याप्रित्यर्थ श्री. वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात महेश इंगळे यांच्या हस्ते स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देऊन सत्कार करण्यात आला.

महेश इंगळे यांनी राजीव माने हे तालुक्यातील शिक्षण प्रणालीवर विशेष लक्ष ठेवून घोरणात्मक काम करणारे व्यक्तिमत्व आहेत. याचा ध्यास घेऊनच मराठा मंदिरच्या वतीने मराठा मंदिर संचलित येथील निर्मलाराजे कन्या प्रशालेवर त्यांची सदस्य म्हणून नेमणूक करण्यात आली असल्याचे मनोगत व्यक्त करून राजीव माने यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथमेश इंगळे, संतोष जाधव-फुटाणे, संचालक चव्हाण, मारुती बावडे, बाळासाहेब एकबोटे, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, दर्शन घाटगे, तुषार मोरे, सागर गोंडाळ, विपुल जाधव, श्रीकांत मलवे उपस्थित होते.

## वाणीचिंचाळे सोसायटीच्या चेअरमनपदी सीताराम गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २५ डिसेंबर-**

वाणीचिंचाळे वि. का. सो. या संस्थेच्या चेअरमनपदी सीताराम गायकवाड यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून गोसावी व भारत कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन केले होते. त्यावेळी सिताराम गायकवाड यांचा चेअरमन नपदासाठी एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले. यावेळी मोहन झाडबुके, मंगल जाधव, बबन केंगार, महादेव घुणे, कलावती निळे, बसवंत पाटील उपस्थित होते. निवड झालेल्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा लक्ष्मण निळे, जितेंद्र गडहिरे, रघुनाथ गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मावळते चेअरमन ज्ञानेश्वर निळे व व्हा. चेअरमन भागवत लंबे यांचा सत्कार ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आला. यावेळी संतोष हेगडे, बाळासाहेब केंगार, दत्तात्रय रंगोखरे, दगडू जाधव, सचिन गायकवाड यांच्यासह गावातील ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी २०२४ मध्ये सोलापूरच्या पल्लवी नाईक यांनी मारली बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

पुणे येथे नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी २०२४ महाअंतिम प्रतियोगिता सोहळ्यात सोलापूर येथील सौ. पल्लवी राजेश नाईक (पवार) यांनी बाजी मारली व महाविजेतीचा मुकुट पटकाऊन त्या महाराष्ट्र सौंदर्य सम्राज्ञी ठरल्या. त्या सध्या मुंबई येथे वास्तव्यास आहेत.

या स्पर्धेत गुण कौशल्य फेरी, परिचय फेरी व बौद्धिक फेरी या मध्ये पल्लवी नाईक या यशस्वी ठरल्या. यामुळे ई- बाईक यांच्या कडून स्कुटी, अंबिका ज्वेलर्स कडून सोन्याची नथ व कस्तुरी फाउंडेशन कडून मुकूट व ट्रॉफी अभिनेत्री नम्रता गायकवाड, निर्माता दिग्दर्शक आदित्य बर्वे, डॉ. अनिल बिरहाडे, अभिजित बिचुकले यांच्या हस्ते देण्यात आली. ही स्पर्धा कुमारी व सौभाग्यवती या दोन गटात झाली. या मध्ये ३३ स्पर्धक सहभागी झाले होते. प्रत्येक गटात तीन क्रमांक काढून एक महाविजेती निवडण्यात आली.

पल्लवी नाईक या श्रीमंत शहाजीराजे भोसले वाचनालयाच्या अध्यक्षा सौ. शैलशिल्पा जाधव यांच्या लहान भगिनी आहेत. त्यांचे शालेय शिक्षण मॉडर्न हायस्कूल सोलापूर येथे झाले आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विजया मानमोडे, हर्षदा गायकवाड, मयुरेश महाजन, सुरेश मानमोडे, अभिजित मानमोडे, उमा इंगळे, विना वानखेडे, शोभा पारे, छाया भदाणे, स. ई. देशमुख यांनी परीश्रम घेतले.




# माढ्याचे खासदार, आमदार यांना सरत्या वर्षाने दिला निरोप

### पराभव जिव्हारी; माजी आ. शिंदेंचे आश्वासन हवेत विरले

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २५ डिसेंबर-**

सन २०२४ या वर्षाचा समारोप होत असतानाच प्रथम लोकसभेच्या व नंतर झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत विद्यमान असलेले खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर तर तत्कालीन आमदार बबनराव शिंदे हे यंदा निवडणूकीच्या रिंगणात नव्हते. त्यांनी आपला मुलगा रणजितसिंह शिंदे यांना उभे केले होते पण त्यांचा पराभव झाला. या दोघांचा पराभव हा धक्कादायक व जिव्हारी लागणारा ठरला. कारण रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी केलेले काम व आ. बबनदादा शिंदे यांनी दोन लाखाचे मताधिक्य मिळवून देतो असे दिलेले आश्वासन. परंतु प्रत्यक्ष मतदानानंतर सारे चित्रच पालटले. उलट माढ्यातून त्यांचे प्रतिस्पर्धी धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी माजी आ. बबनरावांच्या घोषणेस सुरुंग लावत तब्बल ५५ हजारांची आघाडी घेत सव्वालाखाच्या म ताधिक्याने भारतीय जनता पार्टीचे रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचा पराभव केला. खासदारकीच्या या निकालामुळे माजी आ. बबनदादा शिंदे यांनी आम दारकीच्या निवडणूकीत आपला मुलगा रणजितसिंह शिंदे याच्यासाठी व्युहनिती बदलत राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) कडून न लढता अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. आपल्या मुलाच्या रणजितसिंह शिंदे यांच्या विजयासाठी मोठी यंत्रणा उभी केली. परंतु प्रथमच निवडणूक लढवणारे पंढरपूरच्या विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांनी रणजितसिंह शिंदे यांचा पराभव केला.





**दोघेही नवखे :** माजी आ. बबनदादांचे साखर कारखान्याचे असणारे जाळे, सलग पाचवेळा आमदार म्हणून असलेला दबदबा याला धक्के देत खा. धैर्यशिल मोहिते-पाटील व आ. अभिजित पाटील यांच्या रुपाने नवीन वर्षाने आपली ईनिंग चालू केली आहे. हे दोघेही प्रथमच निवडणूक लढवून निवडून आले.

## संक्षिप्त वृत्त



### सी ग्रुप विडी घरकुल येथे अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

श्री विजय मारुती देवस्थान सी ग्रुप विडी घरकुल येथे प्रभाग क्रमांक १०च्या वतीने माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या शतक महोत्सव जयंतीनिमित्त सुशासन दिवस म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी त्यांच्या प्रतिमेच्या पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा कार्यकर्ते विजय इप्पाकायल, भाजपा शहर कार्यकारणी सदस्य रुचिरा मासम, शरद वन्नम, रमेश सुंचु, राजू पानगंटी, राजेंद्र मासम, कल्याण आडम, किशोर मार्गम, संतोष सामल, बाळू ताटी, नवल जागीलम, राजू गुर्रम, प्रकाश साई, सुधीर गोसावी आदी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.



### मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, भालचंद्र साखरे आदी उपस्थित होते.



### सुरवसे बालक मंदिरमध्ये नाताळ सण साजरा

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सुरवसे बालक मंदिरमध्ये नाताळ हा सण आनंद उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सुरवसे बालक मंदिर विभागाच्या विश्वस्त राखी सुरवसे व मुख्याध्यापिका शुभांगी लोखंडे, सहशिक्षक कुलकर्णी, खान, ओहोळ तसेच कर्मचारी रतन गोरे व सोनाली जगताप आदी मान्यवरांची उपस्थिती होती. मोठया गटातील अनस बागवान, असद पठाण, सुरज लायने, आर्यन नरोटे हे विद्यार्थी सांथा क्लॉज व हुमेरा पटेल ही विद्यार्थिनी मेरी या वेशभूषेत तयार होऊन आले होते. सर्व विद्यार्थी स्टार बनवून आणले होते. सर्व शिक्षकांनी मिळून ख्रिसमस ट्रीची सजावट केली होती. विश्वस्त राखी सुरवसे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना केकचा खाऊ वाटप करण्यात आला.

### ३१ डिसेंबरला पेन्शनर्स असोसिएशनची सभा

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनची वार्षिक सभा व स्नेह मेळावा मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी गणेश सभागृह, विकास नगर, होटगी नाका येथे सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा कोषागार अधिकारी रणजित कदम, रामकृष्ण डंके, डॉ. कौस्तुभ तांबेकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कोषागार अधिकारी रणजित कदम भूषविणार आहेत. तरी सर्व सदस्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष स.वा.उंब्रजकर, उपाध्यक्ष जी.टी.जाधव यांनी केले आहे.

# नववर्षी 'पांडुरंगा'च्या दर्शन मंडपाचा पाठपुरावा

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा संकल्प

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या श्री विठ्ठल-रूक्मिणी मातेच्या आषाढी वारीसाठी प्रतिवर्षी १५ लाखाच्याही पुढे वारकरी पंढरीत येतात आणि त्यांची दर्शनासाठीही रांग खूप दूरवर जात असल्याने आणि त्यांचे कधी ऊन तर कधी पावसात हाल होत असल्याने नवीन वर्षाच्या प्रारंभीच दर्शन मंडपाचा पाठपुरावा करून काम चालू करणार असल्याचा दृढसंकल्प जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना दिला.

भविष्यात वारकऱ्यांसाठी मोठा दर्शन मंडप अन् दर्शन रांगेत जागोजागी वेटींग हॉल उभारणी करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी आषाढीसोहळा पार पडताच माध्यमांना दिली होती. यासाठी मुख्यमंत्र्यांनी १०० कोटीचा निधी देण्याची घोषणाही केल्याचे त्यांनी सांगितले होते. यामुळे आता या दर्शन मंडपासाठी पाठपुरावा करणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. जुलैमध्ये पार पडलेल्या आषाढी वारीत जिल्हाधिकाऱ्यांनी अत्यंत सुक्ष्म



नियोजन करून निर्विघ्नपणे हा सुखसोहळा पार पाडला होता; यामुळे दिंडी सोहळ्याचे प्रमुख आणि तमाम वारकऱ्यांनीही जिल्हाधिकाऱ्यांचे कौतुक केले होते.

आषाढी वारीतील आलेले विविध अनुभव, सध्याच्या वारकऱ्यांसाठी असलेल्या सोयी-सुविधा, भविष्यात पंढरीत करावयाची विकासकामे याबाबत सुक्ष्म अभ्यास करून जिल्हाधिकाऱ्यांनी नववर्षाचा वरील संकल्प सोडला आहे. प्रशासनाच्या माध्यमातून आम्ही पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी तब्बल २ महिन्यापासून नियोजन करीत होतो. अनेक अधिकाऱ्यांसोबत बैठका झाल्या. दिंडीसोहळे येण्यासाठी पालखी मार्गात सुधारणा करणे, रस्ते दुरूस्त करणे, वारकऱ्यांच्या मुक्काम स्थळी सुविधा पुरविणे, त्यांच्यासाठी फिरते शौचालय, औषधे आदींसह इतरही काही सुविधांचा म ायक्रोप्लॅनिंग केला होता. वारीतही आलेल्या प्रत्येक वारकऱ्यांना श्रींचे लवकर, सुलभ दर्शन व्हावे यासाठी शक्य तितक्या सोयी देण्याचा प्रयत्न आम्ही केला. आषाढीच्या अगोदरपासूनच श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची ३ ते ४ किलोम ीटरची रांग लांगली होती. या लोकांसाठी पाणी बॉटल्स, ओआरएस ज्युसच्या बॉटल्सची सोय केली होती. यामुळे वारकरी बांधवांतून समाधान व्यक्त होत होते. आता दर्शन मंडपाची सोय केल्यास भाविकांना कितीही वेळ रांगेत थांबावे लागले तर त्यांचे हाल होणार नाहीत, अशी भावनाही जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी बोलून दाखविली.

पंढरीतील चंद्रभागा वाळवंट, ६५ एकर परिसरात भाविक मोठया प्रमाणात येतात, या परिसरात वारकऱ्यांना, भाविकांना, महिलांना स्वच्छतेची सुविधा देण्याबरोबर अजून काही नाविण्यपूर्ण करता येते का? याबाबतही प्रशासनाचा विचार चालू असतो. एकंदरीत, आम्ही स्वच्छ वारी, सुंदर वारी करण्यासाठी कायम प्रयत्नशील असतो. दिंडी सोहळ्याद्वारे




# कुचन प्रशालेत स्पेस ऑन व्हील्स बस

### इस्त्रो आणि विज्ञान भारती यांचा संयुक्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

पद्मशाली शिक्षण संस्थेच्या वतीने स्पेस ऑन व्हील्स हा उपक्रम गुरुवार, २६ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत कुचन प्रशालेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे.

स्पेस ऑन व्हील्स ही विशेष बस देशभर फिरविण्यात येते. या बसमध्ये इस्त्रोद्वारे निर्मित विविध प्रक्षेपक, उपग्रह, चांद्रयान, मंगलयान यांचे प्रतिकृती, दळणवळण व्यवस्था, दूरसंचार आदी माहिती देण्यात येणार आहे. तरी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विज्ञानप्रेमी शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी भेट देऊन लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे सचिव दशरथ गोप यांनी केले आहे.

# बेलाटी येथे सोमवारी सामूहिक दर्श वेळाअमावस्येचे आयोजन

### बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

बेलाटी (ता. उत्तर सोलापूर) येथे सोमवारी सामूहिक दर्श वेळाअमावस्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती येथील सद्गुरू संत बाळूमामा मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील यांनी दिली.

रविवार दि. २९ डिसेंबर रोजी चार वाजून एक मिनिटांनी अमावस्या येत असल्याने व सोमवारी ३.५६ वाजता अमावस्या जात असल्याने सोमवारी वेळअमावाश्या करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यादिवशी जोड गव्हाची खीर सजगुर पिठाचे उंडे, विविध भाज्यांचे एकत्र केलेले भज्जी, आंबील, खिचडी अशा विविध पदार्थांचे मेजवानी सद्गुरू संत बाळूमामा मंदिर परिसरात आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर शहर व परिसरातील नागरिकांना ज्यांच्याकडे शेती नाही अशा शेतकऱ्यांना व ज्यांना शेताला जाणे शक्य नाही, अशा नागरिकांना वेळा अमावस्येच्या सणानिमित्त आस्वाद घेता यावा, या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे पाटील यांनी यावेळी सांगितले.

पुणे-विजयपूर या राज्य महामार्गावरील बेलाटी येथील सद्गुरु बाळु मंदिरात या दिवशी सामूहिक पूजाही करण्यात येणार आहे. तसेच नुकत्याच दत्त जयंतीदिनी ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, शिर्डी साईबाबा, अक्कलकोटचे स्वामी समर्थ, शेगावचे गजानन महाराज यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आले असून याबरोबरच जागृत देवस्थान सद्गुरू संत बाळूमामा यांचे दर्शनही या निमित्ताने होणार आहे.

# ४७ शाळांतील १४ हजार विद्यार्थ्यांनी रंगविले चित्र



### साने गुरुजी पतसंस्थेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्यावतीने आयोजित रंगभरण स्पर्धेत चौदा हजार विद्यार्थी सहभागी झाल्याची माहिती पतसंस्थेचे संचालक सुनिल चव्हाण यांनी दिली.

साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांसाठी रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत ४७ शाळेतील १४ हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. मनोरंजनात्मक व स्वच्छतेचा सामाजिक संदेश देणाऱ्या चित्रांचा समावेश करण्यात आला होता. पहिली व दुसरी प्रथम गट, तिसरी व चौथी गट दुसरा, पाचवी ते सातवी तिसरा गट अशा तीन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. प्रत्येक गटातुन प्रथम, द्वितीय, तृतीय व दोन उत्तेजनार्थ क्रमांकाने यशस्वी विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार आहे. नितिन खिलारे यांनी या स्पर्धेचे परिक्षक म्हणुन काम पाहिले. स्पर्धा सशस्वी करण्यासाठी आप्पाराव इटेकर, भीमराया कापसे, विरभद्र यादवाड, सचिन चौधरी, विनोद आगलावे, मुरलीधर कडलासकर, उल्हास बिराजदार, भाऊसाहेब मोरे, जयंत गायकवाड, धनाजी मोरे, शिवानंद हिरेमठ,

# आज उजनीतून पाणी सोडणार; भीमा नदी काठच्या नागरिकांना सावधनतेचा इशारा

### जिल्हा आपत्ती विभागाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

भीमा नदीवरील पिण्याचे पाणी आवर्तन क्र. १ उद्या दिनांक २६ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता उजनी धरणाच्या सांडवा द्वारांमधून सुरुवातीस २००० इतका विसर्ग सोलापूर महानगरपालिका, पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा नगरपरिषद व भीमा नदीकाठच्या ग्रामपंचायतींच्या पाणी पुरवठा योजनांसाठी सोडण्यात येणार आहे. तसेच सदर विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येणार आहे. यामुळे भीमा नदीकाठच्या सर्व नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती विभागाकडून करण्यात आले आहे.

जलसंपदा विभाग (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांचे मान्यतेनुसार भीमा



नदीवरील पिण्याचे पाणी आवर्तन क्र. १ उद्या गुरूवारी सकाळी ९ वाजता उजनी धरणाच्या सांडवा द्वारांमधून सोडण्यात येणार आहे. तसेच सदर विसर्गामध्ये आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने वाढ करण्यात येणार आहे. तरी भीमा नदी काठच्या सर्व नागरीकांनी नदीपात्रात कोणीही उतरू नये आणि नदी मधील शेती पंप, नदी काठचे शेती अवजारे व तत्सम साहित्य अथवा जनावरे असल्यास तात्काळ हलविण्यात यावेत. यामुळे सखल भागातील संबंधित नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असेही आवाहन पाटबंधारे विभागाकडून करण्यात आले आहे.

# दहा लाखांसाठी विवाहितेचा छळ

### कोल्हापूरच्या पतीसह तिघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

घर घेण्यासाठी माहेरून १० लाख रुपये आणावेत म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या कोल्हापूरच्या पतीसह तिघांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सायली प्रितम वाडेकर (वय ३४, रा. गावकर गल्ली, दत्त मंदीराजवळ, कसबा वाळवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, प्लॉट नं. ५०८/ बी विंग, कल्पवृक्ष सोसायटी, कासरा आंबोली, पुणे सध्या रा. स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन प्रितम अनिल वाडेकर, सासू सरला अनिल वाडेकर, सासरे अनिल शांताराम वाडेकर (रा. गावकर गल्ली, दत्त मंदीराजवळ, कसबा



वाळवे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, प्लॉट नं. ५०८/ बी विंग, कल्पवृक्ष सोसायटी, कासरा आंबोली, पुणे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२ मार्च २०१९ ते २२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सायली वाडेकर या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती प्रितम व त्याच्या आई वडीलांनी सायली हिस वारंवार घालून पाडून बोलून अश्लिल भाषेत शिवीगाळ करून तु आमच्या लायकीची नाही, तुझी आम्हांला गरज नाही, आमची मुलगी ठेव व तु तुझ्या आई वडीलांकडे जा असे म्हणून तिचा छळ केला. आम्ही जिथे राहतो तिथे आम ची तुझ्यामुळे बदनामी झाली आहे, त्यामुळे आम्ही दुसरीकडे घर घेणार आहोत, त्यासाठी तुझ्या आईवडीलांकडून १० लाख रुपये आणून देत असे म्हणून सायली यांचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार बर्हिजे पुढील तपास करीत आहेत.

# खुशखबर ! अंगणवाडी ताईंना मिळणार प्रोत्साहन भत्ता

### शासनाकडे लवकरच प्रस्ताव वर्ग करणार

### बाल विकास अधिकारी दीपक ढेपे यांची माहिती

### अंगणवाडी पोषण अभियान अंतर्गत समाविष्ट केलेल्या माहितीची होणार तपासणी

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूर शहर जिल्ह्यात कार्यरत असणाऱ्या विविध प्रकल्पाच्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना लवकरच त्यांच्या कामाचा मोबदला प्राप्त होणार आहे. पोषण ट्रॅकर ॲपमध्ये समाविष्ट केलेल्या माहितीच्या आधारे सेविका यांना ५०० तर मदतनीस यांना २५० रुपये प्रोत्साहन भत्ता लवकरच त्यांच्या

**सोलापूर शहरी भागातील अंगणवाडी पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना देय प्रोत्साहन भत्ता तक्ता**

| क्र. | प्रकल्पाचे नाव | पद | पात्र संख्या | दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | सोलापूर शहर पूर्व | सेविका | १,४९० | ५०० | ७,४५,००० |
| | | मदतनीस | ७५१ | २५० | १,८७,७५० |
| २) | सोलापूर शहर पश्चिम | सेविक | १,०२२ | ५०० | ५,११,००० |
| | | मदतनीस | ७६७ | २५० | १,९१,७५० |

बँक खात्यावर वर्ग केला जाणार आहे. त्यासंबंधी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या याद्या तयार करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच यादी पूर्ण करून शासनाकडे वर्ग करण्यात येईल, अशी माहिती नागरी सोलापूर शहर पश्चिमचे बालविकास प्रकल्प अधिकारी दीपक ढेपे यांनी दिली.

दरम्यान, शासनाच्या विविध योजना अंतर्गत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना कामकाज करावयाचे असते. कुपोषण जनजागृती, आरोग्य शिबिर, नवजात बालकांची व माता पालक यांची माहिती घेणे, कुपोषित बालकांची माहिती घेणे, शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रसारित करणे. सदरची माहिती पोषण ट्रेकर ॲपमध्ये समाविष्ट करणे. त्याच पद्धतीने आपल्या प्रभागातील लोकसंख्ये विषयी माहिती देणे. अशी विविध कामे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना करावे लागतात. त्याशिवाय अंगणवाडी मध्ये येत असलेल्या बालकांना शालेय पोषण आहार वितरित करणे, तसेच सुका खाऊ (टी.एच.आर.) माता पालक आणि बालकांमध्ये वितरित करणे. तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या अंतर्गत येणारी विविध कामे आणि योजना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे कामकाज देखील यांना करावे लागते. लाडकी बहीण योजनेचे अर्ज देखील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्यामार्फत भरण्यात आले. अशा विविध प्रकारची कामे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना पार पाडावे लागतात त्यासाठी, शासनाकडून त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी काही ठराविक रक्कम इन्सेंटिव्ह म्हणून वितरित केली जाते. सदरचा निधी खात्याकडे वर्ग करण्यात आला असून, यादी प्राप्त झाल्यानंतर संबंधित सेविका आणि मदतनीस यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा होणार आहे.

**यादी बनवण्याचे काम अंतिम टप्प्यात**

सोलापूर शहरी भागातील पूर्व व पश्चिम या केंद्रातील प्रोत्साहन भत्त्यासाठी पात्र असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची यादी तयार करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच शासनाकडे ही यादी आणि प्रस्ताव वर्ग करण्यात येईल. त्यानंतर संबंधित सेविका व मदतनीस यांच्या बँक खात्यावर प्रोत्साहन भत्त्याचा निधी वर्ग होईल.

**- दीपक ढेपे, बालविकास प्रकल्प अधिकारी सोलापूर शहर पूर्व पश्चिम**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : धाराशीव जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांनी दैनिक तरुण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी कार्यकारी संचालक तथा मुख्य समुह संपादक दिलीप पेठे, मुख्य संपादक प्रशांत माने यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, धाराशिव जिल्हा प्रतिनिधी प्रमोद राऊत, पत्रकार श्रीनिवास साळुंके उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



स्व. महेंद्रभाई शाह



श्री सौरभ शाह

### स्व. महेंद्र शाह स्मृती गौरव पुरस्कार सौरभ शाह यांना जाहीर

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सोलापूर गुजराती मित्र मंडळाचे माजी अध्यक्ष व ट्रस्टी स्व. महेंद्रभाई लक्ष्मीचंद शाह यांच्या स्मरणार्थ गत सात वर्षापासून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील नामांकित गुजराती व्यक्तींना पुरस्कार देण्याची सुरुवात करण्यात आली. यावर्षीचा पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार व साहित्यकार सौरभ शाह (मुंबई) यांना जाहीर करण्यात आला आहे. मंडळाचे अध्यक्ष मुकेश मेहता यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सचिव जयेश पटेल यांनी दिली आहे. हा पुरस्कार वितरण कार्यक्रम रविवार दि. २९ डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता गुजरात भवनच्या हॉलमध्ये होणार आहे.

### रविवारी पद्मशाली समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

श्री वेंकटेश्वर पद्मावती मॅरेज ब्युरो सोलापूरच्या वतीने रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी पद्मशाली समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती संयोजक दिगंबर इप्पलपल्ली यांनी पत्रकार परिषदेत दिली. अक्कलकोट रोडवरील अक्षय ग्रँड, गांधीनगर येथे हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातील सुमारे इच्छुक १८० वधूवरांनी नाव नोंदणी केली आहे. या मेळाव्यासाठी नाव नोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी श्री व्यंकटेश्वर पद्मशाली मॅरेज ब्युरो, मनपा शाळा क्रमांक ६ शेजारी, जोड बसवांना चौक सोलापूर येथे ( ९० २८ ३३ १४ ६३ ) येथे संपर्क साधावा, असे आवाहन दिगंबर इप्पलपल्ली यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत व्यंकटेश दोंता, रमेश अन्नदास, मुरली धारा, जयश्री सामल, श्रीनिवास सामल आदी उपस्थित होते.

### शहर मुख्याध्यापकांसाठी उद्या कार्यशाळा

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

माध्यमिक शिक्षण विभाग व शहर मुख्याध्यापक संघाच्यावतीने शहर मुख्याध्यापकांसाठी शुक्रवार दि. २७ डिसेंबर रोजी तुळजापूर वेस येथील सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकल कॉलेजमध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण केंद्राचे डॉ. प्रभाकर बुधाराम हे मुख्याध्यापकांचे प्रशासकीय कामकाज, कार्यपद्धती व अडचणी या विषयावर डॉ.नेहा जोशी या ताणतणावाचे नियोजन या विषयावर, बी.जी. कुलकर्णी हे शिक्षक भरती प्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यांच्यासह अन्य महत्त्वाच्या विषयावर माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, माजी राज्य अध्यक्ष सुभाष माने, राज्य अध्यक्ष तानाजी माने आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी शहरातील शाळेच्या मुख्याध्यापकांनी कार्यशाळेस उपस्थित रहावे, असे आवाहन शहर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विद्यानंद स्वामी यांनी केले आहे.

### अशासकीय लिपिक टंकलेखक पदासाठी भरती एक जानेवारीला

**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात लिपिक-टंकलेखकाचे अशासकीय एक पद भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह बुधवार, दि. १ जानेवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. सदर पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. या पदाकरीता उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन व संगणक हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. हे पद फक्त माजी सैनिक संवर्गातून भरण्यात येणार आहे. तसेच सदर पदाकरीता सैन्यातील लिपिक संवर्गातील माजी सैनिकास प्राधान्य देण्यात येईल. तरी जिल्यातील माजी सैनिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तुंगार यांनी केले आहे.

# सर्वत्र सुख, शांती अन् समृद्धी नांदू दे

**● रेव्हरंड फादर सुपर्ण कुमार घाटे; नाताळ सणानिमित्त दि फर्स्ट चर्चमध्ये आनंदोत्सव**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर**

नाताळ (ख्रिसमस) सणानिमित्त रंगभवन येथील दि फर्स्ट चर्चमध्ये सकाळी नऊ वाजता मोठ्या उत्साही वातावरणात नाताळची प्रार्थना करण्यात आली. यावेळी चर्चचे फादर रेव्हरंड फादर सुपर्णकुमार घाटे यांनी ख्रिस्ती बांधवांकडून प्रार्थना करून घेतली. त्यानंतर उपस्थित जनसमुदायाला शांती आणि एकतेचा संदेश दिला.





पुढे ते म्हणाले की, पवित्र परमेश्वर सर्व प्रथम आम्ही तुम्हा धन्यवाद देतो. आम्ही आज पहिली उपासना करत आहे. भक्ती प्रत्येक कुटंबावर दयेची पाखर असू देत. सर्वत्र सुख शांती समृद्धी नांदू दे. आज तुझा जन्म प्रत्येक मानवासाठी झाला आहे. जगभर हा नाताळ सण साजरा केला जातो आहे. सर्वांना तुझे आशीर्वाद राहू देत. प्रार्थना करतो, की आमचा शहर जिल्हा आणि देश सुखी कर. सर्वांना उल्हासित आणि आनंदित कर. हा दिवस आनंदाचा आणि उत्साहाचा ठरू देत. प्रत्येक मानवासाठी आम्ही प्राथर्ना करत आहे. सर्वांवर दया आणि वरदहस्त टिकून ठेव हीच प्रार्थना करण्यात येत आहे. प्रभू येशू ख्रिस्त तुझ्या चरणी हे मागणं मागत आहे. आजच्या दिवसाचे आशीर्वाद मिळू देत. प्रकाश मय आणि आनंदात जीवन प्रदान कर, अशी प्रार्थना यावेळी दी फर्स्ट चर्चचे रेव्हरंट फादर सुपर्णकुमार घाटे यांनी केली. दरम्यान, ८ ते १६ वचणातून प्रभूच्या जन्माची सुवार्ता कळवली आहे. ख्रिस्ताच्या जन्माने सर्वत्र हीच सुवार्ता पोहोचली आहे. देवदूत स्वर्गात देवाचा संदेश देत आहे. परमेश्वराने मनुष्यला देवदूताच्या माध्यमातून सुवार्ता कळवली आहे. सर्व जगाला सौख्य लाभू दे, लहान थोर वयस्कर आजारी अशा विविध व्यक्तींना आधार दे. अशी प्रार्थना त्यांनी यावेळी केली. प्रार्थनेनंतर सर्व समुदायांनी फादर सुपर्ण कुमार घाटे यांना नाताळाच्या शुभेच्छा देत हस्तांदोलन केले. तत्पूर्वी चर्चमध्ये प्रभू येशूच्या गीतांचे सामूहिक सादरीकरण करण्यात आले. यावेळी ख्रिस्ती बांधवांनी गीतांमधून प्रभू येशूच्या चरणी प्रार्थना केली.

**ख्रिसमस रॅलीचे आयोजन**

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षीही नाताळ सणानिमित्त दि फर्स्ट चर्चच्या वतीने ख्रिसमस सेलिब्रेशन करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात येते. चर्चपासून सात रस्ता मार्गे पुन्हा चर्च येथे ही रॅली विसर्जित झाली. रॅलीमध्ये आबालवृद्ध ख्रिस्ती बांधवांनी प्रभू येशूच्या गाण्यावर ठेका धरला. चर्च परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई तसेच प्रभुच्या जन्माचे ठिकाण अर्थात गोठ्याचे देखावा साकारण्यात आला होता. यावेळी ख्रिसमस रॅली मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.



# विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या प्रवेशद्वाराचे दार चांदीने मढविण्याचे काम सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ डिसेंबर-**

येथील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचे दार चांदीने मढविण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. यामुळे सध्या येथून भाविकांना प्रवेश बंद असून मुखदर्शनाची रांग देखील रस्त्यावरून सुरू करण्यात आली आहे.

श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुरू असून या अंतर्गत संत नाम देव पायरीवरील पितळी दरवाजा चांदीचा बनविण्याचा ठराव मंदिर समितीच्या बैठकीमध्ये करण्यात आला होता. दरम्यान नांदेड येथील अरगुलकर परिवाराच्यावतीने सदर दरवाजास चांदी बसवून देण्यात येत आहे. यासाठी तीस किलो चांदी लागणार असून याची किंमत जवळपास तीस लाख रूपये आहे. शंकर व नरसिमलू या बंधूंनी आपले वडील स्व. दिगंबर तुकाराम अरगुलकर व आई स्व. जनाबाई यांच्या स्मरणार्थ हा दरवाजा चांदीचा केला आहे. अरगुलकर परिवार श्री विठ्ठल रूक्मिणीचे निस्सीम भक्त आहेत. त्यानुसार मागील आठ दिवसापासून सदर काम सुरू आहे. यामुळे येथून भाविकांना प्रवेश बंद ठेवण्यात आला आहे. येत्या आठ दिवसात सदर काम पूर्ण झाल्यानंतर मंदिराच्या प्रवेशद्वाराला मोठी झळाळी मिळणार आहे.

# पंढरपूर येथे संत विद्यापीठ स्थापन करावे : डॉ. अनिल सर्जे

**मुख्यमंत्र्यांकडे केली मेलद्वारे मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

भारताची वाटचाल विश्वगुरू होण्याकडे सुरू आहे. यामध्ये महाराष्ट्राच्या संतांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये संतांची भूमिका महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात अनेक पंथांच्या संतांनी कार्य केले आहे. या कार्याचा परिचय महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना होण्याची गरज आहे. पंढरीचा विठ्ठल महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे.

भक्त पुंडलिकाला भेटण्यासाठी पंढरीनाथ पंढरीत विराजमान आहे. पांडुरंगाच्या दर्शनासाठी शेकडो वर्षांपासून संत तसेच भाविक भक्त सदैव येत असतात. अनेक संतांनी आपली सेवा पांडुरंगाच्या चरणी समर्पित केली आहे. संत साहित्य महाराष्ट्राची खऱ्या अर्थाने संपत्ती आहे. ही संपत्ती आपल्याकडे असून त्याचा आनंद घेण्याचे ज्ञान आपल्याकडे नाही. संत साहित्याचा आनंद सर्वांना प्राप्त व्हावा यासाठी संत विद्यापीठाची अत्यंत गरज आहे. मराठी संत साहित्याचा अनुवाद जगातील सर्व भाषेत झाला पाहिजे. अनुवादित ग्रंथ प्रकाशित झाले पाहिजेत. हे ग्रंथ जगातील सर्व ग्रंथालयात पोहोचले पाहिजेत. सर्व विद्यापीठामध्ये या ग्रंथांचा अभ्यास सुरू झाला पाहिजे. संत साहित्याच्या संशोधनाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. संत साहित्याचे जतन व्हावे. तसेच याचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी पंढरपुरात संत विद्यापीठाची स्थापना व्हावी अशी मागणी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अनिल काशीनाथ सर्जे, सोलापूर यांनी केली आहे.




# सिद्धेश्वर मंदिर परिसरात रंग-रंगोटीच्या कामास वेग

**● विद्युत रोषणाईचे काम अंतिम टप्प्यात; सिद्धरामेश्वर महाराज यात्रेची लगबग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२५ डिसेंबर-**

सोलापूरचे ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराजांची यात्रा दृष्टीक्षेपात आली असून, यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरात सर्व जय्यत तयारी सुरू झालेली आहे. यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरास रंगरंगोटीचे कामकाज सुरू झाले आहे. मंगळवार (दि.२४) डिसेंबर रोजी सिद्धेश्वर मंदिरास रंग लावण्याचे काम सुरू झाले आहे. यात्रेच्या पूर्वी हे कामकाज पूर्ण होईल, असे पेंटर मनोज कडाळे यांनी सांगितले.

दरम्यान, यात्रेच्या अनुषंगाने शहरातील विविध मंदिर आणि मंदिर परिसरात रंग-रंगोटीचे कामकाजास सुरुवात करण्यात आली आहे. जुने सिद्धेश्वर, रेवणसिधदेश्वर मंदिर व परिसरात रंगरंगोटी पूर्ण करण्यात आली आहे. तर आता सिद्धेश्वर मंदिर रंगवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमटीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील श्री सिद्धेश्वर मंदिर, रेवणसिद्धेश्वर मंदिर, जुने सिद्धेश्वर मंदिर, गुरुभेट, तसेच सिद्धेश्वर महाराजांनी शहरात स्थापित केलेल्या ६८ शिवलिंग आणि अष्टविनायक मंदिरांना रंग दिला जातो. यात्रेच्या अनुषंगाने दरवर्षी एक महिना अगोदर या कामकाजास सुरुवात होते. त्याच पार्श्वभूमीवर श्रीदत्त जयंती पासून या कामकाजाला सुरुवात झाली आहे. त्याचप्रमाणे सिद्धेश्वर मंदिराचा आकर्षक विद्युत रोषणाई केली जाते. त्याचे काम देखील अंतिम टप्प्यात आले आहे. मंदिराच्या दर्शनी भागात लाइटच्या माळा लावण्याचे काम पूर्णत्वास आले असून, नव्या वर्षी म्हणजेच (दि.१) जानेवारी २०२५ रोजी ही विद्युत रोषणाई सुरू होईल, असे यावेळी सांगण्यात आले.



**९०० लिटर रंगांचा होतोय वापर**

ग्रामदैवत सिद्धेश्वर यात्रेनिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील रंगरंगोटी केली जात आहे. कालपासून सिद्धेश्वर मंदिराची रंगरंगोटी सुरू केली आहे. यात्रेचे विधी सुरू होण्यापूर्वी हे कामकाज पूर्ण होईल. यासाठी १६ कामगार काम करत आहेत. रंगकामासाठी सुमारे ८०० ते ९०० लिटर रंग लागतात. त्यामध्ये ऑइल बॉण्ड, ऑइल पेंट, प्रायमर, अपेक्स अल्टिमा, असे विविध रंगांचा समावेश आहे. यात्रेच्या अगोदर रंगकामाचे काम पूर्ण केले जाते. एक सेवा म्हणून श्रींचे काम गेल्या अनेक वर्षांपासून करत आहे. सकाळपासून ते संध्याकाळ पर्यंत हे काम सुरू राहते.

**- मनोज कडाळे, पेंटर.**

# सोलापुरात उद्यापासून वैकुंठोत्सव

**● पुज्य श्री घनश्यामचार्यजी यांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दिनांक २६ डिसेंबर-**

परमपूज्य जगद्गुरू रामानुजाचार्य श्री झालरिया पीठाधिपती श्री श्री १००८ पूज्य श्री घनश्यामचार्यजी स्वामी यांच्या प्रेरणेने व आश्रयाने अखिल कोटी ब्रह्माण्ड नायक श्री व्यंकटेश भगवान आणि दास हनुमानजी महाराजांच्या अपार कृपेने वैकुंठोत्सव २७ ते २९ डिसेंबर दरम्यान सम्राट चौक येथील महेश नगर येथे साजरा करण्यात येणार आहे.



येथील भुतडा कुटुंबियातील वै.गोपीलालजी व वै. श्यामसुंदरजी यांचा वैकुंठउत्सव साजरा करण्याचे भाग्य श्रीनिवास विष्णुदास भुतडा तसेच लक्ष्मीकांत अनिकेत सोमाणी यांना लाभले आहे. श्री रामानुज पंथावर श्रद्धा असलेल्या श्री वैष्णवांना श्री रामानुजदास म्हणतात. असा श्री वैष्णव नश्वर देहाचा त्याग करून परमपद मार्गाने श्री वैकुंठ लोकाची प्राप्ती करतो. तेव्हा भगवान श्री वैकुंठनाथ स्वतः आपल्या सेवक आणि पार्षदांसह या जीवाचे उत्सवाच्या रूपात स्वागत करतात आणि त्यांना आपल्या शरणी घेतात. त्यावेळी आपण या पृथ्वीतलावरचा सण ''श्री वैकुंठोत्सव'' साजरा करून अनुभवतो. आचार्यांच्या परंपरेनुसार हा उत्सव साजरा करण्याची परंपरा असल्याचे धर्मग्रंथात नमूद आहे. असे उत्सव साजरे केल्याने आत्मा ऐहिक बंधनातून मुक्त होऊन भगवंताचा आश्रय घेतो.

## दुचाकीवरून पडून तरूणाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

जिल्ह्यातील मोहोळ ते वाकाव रोडवर दुचाकीवरून पडून तरूणाचा मृत्यू झाला. ही घटना २४ डिसेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास घडली.

सयाजी गणेश जाधव (वय २१, रा. वाकाव, ता. माढा) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. सयाजी जाधव हा २४ डिसेंबर रोजी रात्री नऊच्या सुमारास मोहोळ ते वाकाव या रस्त्याने दुचाकीवरून जात होता. त्यावेळी वाकावच्या अलीकडे रस्त्यावरील रोडच्या बाजूला पडलेल्या दगडावर दुचाकी आदळून जाधव हा खाली पडून जखमी झाला. या अपघातात जाधव याच्या डोक्यास गंभीर मार लागल्याने त्यास उपचारासाठी मामा किशोर भोसले यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी सयाजी याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. शीतल कुमार यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# कल्याण नगरात तरूणावर चाकूने खूनी हल्ला; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर -**

शहरातील जुळे सोलापुर परिसरातील कल्याण नगरमधील झेंड्याच्या कट्ट्याजवळ तरूणावर चाकूने हल्ला करून ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विमल प्रकाश माने (वय ४०, रा. गोकुळ नगर, बालाजी मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन श्रावण साळुंखे (रा. कल्याण नगर भाग ३, जुळे सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभाकर प्रकाश माने असे जखमीचे नाव आहे. विमल माने यांचा मुलगा प्रभाकर हा आसरा चौकातील बालाजी वाघे यांच्या दुकानात कामावर २४ डिसेंबर रोजी हजर होता. त्यावेळी श्रावण साळुंखे याने दुकानात प्रभाकर याच्याजवळ येऊन प्रभाकरने श्रावण याच्या बहिणीची छेड काढल्याच्या कारणावरून श्रावण याची आई व बहिणीची माफी मागायला चल असे म्हणून २४ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास बोलावले होते. त्यामुळे प्रभाकर माने हा सायंकाळी कल्याण नगरमधील झेंडा कटट्याजवळ आला होता. त्याठिकाणी प्रभाकर व श्रावण साळुंखे यांच्यात भांडण झाल्यानंतर श्रावण याने प्रभाकर माने यास डाव्या हातावर, छातीवर, पोटावर चाकूने वार करून प्रभाकर यास चाकूने वार करून त्यास गंभीर जखमी करून त्याच्या खूनाचा प्रयत्न केला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



# खोट्या विमर्शा विरोधातील वैचारिक लढाई ही काळाची गरज

**क्षेत्रीय संघटन मंत्री गीतेश चव्हाण; अभाविप प्रदेश अधिवेशनाचा समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

खोटे विमर्श बनवून विद्यार्थी वर्गासह भारतीयांची दिशाभूल करण्याचे काम अनेक वर्षांपासून सुरू आहे. अशा खोट्या विमर्शाविरोधातील तरुण विद्यार्थ्यांची वैचारिक लढाई ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे क्षेत्रीय संघटनमंत्री गितेश चव्हाण यांनी केले. हरिभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात भरलेल्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनाचा समारोप बुधवारी थाटात झाला.

याप्रसंगी व्यासपीठावर अभाविपचे प्रदेशाध्यक्ष प्रा.डॉ. शांतिनाथ बागेवाडी, प्रदेशमंत्री अथर्व कुलकर्णी होते. क्षेत्रीय संघटनमंत्री गितेश चव्हाण म्हणाले, ज्ञानाचा दिवा पेटला की अज्ञान शिल्लक राहणार नाही. जीवनमूल्यांबद्दल आपण सजग असले पाहिजे. ज्यांच्या जीवन चरित्रातून जीवनमूल्यांचे प्रकटीकरण होते, अशा महापुरुषांची चरित्रे महाविद्यालय तरुण-तरुणी पर्यंत पोहोचवली पाहिजेत. सकारात्मक विमर्श प्रस्थापित करण्यात महाविद्यालय परिसराची भूमिका महत्त्वाची आहे, असेही क्षेत्रीय संघटनमंत्री गितेश चव्हाण यांनी सांगितले.

अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी प्रदेश संघटनमंत्री मीत ठक्कर यांनीही विविध जिल्ह्यातून अधिवेशनासाठी उपस्थित राहिलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. समारोपाच्या दिवशी जिल्हाश: बैठका, आगामी दिशा, व्यवस्था परिचय, घोषणा सत्र अशी अनेक सत्रे झाली. प्रदेश कार्यकारिणी बैठकीने अधिवेशनाचा समारोप झाला.





**अभाविपचे काम सर्वव्यापी सर्वस्पर्शी**

भाषण सत्रात राष्ट्रीय सह संघटनमंत्री देवदत्त जोशी म्हणाले, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे काम हे सर्वव्यापी सर्वस्पर्शी काम आहे. विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांना व्यापणारे सर्व घटकांच्या उन्नतीचा विचार करणारे कार्य अनेक दशकांपासून अभाविप करत आहे. आगामी काळातही अभाविपच्या कार्यकर्त्यांनी हीच प्रेरणा ऊराशी घेऊन वाटचाल करावी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९८५

**सांगे पितळेची गंधिकाळिक । जै फिटली होय नि:शेख ।**
**तै सुवर्ण काई आणिक । जोडूं जाईजे ।।**

अर्जुना, जो सांख्य योग आणि कर्मयोग मी तुला सांगीतला, तोच कर्मयोग व सांख्ययोग अनेक वर्षापुर्वी विवस्वानाला मी सांगीतला होता. असे भगवंत जेव्हा म्हणाले तेव्हा अर्जुनाला आश्चर्य वाटले. श्रीकृष्ण तर माझ्या बरोबरचीचे किंवा जवळपास माझ्या वयाचे असतांनाही शेकडो वर्षापुर्वी हा योग ते कसे काय सांगु शकतील, असा प्रश्न अर्जुनाला पडला. तेव्हा भगवंतानी मी जन्मरहित आहे. भक्तांसाठी, धर्मरक्षणासाठी मी जन्म घेऊन सगुण रुप धारण करीत असल्याचे सांगीतले. मला भ्रांती, मोह, कर्माधिनता नसल्यामुळे मला माझे सर्व जन्म आठवतात. तुला मात्र तुझे जन्म आठवत नाहीत. खरे म्हणजे मुळात एकच वस्तू असते. पण आरशामुळे ती दुसरी दिसते. त्याचप्रमाणे मी अमुर्तच आहे, पण मायेच्या भ्रांतीमुळे मी वेगळा दिसतो. अधर्माचा, पापाचा नाश करण्यासाठी मी अवतार घेत असतो. माझ्या अवतारात मी धर्माचे रक्षण करतो, धर्मशिष्यांचा सांभाळ करतो. पापाची रात्र गिळून पुण्याची पहाट उगवण्यासाठी मला सगुण रुप धारण करावे लागते, असे भगवंत म्हणाले. मी देह सोडला की पुन्हा मुळ स्वरुपात विलीन होत असतो, असेही ते म्हणाले अधर्माचा, पापाचा नाश करण्यासाठी अवतार घेत असतो असे भगवंत म्हणाले. आज खूप



अधर्म वाढला आहे. बरेच लोक नितिनियाच्या विरुध्द वागत आहेत. पापाचरण वाढले आहे. चो-या, मारामाऱ्या खूण, बलात्कार, फसवेगिरी वाढली आहे. पोटची मुलं आई-बापाला मानायला तयार नाहीत. सख्या भावाचे संपत्तीसाठी खूण होत आहेत. अनेकजण वाममार्गावर जाण्याचा मार्ग मोकळा करण्यासाठी पोटच्या लेकराला मारुन टाकत आहेत. नववधूंना सोडचिठ्ठी देत आहेत. सुनेवर अत्याचार करणा-यांची संख्या वाढत आहे. असे अनेक अधर्मी प्रकार वाढत असल्याने या अधर्माचा नाश करण्यासाठी ईश्वराच्या अवताराची वाट न पाहता आपण ज्ञानेश्वरी वाचकांनी या कामी पुढाकार घेऊन अधर्माला पायबंद घातला पाहिजे. त्यासाठी सत्कर्माची सुरुवात आपल्यापासून केली पाहिजे. अशा अन्यायकारक गोष्टी आमच्या व कुटूंबीयाच्या हातून कधीच घडणार नाहीत, याची दक्षता घेतली पाहिजे. जे धर्माच्या मार्गाने वागतात, कर्माबद्दल आसक्ती व फळाची अपेक्षा बाळगत नाहीत. असे लोक आपल्याबद्दल, दुस-याबद्दल शोक करीत नाहीत. हे लोक विषयतृष्णारहित असून ते क्रोधाच्या वाटेलाही जात नाहीत. असे लोक माझ्या भक्तित तल्लीन होऊन, आत्मानंद भोगतात. माझ्या भक्तित तल्लीन होऊन जे माझ्याशी एकरुप होतात, त्यांच्यात व माझ्यात भेद राहत नाही. असे भक्त पूर्णत: माझेच स्वरुप होतात, असे भगवंतांनी म्हटले. हिणकस आणि शुध्द सेने हे दोन्ही पिवळे असले तरीही दोघांत फरक असतो.

**सांगे पितळेची गंधिकाळिक । जै फिटली होय नि:शेख ।**
**तै सुवर्ण काई आणिक । जोडूं जाईजे ।।.**

असे भगवंतांनी म्हटले. हिणकस सोन्यातील पितळेचा गंज आणि काळेपणा सोनाराकडून वेगळा केला तर ते शुध्द सोने होते. याप्रमाणे आपल्या वर्तनातील, विचारातील हिणकसपणा, काळेपणा सदगुरुंच्या माध्यमातून वेगळा केला तर आपण आणि भगवंत कांही वेगळे असणार नाहीत. आपणाला श्री ज्ञानेश्वर माऊली सदगुरु लाभले आहेत, त्यांच्या मार्गदर्शनाने आपल्यातील नको त्या गोष्टी काढण्याचा मन:पूर्वक प्रयत्न करु या. असा प्रयत्न आपल्या जीवनातील आनंदलहरी वाढण्यास मदत करेल.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २६ डिसेंबर २०२४ | सफला एकादशी |
| विक्रम संवत् २०८०-८१ | श्री यल्लमा यात्रा खंडेराजरी |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. एकादशी - (२४.४३) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (१८.०८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सुकर्मा (२२.२२) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (११.३९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल.

**वृषभ** : आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

**मिथुन** : आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्या पिण्याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण सहकार्याचे राहील.

**कर्क** : मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**सिंह** : कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाची चिंता दूर होईल.

**कन्या** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल.

**तुळ** : चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हिंतचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील.

**वृश्चिक** : सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे समाजात प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील.

**धनु** : आनंदी बातमी कळेल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. स्वत:च्या विचाराने कामे केले तर फायदेशीर रहाल.

**मकर** : नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही कामात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ** : सुख समृध्दीत वाढ होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर. प्रवासाचा योग आहे. व्यापार व्यवस्याय भरभराटीवर. निष्कारण वाद विवाद टाळा.

**मीन** : आपले स्वप्न पूरे होतील. जुन्या संबंधामुळे कामे यशस्वी पार पडतील. कामाची गती अशीच राहू द्या.

# सोलापूरच्या विमानसेवेची प्रतीक्षा संपवण्यासाठी जनआक्रोश

## सोलापूर विकास मंचची ३० डिसेंबरला उपोषणाची हाक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

होटगी रोड सोलापूर विमानतळावरील सर्व सिव्हिल व इतर महत्त्वाची कामे पूर्ण होऊनही नागरी विमानसेवा सुरू करण्यात शासन अपयशी ठरले आहे. सोलापूरच्या विकासाला गती देणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सोलापूरकर अनेक वर्षांपासून नागरी विमानसेवेची प्रतीक्षा करत आहेत. ही सेवा सुरू झाल्यास सोलापूरच्या अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागणार आहे. मात्र, नागरी विमानसेवा सुरू न झाल्यामुळे सोलापूरच्या आर्थिक विकासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत. औद्योगिक गुंतवणूक, व्यापार, पर्यटन, तसेच रोजगाराच्या संधींवर याचा नकारात्मक परिणाम होत आहे.



सोलापूर विकास मंच आणि संपूर्ण सोलापूरकरांनी या प्रकल्पासाठी अपार मेहनत घेतली आहे. विमानतळाच्या सिव्हिल कामांपासून सर्व परवानग्या मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करूनही अद्याप नागरी सेवा सुरू न होणे हे सोलापूरकरांच्या अपेक्षांना आणि विश्वासाला धक्का आहे. या परिस्थितीवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर विकास मंचच्या नेतृत्वाखाली सोमवार, ३० डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत सोलापूर जिल्हा परिषदेच्या पुनम गेटसमोर एक दिवसीय तीव्र लाक्षणिक उपोषणाचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूरचा विकास थांबवणाऱ्या या उदासीनतेविरोधात एकजुट दाखवण्याची ही वेळ आहे, असे या आंदोलनाचे आयोजनकर्ते म्हणाले. नागरी विमानसेवा सुरू झाली तर सोलापूरच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीला नवी दिशा मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे. सोलापूरकरांनी मोठ्या प्रमाणावर या उपोषणात सहभाग नोंदवावा, असे आवाहन मंचचे प्रमुख सदस्य मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, केतन शहा, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर, सुहास भोसले, आनंद पाटील, गणेश शिलेदार, गौरी आमडेकर, आरती अरगडे, श्रीकांत बनसोडे, प्रशांत भोसले आणि इतर मान्यवरांनी केले आहे.



## भाजपा शहर कार्यालयात अटल बिहारी वाजपेयी यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

भाजपा कार्यकर्त्यांचे प्रेरणास्थान, माजी पंतप्रधान, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त भाजपा शहर जिल्हा कार्यालय येथे अध्यक्ष नरेंद्र काळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करुन अभिवादन केले.

याप्रसंगी सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, विशाल गायकवाड, रोहिणी तडवळकर, लक्ष्मण गायकवाड, नागेश गंजी, प्रशांत फत्तेपूरकर, श्रीधर गोखले, सुधाकर नराल, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, बाशाभाई शेख, सावित्री पलाटी, रामचंद्र तडवळकर, संदीप कुलकर्णी, राहूल पाटील, सुनिल टोणपे तसेच भाजपा सोलापूर शहर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## रेशन कार्डधारकांसाठी ई-केवायसीसाठी शिबिर सुरू

### अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

राशन कार्डधारकांची ई-केवायसी करण्यासाठी शासनस्तरावरून सुचना आल्याने सोलापूर अन्नधान्य वितरण कार्यालयाच्या वतीने गतीने हालचाली सुरू झाल्या आणि त्यातच आता ई-पॉस मशीनही चांगल्या चालू झाल्याने सोलापूर शहरात ई-केवायसी बाबतीत जागोजागी शिबिरांचा उपक्रम सुरू केल्याची माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली.

रेशन प्रणालीत कार्डधारकांना आता केंद्र शासनाने ई-केवायसी करण्याबाबत सक्ती केले आहे मात्र ऐन धान्य वाटपावेळी नागरिकांना ई-केवायसी करिता भल्या मोठ्या रांगाना सामोरे जावे लागत असल्याने अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे ह्यांनी गर्दी टाळण्यासाठी जागोजागी शिबिराचे आयोजन केले आहे. यामुळे नागरिकांची ई-केवायसी लवकर होत आहे. या शिबिरांवर लक्ष ठेवण्यासाठी परिमंडळ अधिकारी व पुरवठा निरीक्षक ह्यांचीही विशेष नियुक्ती करून स्वतः अन्नधान्य वितरण अधिकारी फिरत्या पथकाद्वारे सर्व शिबिरांवर नियंत्रण ठेवत आहेत.

सध्यातरी ई-केवायसीमध्ये सोलापूर शहर राज्यात अग्रेसर आहे. धान्य वाटपाची गर्दी टाळण्यासाठी केलेला हा उपक्रम नागरिकांना सोईस्कर ठरल्याने कार्डधारकांतून समाधान व्यक्त होत आहे.

#### जिल्ह्यातील ११ तालुक्यातही अशी शिबिरे घ्या

सोलापूर शहराप्रमाणेच जिल्ह्याच्या ११ तालुक्यातील राशन कार्डधारकांचीही ई-केवायसी करून घ्यावी, अशी मागणी जिल्ह्यातील तमाम नागरिकांतून होत आहे. यामुळे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनीही तालुकानिहाय ई-केवायसी शिबिरे घेवून सर्व कार्डधारकांची ई-केवायसी करून घ्यावी. यामुळे भविष्यात एकही कार्डधारक धान्यापासून वंचित राहणार नाही.

**- नितीन पेंटर, जिल्हाध्यक्ष, स्वस्त** धान्य दुकानदार संघटना, सोलापूर

## सिद्धेश्वर यात्रा यशस्वी करण्यासाठी कृती आराखड्याप्रमाणे काम करा

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद; १३ जानेवारीला अक्षता सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

श्री सिद्धेश्वर महायात्रा दि. १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होत आहे. यात्रा कालावधीत संपूर्ण महिनाभर दररोज श्री सिद्धेश्वर मंदिर व होम मैदान येथील मनोरंजन नगरीमध्ये हजारो भाविक, नागरिक येत असतात. त्यामुळे या सर्व नागरिकांची सर्व प्रकारची सुरक्षा तसेच यात्रा यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित शासकीय विभाग प्रमुख तसेच सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी यांनी कृती आराखड्याप्रमाणे त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत पूर्वतयारी आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपविभागीय अधिकारी सुमित शिंदे, शहर पोलीस उपयुक्त डॉ. दिपाली काळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, शहर पोलीस वाहतूक उपायुक्त सुधीर शिरवाडकर, उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज ठाकरे यांच्यासह पोलीस व संबंधित विभागाचे अधिकारी तसेच देवस्थान पंच कमिटीचे सदस्य उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले, संपूर्ण यात्रा कालावधीसाठी किती आराखड्याप्रमाणे प्रत्येक शासकीय विभागाने त्यांचा एक नोडल अधिकारी नियुक्त करावा व तो होम मैदान येथील कार्यालयात उपस्थित राहील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सुचित केले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी श्री सिद्धेश्वर महायात्रा २०२५ अंतर्गत श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटी तसेच सर्व शासकीय यंत्रणावर असलेली जबाबदारी याची माहिती देऊन प्रत्येक विभागाने जबाबदारी प्रमाणे आतापर्यंत केलेल्या कामकाजाची माहिती त्यांनी दिली.




#### सिध्देश्वर यात्रा कालावधी

श्री सिद्धेश्वर महायात्रा दि. १२ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत होत असून, दि. १२ जानेवारी रोजी ६८ लिंग प्रदर्शन, १३ जानेवारी रोजी अक्षता कार्यक्रम, १४ जानेवारी होम हवन असे कार्यक्रम होणार आहेत. तर पंच कमिटीचे सदस्य कस्तुरे व बिराजदार यांनी श्री सिद्धेश्वर देवस्थान समितीच्या वतीने यात्रा कालावधीत देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली. तसेच जवळपास दीडशे स्वयंसेवक उपलब्ध करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## सोलापूर विद्यापीठाचा सेडिबझ, एचसीएल सॉफ्टवेअरशी सामंजस्य करार




### विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानाबरोबर मिळणार प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानाबरोबर प्रशिक्षण देण्यासाठी सेडिबझ ग्लोबल टेक्नॉलॉजी, पुणे आणि नोएडा येथील एचसीएल सॉफ्टवेअर या दोन संस्थांशी सामंजस्य करार केला. कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर यांच्या प्रमुख उपस्थितीत या करारावर दोन्ही संस्थांच्या अधिकाऱ्यांनी व विद्यापीठातर्फे कुलसचिव योगिनी घारे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ व्यवस्थापन सभागृहात झालेल्या कराराप्रसंगी प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, एचसीएल सॉफ्टवेअरचे असोसिएट व्हॉइस प्रेसिडेंट बाबुराज अय्यर, ग्रुप मॅनेजर योगीराज दामा आणि सेडिबझचे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण देवलालकर, आनंद खळदकर, योगेश यावलकर, संदीप फत्तेपूरकर तसेच विद्यापीठातील डॉ. आर.एस.मेंते, ॲड. जावेद खैरदी, डॉ. सदानंद शृंगारे आदी उपस्थित होते. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना अधिकाधिक संशोधन व प्रशिक्षण मिळावे, या हेतूने या दोन संस्थांशी करार करण्यात आले. सेडिबझ ही कंपनी कौशल्य विभागात वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी काम करते व त्यांना प्रशिक्षण देते. वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून नोकरी मिळवण्यासाठी, एनर्जी विद्याचा प्लॅटफॉर्म वापरुन छोटे-छोटे कोर्सेस उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



## वालचंदच्या विद्यार्थ्यांचा ३० वर्षांनंतर गेट टुगेदर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या १९९३-९४ साली अंतिम वर्षात शिकलेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा डब्ल्यू. आय.टी.च्या प्रांगणात पार पडला. तब्बल ३० वर्षांनी एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी घालविलेल्या कॉलेज लाईफच्या सोनेरी क्षणांना उजाळा दिला.

सिविल इंजीनियरिंगचे निलेश पंधारकर, मेकॅनिकल इंजीनियरिंगचे संजय माने, प्रोडक्शन इंजीनियरिंगचे समीर लाड, सुरजितसिंह, इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्सचे विपुल माराल, कॉम्प्युटर सायन्सच्या संगीता भारत हे माजी विद्यार्थी व्यासपीठावर होते. अध्यक्षस्थानी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त भूषण शहा हे देखील माजी विद्यार्थी म्हणून सहभागी होते. दीपप्रज्वलनाने मेळाव्याचे उद्घाटन झाले.

प्राचार्य डॉ. विजय आठवले यांनी महाविद्यालयाच्या उज्वल परंपरेचा उल्लेख करून माजी विद्यार्थ्यांना नव्या पिढ्यांसाठी मार्गदर्शन होण्याचे आवाहन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. लुईस लोबो यांनी केले. माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला, त्याचबरोबर डब्ल्यू.आय.टी.च्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, नोकरी संपादन, यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन आणि सहकार्य करण्याची त्यांनी ग्वाही दिली. अधिष्ठाता माजी विद्यार्थी संघटक डॉ. सचिन देशमुख यांनी आभार मानले. शंभरहून अधिक माजी विद्यार्थी या संमेलनामध्ये सहभागी होते. सूत्रसंचालन प्रा. रवींद्र देशमुख, प्रा. स्वाती चिवडशेट्टी यांनी केले.

## 'बीगसी'मध्ये 'नेटवर्क सिक्युरिटी आणि एथिकल हॅकिंग' वर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात महाविद्यालयात एकदिवसीय 'नेटवर्क सिक्युरिटी आणि एथिकल हॅकिंग' या विषयावर कार्यशाळा झाली. संगणक विज्ञान व अभियांत्रिकी आणि इलेक्ट्रॉनिक्स व टेलीकम्युनिकेशन विभागाने व्हिजन चार इन्फोसेस बंगलोर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाच्या आयक्यूएसी अंतर्गत या उपक्रमाचे आयोजन केले.

कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांच्या हस्ते झाले. त्यांनी नेटवर्क सिक्युरिटी आणि सायबर सुरक्षेची आजच्या काळातील महत्त्वाची गरज यावर भर दिला. या कार्यशाळेसाठी संयोजक म्हणून डॉ. सय्यद गिलानी पाशा हे होते. कार्यशाळेचे मुख्य आकर्षण म्हणजे व्हिजन चार इन्फोसेसचे संचालक अल्ताफ हुसैन यांनी विद्यार्थ्यांना नेटवर्क सिक्युरिटी, सायबर अटॅक, एथिकल हॅकिंगच्या तंत्रज्ञानासोबतच वाढत्या ऑनलाइन फसवणुकीपासून कसे वाचावे सध्या ऑनलाईन फसवणूक आणि सायबर फसवणूक वेगाने वाढत असून त्याचा सर्वांगीण अभ्यास करणे गरजेचे असल्याचे सांगितले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. ए. आर. ज्ञानबोटे, प्रा. अमतुल आयेशा, डॉ. डी. श्रीनू बाबू, एम.डी. खुश्रू या समन्वयकांनी सहकार्य केले. कार्यक्रमासाठी व्यवस्थापन समितीचे रवींद्र गायकवाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



#### धोके टाळण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स

- सतर्क राहणे आणि संशयास्पद ई-मेल्स व लिंकवर क्लिक न करणे.
- मजबूत पासवर्ड आणि टू-फॅक्टर ऑथेंटिकेशनचा वापर करणे.
- सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर करताना काळजी घेणे.
- एंटीव्हायरस सॉफ्टवेअर आणि फायरवॉलचा योग्य प्रकारे वापर करणे

## राज्य शासनाकडून सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या हिताचे निर्णय अपेक्षित : बेडगे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

राज्यातील ११५० सार्वजनिक ग्रंथालय २० हजार कर्मचारी काम करतात ग्रंथालय कायदा होवून ५७ वर्षे झाली मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पण प्रत्येक वेळेस शासन ग्रंथालय व ग्रंथालय कर्मचारी यांचा प्रश्न विधीमंडळात चर्चास आला की त्याकडे नेहमीच दुर्लक्ष केले जायचे पण चालू अधिवेशनात ग्रंथालय अधिनियम सुधारणा या विषयी मत मांडताना विरोधी पक्षनेते एकनाथ खडसे आ.सत्यजित तांबे, आ.अभिजित वंजारी यांनी शासनाचे वाचन संस्कृती बाबत ग्रंथालय व ग्रंथालय कर्मचारी यांच्याकडे लक्ष वेधले आणि सांगितले की वाचन संस्कृती जपण्यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागते आहे. त्यासाठी शासनाने अनुदान वाढ करून कर्मचारी यांना योग्य वेतन मिळाले पाहिजे यासाठी ठोस निर्णय घेतला गेला पाहिजे अशी सभागृहात चर्चा झाली, यावर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कर्मचारी यांना ग्रंथालयांना मिळणाऱ्या एकूण अनुदानातून ७५ टक्के हे कर्मचारी वेतनावर खर्च केले जातील असे आश्वासित केले त्या निर्णयाचे स्वागत करतो घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने होणे गरजेचे असल्याचे मत महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# अक्कलकोटमधील पर्यटन निवासाची दुरावस्था

## शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा; नागपूर विभागीय कार्यालयाला पाठविले पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील पर्यटन विकास महामंडळाच्या लाखो रुपए खर्च केलेल्या पर्यटक निवासाच्या मोठ्या प्रमाणात दूरावस्था झाली आहे. अवस्थेबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी महामंडळाच्या नागपुर येथील विभागीय कार्यालयाकडे लेखी तक्रार रवाना केली आहे. याबाबत त्वरीत योग्य कार्यवाही होणेबाबत अक्कलकोट तहसिल कार्यालय यांच्या मार्फत शासनास अवगत केले आहे. याची पुर्तता न झाल्यास २६ जानेवारी २०२५ पासून उपोषणास बसण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारा उत्तर पोलीस यानां कळविले आहे.

अक्कलकोट तीर्थक्षेत्री येणाऱ्या मोठया प्रमाणातील यात्री पर्यटकाची संख्या लक्षात घेता आयटी आय कॉलेज लगत



पर्यटन विकास महामंडळ अंतर्गत ७ एकर जागेत पर्यटक निवास इमारत बांधकाम चालु करण्यात आले. पर्यटक निवास त्यात ७ खोली बांधलेले आहेत. ८० खोलीचे नियोजन आहे. शेजारी किजन रुम अर्ध्यवट बांधलेले आहे. नियोजित पर्यटक निवास इमारतीस तडे गेले आहेत. मागील बाजूस एक मंगल कार्यालय बांधले आहे. एक मोठे हॉल, ५ छोटे हॉल आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे याकडे अंत्यत दुर्लक्ष झाले आहे .. सदर ठिकाणी जाणे येणे साठी रस्त्याची . व्यवस्था नाही. पाण्यचे नियोजन नाही.लाईटचे नियोजन नाही. या ७ एकर जमिनीमधील सर्व इमारती दुराअवस्थेत आहेत.

सदर जागा पर्यटनासाठी योग्य आहे. पण सुलभ रहदारीच्या दृष्टीने सुयोग्य रस्त्याचे नियोजन योग्य न झाल्याने प्रशासनास मोठा भुर्दंड पडला असल्याचे दिसते. करोडो रुपए खर्च करून पर्यटन विकास महामंडळाचे हे निवासाचे तीन तेरा वाजल्याचे दिसुन येतो . शासनाच्या लाखो रुपयाचा खर्च मातीमोल ठरल्याचे दिसुन येते याला जबाबदार कोण? हे किती दिवसापासुन प्रलंबित आहे. याचे विकासक ठेकेदार कोण आहेत? ह्याना शासनाकडून अभय कसे मिळाले? पर्यटन विकास महामंडळाचे हे सदन. दुराअवस्थेला कारणीभुत कोण? याची जबाबदारी निश्चित करून निकृष्ठ दर्जाच्या कामकाजाबद्दल चौकशी करावी. सदर पर्यटक निवास चालू करावे.

पर्यटकांच्या सेवेत कार्यरत व्हावे सर्व सोयी सुविधा उपलब्ध कराव्यात. पर्यटकाना याचा उपयोग व्हावा. चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्यास अक्कलकोटी पर्यटकांची संख्या वाढून रोजगार वाढणार आहे.

### सात एकर परिसरात घाणीचे साम्राज्य

अक्कलकोट सुंदर दिसावे हि दूरदृष्टी ठेवून नियोजन करण्यात यावे. पर्यटन निवासच्या या ७ एकर क्षेत्रात घाणींचे साम्राज्या आहे. हे नष्ठ करून परिसर सुंदर बनविणे अंत्यत गरजेचे आहे. पर्यटक निवास दुराअवस्था तात्काळ दुर करून योग्य त्या उपाय योजना कराव्यात अन्यथा २६ जानेवारी रोजी या मागणीसाठी अक्कलकोट येथे उपोषणास बसण्याचा इशारा समाजसेवक शिवसेना जिल्हा उपप्रमुख सनिल कटारे यांनी दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### वाहनांसाठी राखीव जागेवरील अडथळे दूर करण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

शहरातील वाढती लोकसंख्या व दिवसेंदिवस वाढत असलेली स्वामी भक्तांचा ओघ पाहता शहरांत अनेक ठिकाणी मोटार सायकली व फोर व्हीलर गाड्या भर रस्त्यावरच लावले जात आहे.यामुळे रहदारीस अडथळा होऊन वाहतूकीची कोंडी होत असल्याने पार्किंग ची ठिकाणे मोकळी करावेत, अशी मागणी अक्कलकोट शहर शिवसेना संघटक चंद्रकांत वेदपाठक यांनी केली आहे. अक्कलकोट नगरपालिकेने यापूर्वीच जुना अडत बाजार सह शहरातील अनेक ठिकाणी वाहनाच्या पार्किंग साठी जागा रिझर्वेक्षण करून ठेवली आहे पण सदर पार्किंग जागेत अनेक प्रकारचे अडथळे असल्याने येथे वाहन लावता येत नाही त्यामुळे वाहधारक रस्त्यावर मिळेल त्याठिकाणी वाहने पार्क करतात त्यामुळे वाहतूकीस अडथळे निर्माण होऊन वाहतूक कोंडी होत आहे याचा प्रशासनाने विचार करून नियोजन करावेत. शहरांतील जुना अडत बाजार सह सर्वच ठिकाणचे वाहनासाठी राखीव असलेली पार्किंग जागेवरील सर्व अडथळे दूर करून पार्किंग जागेभोवती तारेचे कुंपण बांधून तसा पार्किंग चा बोर्ड लावावा अशी लेखी मागणी नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री डाके यांच्याकडे शहर शिवसेनेचे संघटक चंद्रकांत वेदपाठक यांनी केली आहे.

### अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आज बार्शीमध्ये खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**बार्शी, दि. २५ डिसेंबर-**

भारत सरकारद्वारा, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय अंतर्गत, नेहरु युवा केंद्र सोलापूर व क्रांती बहुद्देशीय संस्था, बेलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जयंती (सुशासन दिवस) निमित्त खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. २५ डिसेंबर रोजी, श्री. शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी या ठिकाणी करण्यात आली आहे. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे प्रथम बक्षीस रोख रक्कम १००१ रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, द्वितीय बक्षीस ोख रक्कम ७०१ रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, तृतीय बक्षीस रोख रक्कम ५०१ रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व उत्तेजनार्थ बक्षीस- रोख रक्कम ३०१ रुपये, सन्मानपत्र देण्यात येणार आहे. तरी या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग नोंदवावा अशा प्रकारचे आवाहन स्पर्धा आयोजक धिरज शेळके यांनी यावेळी बोलताना केले आहे.




### अटल बिहारी वाजपेयींच्या जयंतीनिमित्त अटल प्रतिष्ठानचा सेवा कार्यक्रम

**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**


देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयीच्या जयंतीनिमित्त अटल प्रतिष्ठान अध्यक्ष शिवशंकर स्वामी यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट येथील निवासी मूक बधिर शाळेतील विद्यार्थांना खाऊ वाटप करण्यात आले. तालुक्यातील सर्व समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत अटल प्रतिष्ठान संस्थेची सेवा पोहचविण्याचे काम जोमात सुरू आहे. त्या अनुषंगाने आज दिव्यांग विद्यार्थांमध्ये अटलजींची जयंती साजरी करून खावू वाटप करण्यात येत असल्याची अध्यक्ष शिवशंकर स्वामी यांनी सांगितले. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे सदस्य तथा माजी उपसरपंच बसवराज साखरे,राहुल वाडे, प्रभाकर म्हेत्रे आदिजण उपस्थित होते.



### कुर्डूवाडीत आदर्श एज्युकेशनल फेस्टिव्हल दिमाखात साजरा

**कुर्डूवाडी, दि. २५ डिसेंबर-**

आदर्श पब्लिक स्कूलमध्ये आदर्श एज्युकेशनल फेस्टिवल मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा झाला. या प्रेरणादायी कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अमोल सुरवसे, सचिव दयानंद सुरवसे, संचालक मोहन सुरवसे, ज्येष्ठ संचालिका आशाताई सुरवसे, आणि संचालिका वर्षाताई सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला पत्रकार विनायक पाटील, अनिल कांबळे, लक्ष्मण कांबळे आणि सतिष महींगडे यांची विशेष उपस्थिती लाभली. आदर्श एज्युकेशनल फेस्टिवलमध्ये विज्ञान, गणित, इतिहास, आणि भूगोल यांसारख्या विषयांवर आधारित मानवी जीवनाशी संबंधित प्रयोग आणि प्रकल्प सादर करण्यात आले. खाऊ गल्लीमधून १२० फूड स्टॉल्स, जिथे चविष्ट, घरगुती आणि आरोग्यदायी पदार्थ विकले गेले. भाजी मार्केटच्या माध्यमातून ७० सेंद्रिय भाज्यांचे स्टॉल्स, ज्यातून सेंद्रिय उत्पादनांचा प्रचार झाला. १,८८,००० ची उलाढाल झाली.



### माढ्यातील जि. प. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**माढा, दि. २५ डिसेंबर-**

जिल्हा परिषद हायस्कूल माढा येथील ७० ते ८० बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन मेळावा जगदाळे मंगल कार्यालयात उत्साहात पार पडला. यावेळी वरिष्ठ नागरिकांचा विविध गुणदर्शन कार्यक्रम झाला. दुपारच्या सत्रात सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. याप्रसंगी नयन शाह, संस्कृतीक कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. निवृती नंतरचे आयुष्य या विषयावर इंद्रजीत मोहोळे यांनी मनोगत व्यक्त केले. रमेश शिंदे यांनी पारंपरिक गोंधळी गीत सादर करुन कार्यक्रमात शोभा आणली. अशोक जानराव यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बाळासाहेब साठे, श्रीकांत जानराव, महावीर भोसले, भाऊसाहेब लंकेश्वर, विलास भिसे यांनी परिश्रम घेतले.

## सांगोला विद्यामंदिर प्रशाला, ज्युनिअर कॉलेजच्या स्नेहसंमेलनास आजपासून प्रारंभ

**प्राचार्य अमोल गायकवाड यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२५ डिसेंबर-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ गुरुवार ते शनिवार या कालावधीत विविध कार्यक्रमांनी संपन्न होणार आहे, अशी माहिती प्राचार्य अमोल गायकवाड यांनी दिली.

गुरूवार दि.२६ डिसेंबर रोजी विद्यार्थी शिक्षक दिन आयोजित केला असून याच दिवशी दु. २ वा. विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच शुक्रवार दि.२७ डिसेंबर रोजी स.८ वा. विद्यार्थी अल्पोपहार व फिशपॉंडस् हा कार्यक्रम होणार आहे व स.१० वा. फन फेअर, विज्ञान प्रदर्शन, कला प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन होणार आहे. फनफेअरचे उद्घाटन वाहतूक नियंत्रक सागर कदम व संस्था सचिव म. शं. घोंगडे, विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. अभयसिंह देशमुख, संस्था खजिनदार शंकरराव सावंत, कला प्रदर्शनाचे उद्घाटन शिक्षण व कृषी विकास प्रतिष्ठान, मेडशिंगी संचालिका अनिता इंगवले यांच्या हस्ते व संस्था कार्यकारिणी सदस्या शीलाकाकी झपके, तर रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन जि. प. प्रा. शाळा. नं.३ च्या मुख्याध्यापिका जबीन शेख यांच्या हस्ते व संस्था सदस्य ॲड.विजयसिंह चव्हाण यांचे उपस्थितीत होणार आहे. दि.२८ डिसेंबर रोजी स.११ वा. वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषिक वितरण समारंभ होणार असून या कार्यक्रमास पॅराथलेटिक्स-राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मेडल प्राप्त खेळाडू सचिन खिलारी हे उपस्थित राहणार आहेत तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके हे भूषविणार आहेत.

## दुधनीतील शाळांचे सामुहिक वनभोजन

**अक्कलकोट, दि. २५ डिसेंबर-**

दुधनी येथील जि. प. मराठी प्राथमिक केंद्र शाळा व कन्नड मुलांचे शाळेच्या संयुक्तरीत्या वनभोजन कार्यक्रम मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आले.

व्यापारी राजकुमार सोळसे सावकार यांच्या मळ्यात वन भोजन कार्यक्रम आयोजित केले होते. परिपाठानंतर दोन्ही शाळेतील विद्यार्थी शेताकडे गेल्यानंतर राजू सोळसे यांनी मुलांसाठी शेतात साफसफाई करून जागा उपलब्ध करून दिली. शेतातील पिके, वृक्ष वनस्पती याबाबत विद्यार्थांना माहिती दिली. अनेक मुले नृत्य गायन सादर केले. यावेळी मुख्याध्यापक दत्तात्रय टोणगे, सिध्दाराम गोरे, बसवराज मंत्री, संजीवकुमार बेण्णेसूर, रविकुमार कोरचगाव, सुहास पवार, उड्डा, शोभा म्हेत्रे, चनशेट्टी, डोंगराजे मॅडम, अंजली गुंजोटे यांचे सहकार्य लाभले. पोमू राठोड यांनी सर्वांचे आभार मानले.

## वळसंगमधील महाराष्ट्र बँकेचे एटीएम बंद

### पैशासाठी नागरिकांची गैरसोय; सेवा सुरु करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २५ डिसेंबर-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या एटीएम मशिन गेल्या दोन महिन्यांपासून बंद असून नागरिकांची गैरसोय होत आहे.

वळसंग हा संपूर्ण मोठा गाव असून आजूबाजूच्या खेड्या गावातून पैशाची गरजवंत पैसे काढण्यासाठी एटीएचा वापर करतात. परंतु एटीएम मशीन दोन महिन्यांपासून बंद असल्याने नागरिकांच्या अडचणीत वाढ झाली आहे. याबाबत अधिकाऱ्यांना कळवूनही त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. बुधवारी नाताळनिमित्त सुट्टी असल्याने एटीएमची गरज भरपूर होती. तसेच बुधवार बाजार असल्याने पैशाचा वांदा झाला. बँकेच्या सुट्टी दिवशी आजारपण, कार्यक्रम, अचानक झालेली घटना या सर्व बाबींना एटीएमद्वारे पैसे मिळत होते. परंतु गेल्या दोन महिन्यापासून बंद असल्याने भरपूर अडचणी येत आहेत. एक दिवस रात्री बाराच्या सुमारास काही नागरिक पैशासाठी धडपड करत होते. मी त्यांना एवढ्या रात्री काय झाले असे म्हणल्यावर दवाखान्याला ॲडमिट केलं आहे. परंतु पैशाची गरज आहे. एटीएम बंद असल्या कारणाने मला



त्रास होत आहे. आत्ता रात्री कोणी पैसे देणार नाही. खात्यामध्ये असून सुद्धा अडचणीला समोर जावे लागत आहे, असे सांगितल्याची वळसंगचे रहिवासी संतोष दुधगी यांनी सांगितले. वळसंग १३ गावांचा केंद्रबिंदू आहे. यामुळे तात्काळ एटीएम सेवा सुरु करण्याची मागणी जोर धरत आहे.



## मंदिर समितीच्या वनभोजनाचा हजारो भाविकांनी घेतला लाभ

### विष्णूपद उत्सव २०२४; दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २५ डिसेंबर-**

मार्गशिर्ष शुध्द ०१ ते मार्गशिर्ष वद्य ३० या कालावधीत श्री विठ्ठलाचे वास्तव्य विष्णूपदावर असते, अशी धारणा आहे. त्यामुळे महिनाभर विष्णूपद येथे दर्शनास भाविकांची गर्दी असते. यावर्षी दिनांक ०२ ते ३० डिसेंबर २०२४ दरम्यान विष्णूपद उत्सव संपन्न होत असून, या उत्सवास दिनांक २ डिसेंबर पासून सुरवात झाली आहे.

विष्णुपद मंदिरात भाविकांची दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. आज दिनांक २४ डिसेंबर रोजी मंदिर समिती मार्फत दुपारी बारा ते तीन या वेळेत वनभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये सुमारे २५०० ते ३००० भाविकांनी वनभोजनाचा लाभ घेतल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. गोपाळपूर रोडवरील विष्णूपद मंदिर येथे मंदिर समिती मार्फत भाविकांना पुरेसा सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने चांगली स्वच्छता व्यवस्था, पिण्याचे पाणी, दर्शन रांग व्यवस्थापनासाठी बॅरीकेटिंग व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विष्णुपद मंदिर येथे वनभोजनाची प्रथा असल्याने प्रती वर्षाप्रमाणे मंदिर समिती मार्फत वनभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या वनभोजनाचे नियोजन, विभाग प्रमुख बलभीम पावले व राजेश पिटले यांना देण्यात आले होते. मंदिर समिती मार्फत देण्यात येणाऱ्या सोई सुविधा बाबत भाविकांनी समाधान व्यक्त केल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी दिली.

## भक्ती संस्कृतीला चालना देणारे स्थान म्हणजे वटवृक्ष मंदिर : आ. सरोज आहिरे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२५ डिसेंबर-**

स्वामींच्या प्रचितीमुळे भाविकांचा ओढा अक्कलकोट कडे वाढत आहे आणि स्वामी समर्थांच्या श्रद्धेवर विश्वास ठेवून भाविक भक्तीत गुंतत आहेत त्यामुळे येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे भक्ती संस्कृतीला चालना देणारे स्थान म्हणून नावारूपाला येत असल्याचे मनोगत नाशिक जिल्ह्यातील देवळाली विधानसभा मतदारसंघाचे आमदार सरोज अहिरे यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास आपल्या सहकाऱ्यांसोबत सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. भारतीय संस्कृतीत भक्ती-अध्यात्म या रूढी परंपरांना प्राचीन काळापासूनच अत्यंत महत्व आहे. अगदी द्वापार युगापासून विविध साधुसंत, अवतारी दैवत या भारत भूमीवर नावारूपास आले. त्यापैकी अगदी अलीकडील काळात पाहायचे झाल्यास श्री स्वामी समर्थांचा अवतार हा दैवी अवतार



आपणास अनुभवता आलेले आहे. या पाश्वभुमीवर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज यांची महती ही अनन्य साधारण आहे. आज अनेक भाविकांना स्वामींची प्रचिती येत असल्याची आमदार सरोज अहिरे यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी सरोज आहिरे यांचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी आमदार सरोज आहिरे बोलत होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते ननू कोरबू, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, श्रीकांत मलवे, विपुल जाधव, इत्यादी उपस्थित होते.

## राज्यस्तरीय समूहनृत्यात महर्षी प्रशाला, श्री बाणलिंग विद्यालयाला विजेतेपद

### प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २५ डिसेंबर-**

प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या शालेय मुला-मुलींच्या राज्यस्तरीय समुहनृत्य स्पर्धेत शहरी गटात महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला शंकरनगर यांनी तर ग्रामीण गटात श्री बाणलिंग विद्यालय फोंडशिरस या संघाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

स्मृतिभवन शंकरनगर येथे मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाच गटात स्पर्धा संपन्न झाल्या. स्पर्धेच्या समारोपाच्या बक्षीस समारंभा प्रसंगी मंडळाच्या अध्यक्षा कु. स्वरूपाराणी मोहिते पाटील, ॲड. नितीनराव खराडे पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील, उपाध्यक्ष पोपटराव भोसले-पाटील, सचिव बिभिषन जाधव, परीक्षक आशिष देसाई, कुणाल मसाले, सागर राऊत, प्रमुख उपस्थित होते.

अध्यक्षा स्वरूपारांणी मोहिते-पाटील म्हणाल्या, मंडळाचे संस्थापक जयसिंह मोहिते-पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळावी या साठी हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. स्पर्धेचे हे ४४ वे वर्ष आहे. तालुक्याच्या बाहेरीलही शाळा यामध्ये सहभागी आहेत. स्पर्धेत शहरी सह ग्रामीण कलाकार ही उत्कृष्ट काम गिरी करीत आहेत. कलाकारांनी अपयशाने हार मानू नये. असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. यावेळी त्यांनी मंडळांने राबवलेल्या विवीध उपक्रमांचा आढावा घेतला. विजेत्या संघांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र मान्यवरांच्या शुभहस्ते देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन पोपटराव पवार, डॉ. आर. आर. पाटील, किरण सूर्यवंशी, इलाई बागवान यांनी केले. स्पर्धा प्रमुख मुख्याध्यापक संजय गळीतकर, प्रा. डॉ. विश्वनाथ आवड, दिलीप शिर्के, नामदेव काळे प्रमुख उपस्थित होते.

### स्पर्धेचा निकाल

गट क्रमांक ३ (आठवी ते दहावी-पाश्चिमात्य नृत्य) शहरी गट : प्रथम क्रमांक (विभागून) सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज, जिजामाता कन्या प्रशाला, अकलूज, द्वितीय महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर. गट क्रमांक ५ (अकरावी ते महाविद्यालय प्रासंगिक नृत्य) : प्रथम क्रमांक सदाशिवराव माने विद्यालय, अकलूज, द्वितीय शंकरराव मोहिते महाविद्यालय, तृतीय महर्षि शंकरराव मोहिते प्रशाला, यशवंतनगर, चतुर्थ स.म.शं.मो.पा. इन्स्टि. ऑफ टेक्नो. रिसर्च शंकरनगर, पाचवा कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय, सदाशिवनगर. गट क्रमांक ४ (५ वी ते १०वी प्रासंगिक, ग्रामीण गट) : प्रथम क्रमांक श्री बाणलिंग विद्यालय, फोंडशिरस, द्वितीय श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते-पाटील कन्या प्रशाला, नातेपुते, तृतीय कृष्णानंद विद्यामंदिर, पाटीलवस्ती, प्रोत्साहनपर हनुमान विद्यामंदिर प्रशाला, तोंडले. (पावी ते दहावी प्रासंगिक शहरी गट) : प्रथम क्रमांक महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला शंकरनगर, द्वितीय सदाशिवराव माने विद्यालय अकलूज, तृतीय जिजामाता कन्या प्रशाला अकलूज यांनी पटकावला.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शहापूर शाळेची शैक्षणिक सहल उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २५ डिसेंबर-**

तुळजापूर तालुक्यातील शहापूर येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाची शैक्षणिक सहल समृद्ध कोकण पर्यटनासह पश्चिम महाराष्ट्रात विविध तीर्थक्षेत्र आणि निसर्ग सौंदर्य पाहत पार पडली.

मुख्याध्यापक अमीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक सहलीचे आयोजित केली होती. स्वराज्याची राजधानी रायगड



किल्ल्यासह मुरुड जंजिरा किल्ला,महाड येथील चवदार तळे,श्रीवर्धन बीच, शिखर शिंगणापूर,गोंदवले मठ,वाईचा गणपती, महाबळेश्वर,पाली येथील बल्लाळेश्वर गणपती, केतकावळी येथील प्रतिरूप बालाजी, जेजुरी खंडेराया, मोरगाव येथील गणपती दर्शन घेऊन पंढरपूर, सोलापूर मार्गे शहापूर येथे सुखरूप विद्यार्थी पोहोचले. या सहलीमध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक अमीर शेख, विकास जोत,पठाण युनुस शेरखाँ, स्वाती गायकवाड, प्रल्हाद काळे, कविता मानकरे, वैशाली सुरवसे,एसटीचे चालक मस्के,आकाश गोरे आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सहलीमुळे विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### समर्थांची कृपासावली हे जीवनातील सर्वांत मोठे भाग्य : प्रा. डॉ. यशपाल खेडकर

**अक्कलकोट, दि.२५ डिसेंबर-**

ब्रम्हांडनायक दत्त अवतारी श्री स्वामी समर्थांची कृपासावली हेच आमच्या कुटुंबीयांच्या जीवनाचे सर्वात मोठे भाग्य असल्याचे विचार पंढरपूर येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट (डतएठख) चे प्राध्यापक डॉ.यशपाल खेडकर यांनी मांडले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी डॉ.यशपाल खेडकर व त्यांच्या धर्मपत्नीचा स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी डॉ.खेडकर बोलत होते. पुढे बोलताना डॉ.खेडकर यांनी श्री स्वामी समर्थांच्या भक्तीभावातून लाभलेल्या सद्बुद्धीने व ज्ञानार्जनाने श्री.विठ्ठल एज्युकेशन आणि संशोधन संस्थेत ज्ञानदान करण्याचे काम स्वामींच्या कृपेने माझ्या हातून घडत असल्याचे मनोगतही व्यक्त केले. यावेळी फत्तेसिंह शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजीव माने, मंदिर समितीचे सचिव आत्मराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, संतोष फुटाणे, मारुती बावडे, प्रसाद सोनार, संजय पवार, व्यंकटेश पुजारी, श्रीशैल गवंडी, प्रफुल जाधव, विपुल जाधव, आदिसह खेडकर कुटुंबीय उपस्थित होते.



### दुधनीत क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

**अक्कलकोट, दि.२५ डिसेंबर-**

तालुक्यातील दुधनी येथील एस. जी. परमशेट्टी प्रशालेत गायत्री क्लासेस सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष अंबिका पाटील यांच्या हस्ते क्रीडा ध्वजारोहण करून क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षस्थानी दुधनीचे माजी नगरसेवक गुरशांतप्पा परमशेट्टी हे होते. माजी नगरसेवक सिद्धाराम एगदि यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले.प्रारंभी राजशेखर पाटील यांनी मान्यवरांचे स्वागत केले. अंबिका पाटील म्हणाले की, मी परमशेट्टी शाळेतील शिक्षकांमुळेच उंच शिखर गाठू शकले. सर्व विद्यार्थ्यांनी देखील कठोर परिश्रम करून खेळाबरोबर बौद्धिक ज्ञान संपादन करण्यासाठी मार्गदर्शन केले.यावेळी राष्ट्रीय खेळाडू रविदास राठोड,मुख्याध्यापक रेवणसिद्ध आलीगावे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक क्रीडा प्रमुख दत्तात्रय हिळळी यांनी केले. श्रावणी अचलेरे हिच्या नेतृत्वाखाली क्रीडा ज्योतीची परिक्रमा पूर्ण केले. अविनाश भैरूणगी, राजशेखर पाटील. महालिंग सोमेश्वर, सुरेश बिराजदार. खाजपा शिंगे सातलिंग गुळगोंडा.गिरीष गाडी चंद्रशेखर खंडाळ. रामलिंग मंजुळकर मलया स्वामी यांनी पंच म्हणून काम पहिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी, नागदेवी स्वामी, प्रियांका पावली, लक्ष्मी म्हेत्रे, श्रुती दिवटे, महादेवी कोरे, अर्चना परमशेट्टी. पार्वती हिरेमठ, देसूराव राठोड, भीमाशंकर सुणगार, महादेव हंगरगी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन नागराज कलबुर्गी यांनी केले. शेवटी आभार दत्तात्रय हिळळी यांनी मानले.

### बार्शीत रविवारी वीरशैव लिंगायत तेली समाजाचा वधू-वर-पालक परिचय मेळावा

**बार्शी, दि. २५ डिसेंबर-**

येथील लिंगायत बोर्डिंग या ठिकाणी वीरशैव लिंगायत तेली समाजसेवी संस्थेच्यावतीने रविवार दि. २९ डिसेंबर २४ रोजी भव्य अशा राज्यस्तरीय वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी मेळाव्याचे ९ वे वर्ष असून मेळावा पूर्व ऑनलाईन नाव नोंदणीसाठी ९४२२६४८१९४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे. मेळाव्यासाठी नोंदणी शुल्क म्हणून रु.२०० ठेवण्यात आले असून नोंदणी करणाऱ्या पालकांना वधु-वरांची संपूर्ण माहिती असलेले पुस्तक मोफत देण्यात येणार आहे. आज-काल धावपळीच्या युगामध्ये एकाच वेळी अनेक विवाह इच्छुक मुला मुलींशी आणि त्यांच्या पालकांशी यानिमित्ताने कमी वेळेत भेटता येईल आणि आपल्याला सुयोग्य असा जोडीदार निवडण्यास मदत होईल. तरी राज्यातील सर्व समाज बांधवांनी उपस्थित राहून तसेच इच्छुक वधू-वरांनी नाव नोंदवून या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेच्यावतीने अध्यक्ष नागजीभाऊ नान्नजकर, उपाध्यक्ष दत्तात्रय देशमाने, सचिव भिमराव कोरे, खजिनदार बाळासाहेब गाताडे आणि सर्व संचालक मंडळ तसेच वीरशैव लिंगायत तेली समाज, बार्शी यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## खंडणीसाठी अपहरण करून जीवे ठार मारण्याची धमकी

### चार महिलांसह पुरुषाला अटक

### कुर्डूवाडी पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २५ डिसेंबर-**

खंडणीकरीता अपहरण केलेल्या इसमाची सुटका करुन चार महिला व एक पुरुष अशा एकूण पाच आरोपींच्या मुसक्या कुर्डुवाडी पोलिसांनी आवळल्या. ही कारवाई शनिवारी दि. २१ रोजी करण्यात आली असून आरोपींना रविवारी न्यायालयापुढे हजर केले असता ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की शुक्रवार दि. २० रोजी रात्री ०९:४५ वा चे सुमारास यातील फिर्यादी ज्ञानेश्वर फरड रा. पडसाळी ता. माढा हे त्यांचे पतुणे समाधान फरड याचे सोबत




जेवण करण्यासाठी भुताष्टे पाटी लऊळ येथील हॉटेलमध्ये गेले असता जेवण चालू असताना दोन अनोळखी महिला ह्या हॉटेलमध्ये येवून त्यांनी फिर्यादी यांचा पुतण्या समाधान यास हॉटेलच्या बाहेर बोलावून घेतले असता फिर्यादी हे काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी मागे गेले त्यावेळी फिर्यादी यांना मध्ये बोलू नको म्हणून फिर्यादी यांना शिवीगाळ दमदाटी करून त्या महिलेसोबत आलेल्या विना नंबरच्या दोन मोटारसायकल वर फिर्यादी यांचा पुतण्या समाधान यास बळजबरीने बसवून कुर्डुवाडीच्या दिशने घेवून गेले. फिर्यादी यांनी सदर इसमाबाबत चौकशी करता सदरचे लोक हे रवी भोसले, अक्षय पवार, कृष्णा शिंदे, सतीश भोसले, व महिला दीपाली शिंदे, अविधा भोसले, सर्व रा. बारलोणी व इतर अनोळखी दोन महिला हे असल्याचे समजले. त्यांनतर फिर्यादी यांचा पतुण्या सिध्देश्वर याने फिर्यादी यांचे कडे येवून सांगितले की, समाधान हा वारंवार त्याचेच फोन वरून तीन लाख रूपयेची तजवीज करण्याची विनंती करत असून नाही केल्यास माझे काही खरे नाही .पैशची पुर्तता न केल्यास जिवे मारण्याची धमकी दिली असल्याचे यातील फिर्यादी यांनी कुर्डुवाडी पोलीस ठाणेस येवून हकीकत सांगितली.

सदर पाच जण व गुन्हा करण्यासाठी मदत करणारे रवी भोसले, अक्षय पवार, कृष्णा शिंदे, व सतीश भोसले या नऊ जणांविरुध्द कुर्डुवाडी पोलीसांत गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सारीका गटकूळ हया करीत आहेत.

#### अन् पोलिसांनी केली सुटका

पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लावार यांनी तातडीने तपास चक्रे फिरवून अपहरण झालेल्या व्यक्तीचा गोपनिय बातमीदारामार्फत माहिती घेतली असता समाधान हा ढवळस रोडवरील चेतन काळे याच्या घरामध्ये असल्याची माहिती मिळाली. सदर ठिकाणी पोलिस पथकाने जाऊन अपहरण झालेल्या व्यक्तीची दिपाली शिंदे, निलम काळे, अविधा भोसले, कीर्ती पवार, चेतन काळे (सर्व रा. कुर्डुवाडी) यांच्या तावडीतून सुटका करून त्यांना जागीच ताब्यात घेतले.

## प्रात्यक्षिक ज्ञान विद्यार्थ्यांना प्रगत बनवते : आर. सी. फडे

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २५ डिसेंबर-**

बाजार दिवसाच्या माध्यमातून व्यवहार ज्ञान तर कळतेच पण विद्यार्थ्यांना कुटुंब कसे चालते याचे हे ज्ञान येते. माळशिरस तालुक्यातून अनेक विद्यार्थी घडावेत यासाठी अकलूज सी. ए. असोसिएशन विद्यार्थ्यांना सी.ए. बनण्यासाठी मार्गदर्शन करेल असे आश्वासन दिले. बाजार दिवसाच्या माध्यमातून मिळालेले प्रात्यक्षिक ज्ञान विद्यार्थ्यांना प्रगत बनवते असे प्रतिपादन आर.सी. फडे यांनी रत्नत्रय इंग्लिश मीडियम स्कूल, विद्यालय ज्यु. कॉलेज मांडवे येथे बाजार दिवसानिमित्त बोलताना केले.



बालचमूंचा आनंदी बाजार दिवस यामध्ये १९९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये विविध पालेभाज्या, फळभाज्या, खाद्यपदार्थ, जनरल स्टोअर्स, थंड पेयचे स्टॉल होते. २ लाखापर्यंतची उलाढाल झाली. यावेळी आर. सी. फडे, अनंतलाल दोशी, शशील गांधी, नितीन कुदळे, अमित दोशी, मयूर फडे, राहुल पिसे, ॲड. मयूर शहा, अजितकुमार दोशी, वीरकुमार दोशी, संस्था सचिव प्रमोद दोशी, अभिजित दोशी, बाहुबली दोशी, वैभव शहा, अभिजीत दोभाडा, अमित गांधी, रामदास कर्णे, सुरेश धाईंजे, रवींद्र कुलकर्णी, मृणालिनी दोशी, भाग्यश्री दोशी, विनयश्री दोशी, पूनम दोशी, धनश्री दोशी, पार्वती जाधव, सारिका राऊत, मुख्याध्यापक दैवत वाघमोडे, मुख्याध्यापक गजेश जगताप, मुख्याध्यापक सतीश हांगे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्राजक्ता गाढवे यांनी केले, आभार वनिता निंबाळकर यांनी मानले.

## श्री श्री सद्गुरु साखर कारखान्याचा पहिला हप्ता जमा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ डिसेंबर-**

राजेवाडी येथील श्री श्री सद्गुरु साखर कारखान्याने उसास पहिला हप्ता २८५० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केल्याचे चेअरमन एन. शेषागिरिराव यांनी सांगितले.



या कारखान्याने सेंद्रिय शेती, आरोग्य शिबीर, शिक्षण व इतर सामाजिक क्षेत्रात नेहमीच उल्लेखनीय कार्य केले आहे. कारखान्याने श्री श्री रविशंकर महाराज यांच्या कार्याचा आदर्श घेत नेहमीच शेतकऱ्यांचे हित जोपासले आहे. या कारखान्याची वाटचाल वेगात सुरु आहे.

## अक्कलकोट येथील घर पाडकाम थांबवून सखोल चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २५ डिसेंबर-**

अक्कलकोटमध्ये वटवृक्ष श्री स्वामी मंदिरालगत असलेल्या घर बांधकामावर नुकतीच नगरपालिकेने कारवाई केली. हे करताना नव्याने बांधलेले पूर्ण घर बेकायदा असल्याची नोटीस देऊन पाडून टाकले आहे. हे घर पाडकाम तत्काळ थांबवावे. या प्रकरणाची चौकशी सखोल चौकशी करावी, अशी मागणी दिलीप कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

मंदिरालगत आम्ही अनेक वर्षापासून रहिवासी आहोत. आमच्या स्वतःच्या मालकीची वडिलोपार्जित ही घर आणि जागा आहे. या जागेवर मंदिरासाठीच आरक्षण आहे असे कारण सांगून नगरपालिका आम्हाला वर्षानुवर्ष नूतनीकरणासाठी परवानगी देत नाही. घरं जुनी असल्याने मोडकळीस आली. नगरपालिका स्वतः जागा घेत नाही. पूर्वी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे इतरत्र आम्हाला पर्यायी जागा दिली जात नाही. जागेची किंमतही दिली जात नाही. यावर कहर म्हणजे नवीन बांधकामासाठी परवानगी मिळत नाही. अलीकडेच आम्ही सर्वांनी

बांधकाम परवानगीला अर्ज देऊन बांधकाम केली आहे. मात्र नगरपालिकेने माझ्या एकट्याचच घर पूर्णपणे पाडून टाकले आहे. मोठ खर्च, आयुष्यभर केलेली कमाई एक क्षणात नगरपालिकेने उद्ध्वस्त केली याविषयी आता जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणीही दिलीप कुलकर्णी यांनी केली आहे.

## माळशिरसमधील विकासकामांबाबत माजी आ. सातपुते यांची जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ डिसेंबर-**

माजी आ. रामभाऊ सातपुते यांनी गेल्या पाच वर्षात मतदारसंघात एक हजार कोटीपेक्षा जास्त कामे मंजूर केली होती. यातील बरीच कामे पूर्ण झाली तर बरीच कामे सुरु आहेत. याबाबत माजी आ. सातपुते यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची भेट घेऊन याबाबत चर्चा केली.




माळशिरस तालुक्यातील नागरिकांच्या मागण्या पूर्ण करणे, मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करणे, जनतेच्या अडचणीच्या काळात त्यांच्या सोबत राहणे व शासन दरबारी प्रलंबित कामासाठी पाठपुरावा करणे .भविष्यात सुद्धा माळशिरस तालुक्याचा विकास करण्याचा प्रामाणिकपणे आपण प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यादरम्यान माजी आ रामभाऊ सातपुते यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांचीही भेट घेतली असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २५ डिसेंबर-**

तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी जेष्ठ नेते, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची अणदूर येथिल निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्या तब्यतेची आस्तेवाईक पणे विचारपूस केली.

विधानसभा निवडणुकीत युवा नेते सुनील चव्हाण यांच्या धडाकेबाज प्रचाराने राणा पाटलांचा विजय झाला होता. नागपूर अधिवेशन पूर्ण करून मतदार संघात आल्यावर आ. पाटील यांनी चव्हाण यांची सदिच्छा भेट घेतली.



या वेळी बोलताना आमदार पाटील म्हणाले की,भेटी दरम्यान माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी श्री तुळजाभवानी मंदिर आणि एकंदरीत तुळजापूर तालुक्यात सुरु असलेल्या विकासकामांची माहिती मधुकरराव चव्हाण यांना दिली. यावेळी सुनील चव्हाण, बाबुराव चव्हाण, दीपक आलुरे, साहेबराव घुगे उपस्थित होते.

## पिलीव बसस्थानकावर एसटी बस थांबत नसल्याने प्रवाशांचे हाल

### तक्रार करुनही अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

### प्रवाशी, नागरिक आंदोलनाच्या पवित्र्यात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २५ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव हे गाव पंढरपूर-सातारा महामार्गावरील मुख्य बाजारपेठ असणारे मोठे गाव आहे. या ठिकाणाहून पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गोंदावले, तसेच कोल्हापूर आदी देवांना जाणाऱ्या प्रवाशांची मोठी संख्या या ठिकाणी आहे. बस थांबत नसल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत.

तसेच पंढरपूर, सातारा,पुणे या ठिकाणी जाणाऱ्या प्रवाशांची तसेच विद्यार्थ्यांची सुद्धा संख्या मोठी आहे. गेले अनेक वर्ष या ठिकाणी सर्व एसटी बसेस पंधरा वीस मिनिटे थांबत असत पण या ठिकाणी महामार्ग



झाल्यापासून एस टी बसेस या ठिकाणी थांबत नाहीत. या अगोदर बऱ्याच दिवस साळमुखवाडी येथे नंतर तांदुळवाडी येथे तर आता पिलीव पासून पश्चिमेस दोन किलोमीटर अंतर असणाऱ्या एका ढाब्यावर एसटी बसेस अर्धा तास फुकट नाष्टा मिळतो म्हणून थांबतात.भले त्या ठिकाणी का एस टी बसेस थांबेनात पण अनेक बहाद्दूर पिलीव बसस्थानकावर एसटी बसेस थांबवतच नाहीत .या ठिकाणी तासन्तास प्रवासी, विद्यार्थी ताटकळत उभे असतात पण एसटी बसेस न थांबविल्यामुळे सोलापूर, पंढरपूर किंवा इतर ठिकाणी जाणारे प्रवाशी व विद्यार्थी यांचे नुकसान होत आहे. याबाबत सोलापूर आगार, पंढरपूर आगार, सातारा आगार यांच्याकडे तक्रारी करुनही सुद्धा संबंधित अधिकारी याकडे लक्षच देत नाहीत यामुळे सध्या पिलीव परिसरातील प्रवासी तसेच विद्यार्थी आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत. प्रशासनाने याची दखल घ्यावी अन्यथा होणाऱ्या पुढील घटनेस प्रशासन जबाबदार असेल असा इशारा प्रशासनाने दिला आहे.



## रातंजनच्या जि. प. शाळेत आनंदी बाजार

### पालकांनी लुटला खरेदीचा आनंद

### ३२ हजार रुपयांची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २५ डिसेंबर-**

काल मंगळवार दि. २४ डिसेंबर रोजी जि. प. प्राथमिक शाळा रातंजन येथे बाल आनंद बाजार अतिशय उत्साही वातावरणात संपन्न झाला. तत्पूर्वी बाल आनंद बाजाराचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सत्यवान देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून आप्पा नागटिळक, आप्पासाहेब माने उपस्थित होते. बाल आनंद मेळाव्यात कचोरी, भेळ, शेंगा लाडू, वडापाव यासह अनेक खादयपदार्थ विक्रीस उपलब्ध होते. भाजीपाला, शालेय साहित्य, ज्वेलरी, सौंदर्य प्रसाधने यासह अनेक वस्तूचे स्टॉल लावण्यात आले होते. यातून विद्यार्थ्यांच्या व्यवहार कौशल्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. गावातील तसेच परिसरातील नागरिकांनी बाल आनंद मेळाव्याचा आनंद घेतला. सदर बाजारात विविध वस्तूंची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती तथा मुख्याध्यापक व शिक्षक वृद्धांनी सहकार्य केले.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जाणीव संघटनेच्या वतीने अभिनव रुची वर्ग संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ डिसेंबर -**

वाशी तालुक्यात जाणीव संघटनेच्या वतीने अभिनव अभिरुची वर्ग कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा वाशी तालुक्यातील सिंधी जि.प.प्र. जवळका, जि.प.प्र. वाशी येथील जगदाळे मामा प्रशाला संस्कार विद्यालय वाशी साठेनगर वाशी, जि.प. शाळा गोळेगाव, कन्या प्रशाला वाशी आदी शाळेमध्ये वंचित विकास



जाणीव संघटनेच्या वतीने जाणीव संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामभाऊ लगाडे यांनी अभिनव अभिरुची वर्ग घेऊन जवळजवळ हजार ते दीड हजार मुला-मुलींपर्यंत त्यांना शिक्षणाचा आवड निर्माण होईल विज्ञानाचा प्रसार व्हावा त्यांच्या कला गुन्हा नवा मिळावा संवाद कौशल्य गुणवत्ता वाढीवर खेळ गाणी गोष्टी नकला असे कार्यक्रम राबवले.

यातून मुलांना मनसोक्त आनंद मिळाला. यावेळी प्रत्यक्ष शाळेतील मुख्याध्यापकांनी सहकार्य केले. यामुळे याम ध्ये कुदळ, शिंदे एस.एस., माने, सोने यांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### जोशींनी घेतले तुळजाभवानी मातेचे दर्शन

**तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -**

शिवसेनेचे पक्षप्रमुख महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांचे मुख्य सचिव सचिन जोशी यांनी कुटूंबीया समवेत घेतले महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजा भवानी मातेच दर्शन घेतले. यावेळी शिवसेनेचे धाराशिव जिल्हा सहसंपर्कप्रमुख अमरराजे कदम यांनी राज्याच्या पुरातन वास्तू संवर्धन विभागामार्फत मंदिरात होणार असलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. शहर विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे त्यांनी चर्चे दरम्यान सांगितले. मंदिर संस्थानचे जनसंपर्क अधिकारी गणेश मोटे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नगरपरिषदेच्या वतीने कार्यालय अधीक्षक वैभव पाठक व भांडार पाल बापूसाहेब रोचकरी यांनी त्यांच्या यथोचित सन्मान केला. यावेळी उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, युवासेना उपजिल्हाप्रमुख सुरज कोठावळे, उपतालुकाप्रमुख खंडु कुंभार उपस्थित होते.



### धरित्री विद्यालयात सानेगुरुजी जयंती

**जळकोट, दि.२५ डिसेंबर -**

ज्ञानदीप कलोपासक मंडळ संचलित, धरित्री विद्यालयात सानेगुरुजी जयंतीनिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. सर्वप्रथम शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांच्या हस्ते सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर इयत्ता पाचवी ते सातवीतील विद्यार्थ्यांनी सानेगुरुजींच्या श्यामची आई या पुस्तकातील बालपणीच्या कथा सांगितल्या. संस्कृती कदम हिने श्यामची आई या पुस्तकातील काही गोष्टी तोंड पाठ करून सादर केल्या. अण्णाप्पा सातलगावकर यांनी श्यामची आई या पुस्तकातील मूल्यशिक्षणावर आधारित कथा मुलांना सांगितल्या. युवराज होळे यांनी सानेगुरुजी यांची गीते सादर केली. सुनील पुजारी यांनी कथाकथन स्वरूपामध्ये साने गुरुजी यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना विद्यार्थ्यांसमोर जागृत केल्या. सर्व मुलांनी आवडीने कथा ऐकल्या. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



### भावना नान्नजकर यांचा पुरस्काराने गौरव

**धाराशिव, दि.२५ डिसेंबर -**

उमरगा येथील निवासी मूकबधिर विद्यालयातील विशेष शिक्षिका भावना नान्नजकर यांना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, समाज कल्याण विभाग जि.प. धाराशिव यांच्या वतीने जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. भावना नान्नजकर या निवासी मूकबधिर विद्यालय उमरगा येथे १९९६ पासून विशेष शिक्षिका पदावर कार्यरत आहेत. भविष्यात या विद्यार्थ्यांना सर्वसामान्यांसारखे शिक्षण देण्यास त्या तयार करणार आहेत. भविष्यात कॉकलेरीन इम्प्लान्ट झालेल्या मुलांचा वर्ग तयार करणे आणि त्यांना सर्वसामान्यांच्या प्रवाहात समाविष्ट करण्याचा त्यांचा मानस आहे. गरुडासारखे उंच गरुडभरारी घेणारे विद्यार्थी तयार व्हावेत असा संकल्प त्यांनी बोलून दाखविला. विशेष शिक्षिका पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### संकेत वाघे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -**



श्री तुळजाभवानी मंदीर संस्थान चे कर्मचारी सत्यजित उर्फ संकेत नागनाथ वाघे (वय ३८) यांचे सोलापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार चालु असताना मंगळवार दि.२४ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, भाऊ असा परिवार आहे. संकेत यांच्यावर आरादवाडी स्मशान भूमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा निधनाने शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### डॉ. राजेंद्र नाडापुडे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२५ डिसेंबर -**



येथील सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. राजेंद्र जगन्नाथ नाडापुडे (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने लातूर येथे सोमवारी निधन झाले. त्यांच्यावर तुळजापूर येथे मंगळवारी त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा व तीन भाऊ आहेत. त्यांचा निधनाने शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

### सावंत बंधूंना जीवे मारण्याची धमकीप्रकरणी...

# शिवसेनेच्या वतीने परंडा शहर कडकडीत बंद





**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ डिसेंबर -**

माजी मंत्री तथा विद्यमान आमदार प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत व केशव सावंत यांना निनावी पत्राद्वारे जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या निषेधार्थ शिवसेना शिंदे गटाच्या वतीने परंडा शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले. तसेच शिवसैनिकांच्या वतीने भव्य असा मोर्चा काढण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे शिवसेना स्टाईलने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच धमकी देणाऱ्या मास्टर माइंडला लवकरात लवकर अटक करण्याची मागणी तहसीलदार यांच्याद्वारे मुख्यमंत्र्याकडे निवेदनातून करण्यात आली.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, तेरणा सहकारी साखर कारखाना ढोकी (ता.जि. धाराशिव) येथील ऊस तोडणी करून निघालेल्या ट्रक्टर वाहन चालकाजवळ एक बंद लिफाफ्यात निनावी पत्र देऊन तुमचा मस्साजोग येथील सरपंच कै. संतोष देशमुख यांच्याप्रमाणे अवस्था करून जीवे मारण्यात येईल, अशी धमकी देण्यात आली होती, ही बाब अतिशय गंभीर आहे. त्याची वरिष्ठ पातळीवर तात्काळ दखल घ्यावी.

त्यांच्या जीवीतास कोणताही धोका होणार नाही याची दखल घेऊन सावंत बंधूंना योग्य ते पोलीस संरक्षण तात्काळ देण्यात यावे, अशी मागणी करीत संबंधित दोषी असलेल्या व्यक्तींचा तात्काळ शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी शिवसेना पक्षाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी माजी नगराध्यक्ष जाकीर सौदागर, शिवसेना तालुका प्रमुख आण्णासाहेब जाधव, शिवसेना तालुका संघटक जयदेव बप्पा गोफणे, शिवसेना युवा तालुका अध्यक्ष राहुल डोके, माजी नगराध्यक्ष सुभाषसिंह सद्दीवाल, आरपीआयचे संजय बनसोडे, माजी नगरसेवक वाजीद दखनी, माजी नगरसेवक रत्नकांत पापा शिंदे, संजय घाडगे, बालाजी नेटके, विशाल देवकर, गुलाब शिंदे, सत्तार पठाण, समीर मतीन पठाण, बाळू गायकवाड, बब्बू जिनेरी, अर्चनाताई दराडे आदिसह शिवसेना पदाधिकारी कार्यकर्ते, तसेच शिवसेना महिला पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तर आंदोलनावेळी पोलिसांकडून मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### पोलिसांनी लवकरात लवकर शोध घ्यावा...

तीन महिन्यापूर्वी परंडा तालुक्यातील सोनारी येथे जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष तथा माजी मंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांचे पुतणे धनंजय सावंत यांच्या घरासमोर अज्ञातांनी गोळीबार केला होता. सोमवारी धनंजय सावंत आणि तेरणा सह.साखर कारखान्याचे संचालक केशव सावंत यांना ऊस गाळपासाठी घेवून येणाऱ्या ट्रॅक्टर चालकाजवळ एका लिफाफ्यामध्ये १०० रुपयाची नोट आणि मस्साजोगमध्ये कै. संतोष देशमुख यांच्या हत्येचा उल्लेख करत मस्साजोग प्रकरण करण्याची धमकी दिली आहे. मात्र, या सर्वामध्ये गेल्या दोन तीन महिन्यापासून जिल्ह्यात केवळ माजी मंत्री प्रा.डॉ. सावंत यांचे कुंटबीय टार्गेट का होत आहेत. याचा पोलिसांनी शोध घ्यावयास हवा.

## परंडा शहरातील मुख्य रस्त्याची चाळणी; नागरिकांत नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२५ डिसेंबर -**

परंडा शहरात मुख्य रस्त्याची अवस्था अत्यंत दैननीय झालेली असताना ही संबंधित प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात येत असल्याने शहरवासीयांमधुन तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मध्यंतरच्या काळात नगरपालिकेच्या वतीने शहरातील मुख्य रस्त्यावर पडलेले खड्डे रुजविण्यासाठी मरुम टाकण्यात आला होता. पण सारखीच वाहतूक असलेल्यामुळे त्या मुरुमाची माती झाली व पुन्हा खडे डघडे पडल्याने पुन्हा प्रशासनाने विना डांबर खडी टाकली होती. पण ती खडी वाहनांच्या वेगाने डडुन नागरिकांना लागत आहे व ती खडी संपूर्ण रस्त्यावर पसरली आहे. शिवाय सध्या एक वाहन जरी गेले तरी धुळीचे लोट होतात. शिवाय पादचारी यांना सुध्दा चालताना त्रास होत आहे. तेव्हा वरिष्ठ अधिकारी यांनी याकडे लक्ष देवुन खराब झालेली रस्ते नव्याने त्वरित दुरूस्ती करून द्यायला पाहिजेत, अशी मागणी सर्व सामान्य जनतेतून होत आहे. तसेच परंडा ते वारदवाडी या रस्त्यावर ही गेले अनेक दिवसांपासून मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. भुम ते परंडा या नवीन रस्त्यांच्या कामाला मंजुरी मिळाली आहे, अशी चर्चा गेल्या तीन वर्षेपासून होत आहे. पण अद्यापही कामाला सुरुवात केली नाही.

## तेरणा अभियांत्रिकीच्या दोन विद्यार्थ्यांची जलसंपदा विभागात निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ डिसेंबर -**

येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचा दिवसेंदिवस नोकरीतील संधींचा आलेख वाढत असून नुकत्याच येथील तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य अभियांत्रिकी या विभागातील दोन विद्यार्थ्यांची सरळ सेवा भरती अंतर्गत जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाली आहे.

या पूर्वीच दोन विद्यार्थिनी याच विभागात लागलेल्या आहेत. परत एकदा स्थापत्य अभियांत्रिकीच्या सोमेश गाटे आणि वसिक पिरजादे या दोन विद्यार्थ्यांचे जलसंपदा विभागात स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून निवड झाल्याचे पत्र त्यांना प्राप्त झालेले आहे. त्यांच्या यशाबद्दल नुकताच महाविद्यालयाच्या वतीने दोघाचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, स्थापत्य अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख प्रा. शितल पवार, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, स्थापत्य अभियांत्रिकी सारख्या क्षेत्रात नोकरीच्या संधी अनेक असून विद्यार्थ्यांनी डिग्री बरोबरच, कौशल्यावर आधारित असलेले विविध कोर्सेस महाविद्यालयांमध्ये सुरू असून तेही पूर्ण करावेत. स्थापत्य अभियांत्रिकी मधून सलग तीन-चार वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या शासकीय नौकरी मध्ये निवडीचे प्रमाणही वाढलेले आहे. मागील दहा वर्षापासून कार्यरत असलेले तेरणा ट्रस्टच्या अंतर्गत असलेल्या तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्राच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षांमध्ये तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होत असून महाविद्यालयांमध्ये स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्याचे व शासकीय सेवेत अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण होत आहे.



या दोन विद्यार्थिनींच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. पद्मसिंह पाटील, विश्वस्त मा. आमदार राणाजगजीतसिंह पाटील, विश्वस्त मल्हार पाटील, व्यवस्थापकीय समन्वयक प्रा. गणेश भातलवंडे यांनी दोघांचेही विशेष अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

## शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन

### जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२५ डिसेंबर -**

शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख सुनिल काटमोरे यांच्या संकल्पनेतून तयार केलेल्या २०२५ चे दिनदर्शिकेचे प्रकाशन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे



यांच्या हस्ते मातोश्री येथे करण्यात आले. यावेळी शिवसेना नेते सचिव विनायक राऊत, डोंबिवली विधानसभा संपर्कप्रमुख प्रकाश वाणी, इतर उपस्थित होते.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे हे शिवसेना फुटीच्या नंतर धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून गेली एक ते दीड वर्षपासून एक सच्चा शिवसैनिक आणि निष्ठावंत हुशार शिवसैनिक म्हणून धाराशिव जिल्ह्यामध्ये काम करत आहेत. धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून सुनील काटमोरे यांचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचले आहे.

मातोश्रीशी एकनिष्ठ असलेले धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख सुनील काटमोरे यांनी गेली अकरा वर्षांपासून दिनदर्शिका प्रकाशन करत आहेत. या दिनदर्शिकामध्ये पक्ष हिताचे केलेली कामे व इतर सामाजिक माहिती दिनदर्शिकेमध्ये दर्शवलेली आहे. दिनदर्शिका हे आकर्षक व जास्त प्रमाणात प्रकाशित केल्यामुळे प्रत्येक शिवसेना पदाधिकारी कार्यकर्त्यांपर्यंत पोहोच होत आहे.

एकजुटीने राहा जाती आणि वाद गाडून मराठी माणसांची भक्कम एकजूट उभारा तरच तुम्ही टिकाल आणि महाराष्ट्र टिकेल या ब्रीद वाक्याचे दिनदर्शिका प्रकाशन केले आहे.

## ग्राम पंचायतची काम निकृष्ट; चौकशीची मागणी

**परंडा, दि.२५ डिसेंबर -**

परंडा तालुक्यातील आलेश्वर येथील ग्रा.पं.च्या वतीने १५ व्या वित्त आयोगामधुन करण्यात येत असलेले काम निकृष्ट दर्जाचे करण्यात येत असल्याची माजी सरपंच फारुख मुलानी यांनी निवेदनाद्वारे गटविकास अधिकारी यांच्याकडे केली आहे.

दिलेल्या निवेदनात पुढे म्हण्टले की भुमीगत गटारीचे अंदाज प्रत्रकानुसार करण्यात येत नाही. शिवाय सदरील काम ही नित्कुट दर्जा होत आहे. या कामाची वरिष्ठ अधिकारी यांनी तपासणी करून सदरील गटारीचे ठरवुन दिलेल्या अंदाज प्रत्रकाप्रमाणे करण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

## कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात पालक मेळावा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२५ डिसेंबर -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात कला व वाणिज्य जुनिअर विभागाचा पालक मेळावा दि.२३ डिसेंबर रोजी संपन्न झाला. या मेळाव्याचे प्रमुख अतिथी हभप. अशोक पाटील महा गांवकर हे होते.

त्यांनी पालक, पाल्य व शिक्षक या त्रिकोणाचा समन्वयक चांगला असेल तर कठीण यशावर सुद्धा आपण मात करू शकतो. येणाऱ्या काळात पाल्याकडे लक्ष देणे याला पालकांनी प्राधान्य देणे गरजेचे आहे. नविन नविन आव्हाणाला आपल्या पाल्यांनी सामोरे जाणे गरजेचे आहे. अपयश आले तरी न डगमगता जीवनाचा रस्ता कसा शोधायचा याच्यावर सविस्तर असे मार्गदर्शन पाटील सरांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षपदी प्राचार्य प्रा. शाम डोके वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख यांनी भूषविले. त्यांनी पालक म्हणजे जमीन, पाल्य म्हणजे बियाने व शिक्षक म्हणजे पाणी देणारे यांचा त्रिकोन चांगला असेल तर चांगल्या प्रतिचे उत्पादन झाल्याशिवाय राहणार नाही अशाच पाल्यांची आज कुटूंबाला व देशाला गरज आहे असे आव्हान त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. मिलींद शिंदे समन्वयक ज्युनियर विभाग यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. अनिता चिंचोलकर यांनी केला. तर आभार प्रा मोरे मॅडम यांनी मानले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. सुनिल आवारे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. गुंजाळ, प्रा. मुंडेकर, प्रा. खटमाळ व सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले.

## ॲड. मैना वडणे यांना सामाजिक प्रबोधन व धार्मिक कार्य पुरस्कार जाहीर


**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२५ डिसेंबर -**



तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथील धाराशिव जिल्हा बालकल्याण समितीच्या सदस्या ॲड. मैना वडणे (भोसले) यांना इटकळ पत्रकार संघ व शंभुराजे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा सामाजिक प्रबोधन व धार्मिक कार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

मैना वडणे यांना लहानपणापासूनच अभंग, गवळणी, भारुडाचा छंद असल्याने विविध कार्यक्रमांमध्ये त्यांनी आपले गायन करुन आध्यात्मिक व धार्मिक चळवळीत सहभाग घेतला आहे. धार्मिक कार्याबरोबर सामाजिक प्रबोधन त्यांच्याकडून नियमीत होत आहे. याचीच दखल घेत इटकळ येथील शंभुराजे बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा २०२४-२०२५ चा सामाजिक प्रबोधन व धार्मिक कार्य पुरस्कार संस्थेचे संस्थापक दिनेश सलगरे यांनी नियुक्ती पत्राद्वारे कळविले आहे.

## कळंब येथे राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त 'जागो ग्राहक जागो'चा संदेश



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२५ डिसेंबर -**

जिल्हा पुरवठा कार्यालय धाराशिव व तहसील कार्यालय कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीज्ञ त्र्यंबकराव मनगिरे हे होते. तर या प्रसंगी पुरवठा निरीक्षण अधिकारी शिल्पा माळवे, सहाय्यक निबंधक कार्यालयचे बालाजी चिंचोले, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पूंडके, वन विभागाच्या श्रीमती आवारे, वाहतूक निरीक्षक निलेश जाधव, सामाजिक कार्यकर्ते भास्करराव सोनवणे, मुसद्दीक काझी, प्रकाश भडंगे, श्रमिक मानवाधिकार संघाचे बजरंग ताटे, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, सामाजिक कार्यकर्ते बंडू ताटे, दत्ता गायकवाड, गोविंद चौधरी, मानव अधिकार आंदोलनचे हनुमंत पाटुळे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.

यानंतर पाहुण्यांचे स्वागत पुरवठा विभागाचे आर.डी. पवार यांनी केले. या प्रसंगी कार्यक्रमात श्रमिक मानवाधिकार संघाचे बजरंग ताटे, मुसद्दीक काझी, प्रकाश भडंगे दक्षता समिती धाराशिव, सचिन क्षीरसागर, भास्कर सोनवणे यांनी ग्राहकांची होणारी फसवणूक तसेच विद्युत मंडळ, राज्य परिवहन मंडळ, मोबाईल सेवा देणाऱ्या कंपनी तसेच स्वस्त धान्य दुकानातून होणारा धान्य पुरवठा आदी ग्राहकांच्या तक्रारी चर्चा केली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पत्रकार माधवसिंग राजपूत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी, पुरवठा निरीक्षक जयदेवी कांबळे, टंकलेखक भाग्यश्री मोटे, नरहरी लोहकरे, अंकुश झोंबाडे, गणेश आडसूळ, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास तालुक्यातील रास्त भाव धान्य दुकानदार, तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवराची उपस्थिती होती.

## सिल्लोड मध्ये राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा



सिल्लोड प्रतिनिधी

ग्राह वनक हित लक्षात घेऊन प्रत्येक घटकांनी आपली जबाबदारी पार पाडल्यास राष्ट्रीय ग्राहक जागृती पंधरवडा साजरा केल्याचे सार्थक होईल असे प्रतिपादन तहसीलदार संजय भोसले यांनी केले. मंगळवार दिनांक २४ रोजी तलाठी भवन सिल्लोड येथील सभागृहात आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाच्या शुभारंभ प्रसंगी तहसीलदार भोसले बोलत होते .यावेळी नायब तहसीलदार शेख हारून ,नायब तहसीलदार विजयमाला पापुलवाड, ग्राहक पंचायतचे अध्यक्ष संजय कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती .यावेळी बोलताना तहसीलदार भोसले यांनी ग्राहकाची फसवणूक व त्यासंबंधीच्या उपाययोजनांबाबत सविस्तर विवेचन करून प्रत्येक घटकाने आपली जबाबदारी ओळखून काम करण्याचे आवाहन याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष रफिक शेरखान यांनी केले. प्रारंभी दीप प्रज्वलन करून व स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी ग्राहक दिनाच्या अनुषंगाने आलेल्या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सदर कार्यक्रमासाठी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे पदाधिकारी,राष्ट्रीय बँकेचे पदाधिकारी,पेशकार आशिष आवटी,पंडित पारधे, बंडू गोडसे,गजानन मरकड, भगवान काथार,आनंद दांडगे, प्रसाद वराडे,राजू रोजेकर ,विपुल चौधरी,भाऊसाहेब निकाळजे,एकनाथ पांढरे,कौतिक गवळी,साहेबराव शेळके, इंदलसिंग बैनाडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिडको वाळूज महानगरातून दोन क्रेटा कार लंपास

वाळूज महानगर, (प्रतिनिधी)- औद्योगिक परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, दररोज ठिकठिकाणी चोऱ्या, दुचाकी चोरी आदी घटनांत कमालीची वाढ झाली आहे. त्यातच रात्री सिडको वाळूज महानगर परिसरातील घरासमोर उभ्या केलेल्या दोन वेगवेगळ्या क्रेटा कार चोरीला गेल्यामुळे परिसरातील कामगार वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असून, या घटनांना आवर घालण्याची मागणी होत आहे.

सिडको वाळूज महानगर येथील श्रीरंग पांडूरंग शेळके यांनी त्यांच्या घरासमोर त्यांच्या मालकीची क्रेटा कार क्रमांक एमएच २०एफ जी ६९८८ ही क्रेटा कार अंदाजे किंमत ६ लाख रुपये ही पार्क करून ठेवली होती परंतु पहाटे त्यांना सदर कार दिसून न आल्याने त्यांनी सीसीटीव्ही पाहणी केली असता, त्यांची कार अज्ञात इसम चोरी करून घेऊन जात असल्याचे निदर्शनास आले. दुसऱ्या घटनेत याच परिसरातील संगीता अरुण कोटमे यांचीही क्रेटा कार क्रमांक एमएच २० इवाय ८७३३ अंदाजे किंमत ५ लाख, रुपये ही कारही पार्किंग केलेल्या ठिकाणाहून अज्ञात इसमांनी पळवून नेली आहे. दोन्ही कार चोरीच्या घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्या आहेत. शेळके व कोटमे यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डीएमआयसी मध्ये येणारा नांदलगाव -अलीपुर-लाखेगाव रस्ता अबाधित ठेवण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २५ डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन डीएमआयसी मध्ये नांदलगाव अलीपुर लाखेगाव हा रस्ता आहे या रस्त्याने नांदलगावची पाणीपुरवठ्याची पाईपलाईन गेलेली आहे या रस्त्यासाठी बिडकीन नांदलगाव लाखेगाव अलीपुर येथील व परिसरातील शेतकऱ्यांची वर्दळ असते हा रस्ता डीएमआयसी ने टोयाटो कंपनीला दिलेल्या जमिनीतून जातो कंपनीने कंपाऊंड चे काम हाती घेतले असून हा रस्ता बंद होण्याची शक्यता आहे तेव्हा या परिसरातील शेतकऱ्यांना शेतजमिनी कसण्यासाठी रस्ताच राहणार नाही तसेच नांदलगाव येथील पाणीपुरवठा विस्कळीत होऊ शकतो तेव्हा सदरचा रस्ता अबाधित ठेवावा अशी विनंती शेतकऱ्यांनी डीएमआयसी चे प्रभारी अधिकारी महेश पाटील यांना निवेदनाद्वारे केली आहे याप्रसंगी महेश पाटील यांनी शेतकऱ्यांची सविस्तरपणे बाजू ऐकून घेत याबाबत योग्य मार्ग काढण्यात येईल असे आश्वासन दिले निवेदन देताना डीएमआयसी प्रकल्पग्रस्त समितीचे सचिव नंदकुमार वैद्य ,कृषीभूषण बालचंद घूनावत, शिवाजी गव्हाणे, सरपंच लक्ष्मण रहाटवाडे,सरपंच ज्ञानेश्वर रहाटवाडे,विजय मुरहाडे ,जगदीश ताजी, कडू पटेल, सामाजिक कार्यकर्ते अशोक हुड,अजीम पटेल शेख बाबासाहेब,दिलीप घुन,काळूराम मुऱ्हाडे.

## कालिका देवी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा प्रसाद महाराज अमळनेरकर यांच्या शुभ हस्ते संपन्न

तभा वृत्तसेवा



पैठण दि २५ :- दक्षिण काशीतील श्री क्षेत्र जुने पैठण मधील प्राचीन भगवती कालिका देवी मूर्तीची पुनश्च: प्राणप्रतिष्ठा हभप श्रीप्रसाद महाराज अमळनेरकर मठाधिपती यांच्या हस्ते पुरोहिताच्या मंत्र घोषात संपन्न करण्यात आली.

मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा निमित्याने पाच दिवशीय धार्मिक विधी पारपडला या सोहळ्याच्या प्रारंभ दिनांक २० डिसेंबरला मिरोणुकीणे झाला तर दिनांक २४ डिसेंबरला पूर्णहुती ने या सोहळ्याची सांगता झाली महाप्रसादाच्या लाभ घेण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते सोहळ्यातील विवीध धर्मीक विधी वर्षाताई विलास भूमरे व युवा सरपंच शिवराज भूमरे यांचा हस्ते पुरोहित दत्तात्रय पोहेकर,सतीश वागेश्वरी, रेणुकादास गरगे, रविंद्र साळजोशी,दिपक जोशी, योगेश चक्रे,गणेश मुळे, कैलास देशमुख, विनोद कुलकर्णी,सौरभ पोहेकर, यांच्या मंत्र घोषात संपन्न झाला रांगाराहाट्टी येथील कलिका देवीचे मंदीर खासदार संदीपान पाटील भुमरे, आमदार विलास भूमरे ,छत्रपती शिवाजी संघ, शिवयोद्धा ढोल पथक कालिका देवी महिला भक्त मंडळ व भाविकांच्या पुढाकाराणे भव्यदिव्य असे मंदीर उभारण्यात आले आहे.

# रब्बी पिकांचे वन्यप्राण्यांकडून नुकसान; बळीराजा हवालदिल

## वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याची सोयगाव परिसरातील मागणी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ डिसेंबर

सोयगाव सह परिसरातील शेत शिवारांमध्ये वन्यप्राण्यांच्या सततच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांच्या कोवळ्या रब्बी पिकांचे अतोनात नुकसान होत आहे. यामुळे शेतकरी कमालीचे त्रस्त झाले आहेत, वनविभागाने दखल घेऊन वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे.

### रब्बीच्या पेरा वाढला मात्र वन्यप्राण्यांचा त्रास

यंदा परतीच्या पावसाने रब्बी हंगामाचा पेरा वाढला आहे. मात्र वन्यप्राणी पिकांचे मोठे नुकसान करीत आहेत. अनेक शेतात पिकांचे नुकसान झाले आहे. यंदा गहू, हरभरा, दादर, मका पिकांची स्थिती उत्तम आहे. परिसरात हरणांचा व रानडुक्कर चा उपद्रव सुरू आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकयांना रात्रंदिवस खडा पहारा द्यावा लागत आहे. वारंवार तक्रार देऊनही दखल घेतली जात नाही. मेहनत करून उभे केलेले पीक डोळ्यादेखत जमीनदोस्त होत आहे. त्यामुळे शेतकरी संकटात आहे. वन्यप्राण्यांपासून पिकांच्या संरक्षणासाठी दमछाक होताना दिसून येत आहे.

### गहू, हरभरा, मका पिके तुडविले जाताहेत

सोयगाव तालुका हा अजिंठ्याच्या डोंगराच्या पायथ्याशी वसलेला आहे या ठिकाणी वन्यप्राण्यांचा अधिवास आहे. ते थेट शेतात अतिक्रमण करीत आहेत. सुसाट धावत असल्याने त्यांच्या पायाने मका, गहू, हरभरा, केळी, भाजीपाला पिके तुडविली जात आहेत.सोयगावसह परिसरातील सर्वच शेतकऱ्यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. या परिसरात हरणांचा मोठा त्रास होत आहे. वनविभागाने याची दखल घेऊन तातडीने हरीणांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

सोयगाव, जरंडी, रावेरी,वेताळवाडी,या परिसरातील शेत शिवारात मोठ्या प्रमाणावर रानडुकरे, रोही आणि हरणांचे कळप आहेत. एका कळपामध्ये ६० ते ७० हरिण,रानडुक्कर, रोही असतात. या वन्यप्राण्यांचा शेत शिवारात मुक्त संचार सुरू असून शेतांमधील हरभरा, मका व गहू या कोवळ्या पिकांना पायदळी तुडवून व फस्त करून कोवळ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर अतोनात नुकसान करीत आहेत. आतापासून ही स्थिती आहे. तर पीक परिपक्व होऊन तयार माल घरात येईपर्यंत या वन्यप्राण्यांकडून मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान होणार असल्याने वनविभागाने वेळीच दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.मात्र वनविभागाकडून तुम्ही ऑनलाइन तक्रार करा तेव्हाच पंचनामा करू असे उत्तर मिळत असल्याने शेतकरी हतबल झाले आहे.

## योगेश जाधव यास पंतप्रधान रिसर्च फेलोशिप प्रदान

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२५ डिसेंबर - तालुक्यातील दुर्गम भागातील बहुल सितानाईक तांड्यातील रहिवाशी गोव्यातील बिटस् पिलानी कॉलेज मध्ये रासायनिक अभियांत्रिकी मध्ये पी एच डी करीत असलेल्या योगेश पूर्णाबाई झब्बू जाधव यास नुकत्याच भारत सरकारद्वारे पी एच डी साठी पंतप्रधान रिसर्च फेलोशीप प्रदान करण्यात आली. देशातील ४६ पी.एच डी करत असलेल्या विद्यार्थ्यांना पंतप्रधान रिसर्च फेलोशीप प्रदान करण्यात आली. त्यात योगेश पूर्णाबाई झब्बू जाधव याचा समावेश आहे. पंतप्रधान रिसर्च फेलोशिप ही देशातील सर्वोच्च फेलिशिप व बहुमान आहे यात तुरळक विद्यार्थ्यांची निवड होती.

पदव्युत्तर पदवी मध्ये मिळालेल्या गुणांवर व गेट या परीक्षेच्या गुण,रिसर्च टॉपिक यावर निवड केल्या जाते यात दोन ते तीन वेळेस मुलाखती होतात व त्याच बरोबर स्क्रिनिंग चाचण्या होतात. योगेश जाधव यास पंतप्रधान रिसर्च फेलोशिप पी एच डी च्या चार वर्ष कालावधी साठी प्रतीमहा ७० हजार रुपये विद्या वेतन मिळणार आहे.



यशामध्ये तालुक्यातील प्रसिद्ध कृषिभूषण डॉ.सीताराम जाधव व डॉ रविराज जाधव यांचा मोलाचा वाटा असून त्यांचा शैक्षणिक खर्च,जाधव कुटूंबीय करत असल्याने तालुक्यात समाधान व्यक्त होत आहे प्रोफेसर एस. डी.मांजरे, डायरेक्टर सुमन कुंडू ,निवृत्त मुख्याध्यापक अनंतराव मांडे, साईदास राठोड, सरस्वती क्लासेसचे संचालक विजयकुमार मांडे, गणित तज्ञ शेखर मांडे, बाजीराव राठोड,विलास राठोड, नामदेव राठोड,बाबू जाधव,भरत जाधव, अक्षय पाटील, गब्रू जाधव, प्रकाश जाधव,पंडित जाधव, कृष्णा जाधव,सैनिक राहुल राठोड, संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे तिलकचंद राठोड, कंडाक्टर पंडित राठोड, ग्रामसेवक चांगदेव पवार , कौस्तुभ मांडे, राजेश जाधव,नवनाथ राठोड , अर्जुन पवार, विनय मांडे,किशोर नागरे,अक्षय जाधव,प्रकाश काळे, रितेश राठोड, करण राठोड,आदींनी अभिनंदन केले आहे

## आंतर महाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि. २५ डिसेंबर- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व संत तुकाराम महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी आंतर महाविद्यालयीन मल्लखांब स्पर्धेचे आयोजन धर्मवीर संभाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन विनायकराव पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस ॲड. प्रसन्न पाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संदिप जगताप, प्रभारी क्रीडा संचालक, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे उपस्थित होते, श्री. बालाजी नरवडे सचिव जिल्हा मल्लखांब संघटना छत्रपती संभाजीनगर, प्रो. व्यंकटेश लांब व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, प्राचार्या प्रो. सुनीता देशमुख व इतर महाविद्यालयातून आलेले क्रिडा संचालक व स्पर्धेसाठी आलेले खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मल्लखांब स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे सुत्रसंचालन डॉ सुहास यादव क्रिडा विभाग प्रमुख संत तुकाराम महाविद्यालय कन्नड यांनी केले.

## स.भु.क्रीडा महोत्सवामध्ये स.भु. बिडकीन चे घवघवीत यश




तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २५ डिसेंबर : श्री.सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या अंतर्गत सर्व शाखांवरील विद्यार्थ्यांच्या ११व्या क्रीडा महोत्सवामध्ये पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीनने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण होऊन संस्थेमध्ये चांगले खेळाडू निर्माण व्हावेत या उद्देशाने श्री.सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या वतीने दरवर्षी आंतरशाखीय क्रीडा स्पर्धे चे आयोजन केले जाते. यावर्षी दिनांक २३ व २४ डिसेंबर या दोन दिवस कबड्डी, खोखो, व्हॉलीबॉल, कुस्ती,धावणे या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन अर्जुन पुरस्कार प्राप्त खोखो खेळाडू सारिका काळे यांच्या हस्ते तर पारितोषिक वितरण सोहळा अर्जुन पुरस्कार प्राप्त कबड्डी खेळाडू अभिलाषा म्हात्रे, संस्थेचे अध्यक्ष ड दिनेशजी वकील, सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे यांच्या हस्ते झाले. या स्पर्धेत अतिशय उत्कृष्ट कामगिरी करीत सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन ने नेत्रदीपक यश संपादन करीत संस्था अंतर्गत आपला दबदबा निर्माण केला आहे व्हॉलीबॉल मुले१७ वर्ष विजयी,१४ वर्ष मुले उपविजयी, कबड्डी मुली१४ वर्ष विजयी, कबड्डी मुले १७ वर्ष तृतीय, खोखो १४ मुली उपविजयी, वैयक्तिक स्पर्धेत कुस्ती ६५ किलो गटात युवराज नरवडे प्रथम, ऋषिकेश चौधरी द्वितीय, कुस्ती ६० किलो गटात निलेश हिवाळे प्रथम,ओम हिवाळे द्वितीय, कुस्ती ४८ किलो गटात अविनाश टेके द्वितीय,३५ किलो गटात पवन सोलाटे प्रथम,सुदाम विर द्वितीय, युवराज बारबैलै प्रथम,धावणे.२०० मीटर १४ वर्ष वैभव मगर द्वितीय, ओम कुल्हड तृतीय, २०० मीटर धावणे १७ वर्ष वरद शिंदे तृतीय, ४०० मीटर धावणे शिवराज जांभळे तृतीय, मुली २०० मीटर धावणे १४ वर्ष खुशी जाधव प्रथम,४०० मीटर धावणे १७ वर्ष अक्षरा अंबिलवादे तृतीय यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक मोहम्मद आसिफ शेख, अनिल कांबळे, राहुल शिंदे,संघ व्यवस्थापक विजय पचलुरे, तुषार अहिरे, संजिवनी काथार, सुवर्णा बैरागी, वैशाली लोंढे यांचे मार्गदर्शन लाभले. या घवघवीत यशाबद्दल यशस्वी खेळाडू व मार्गदर्शक शिक्षक यांचे मुख्याध्यापक धर्मेद्र येवले उपमुख्याध्यापक युवराज पाडळे, पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, प्रभारी पर्यवेक्षक राजू शिंदे , ज्ञानेश्वर चाटूपळे,सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

## नाताळ निमित्त दुर्गा इंग्लिश स्कूल मध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन



बिडकीन दि २५ : डिसेंबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील दुर्गा इंग्लिश स्कूल मध्ये नाताळ सण सेलीब्रेशन तसेच फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली.फॅन्सी ड्रेस स्पर्धेत विद्यार्थी कलेक्टर,आर्मी, डॉक्टर, सायंटिस्ट,सोशल मीडिया वर असणारे महत्वाचे प, क्टर, क्ट्रेस, शेतकरी, स्पोर्ट्स प्लेयर, राजकीय नेता,गायक इ.बऱ्याच क्षेत्रात काय काय महत्व आहे व भविष्यात विद्यार्थी कशाकशात करीयर घडवु शकतात हे विद्यार्थ्यांनी या स्पर्धेद्वारे वेशभूषेतुन आपली मत मांडली.या वेळी संस्थाचालक ओमप्रकाश जैस्वाल, प्राचार्य व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. शाळेतील शिक्षकांनी सँटाक्लॉजची सुंदर रांगोळी काढून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## स्टुडिओज् प्रस्तुत 'संगीत मानापमान' चित्रपटाचा भव्य दिव्य ट्रेलर प्रदर्शित !

छत्रपती संभाजीनगर - नववर्ष मराठी चित्रपटसृष्टीसाठी खूप खास ठरणार आहे. कारण ज्या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट बघताय तो संगीतमय चित्रपट संगीत मानापमान नववर्षाच्या सुरवातीला प्रदर्शित होणार आहे. जिओ स्टुडिओज् प्रस्तुत आणि सुबोध भावे दिग्दर्शित संगीत मानापमान चा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस आलाय. विशेष म्हणजे महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणविस ह्यांच्या उपस्थितीत हा भव्य दिव्य सोहळा पार पडला. शौर्याला, धैर्याला, पराक्रमाला आणि त्यागाला वंदन करून एका संगीतमय प्रेमकथेचा हा संपूर्ण प्रवास चित्रपटात आपण अनुभवायला मिळतो.

## वार्षिक स्नेहसम्मेलनात अग्रसेन विद्या मंदिराने जागविल्या 'सामाजिक जाणिवा'

इटखेडा / प्रतिनिधी - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर ह्या सी.बी.एस.ई. बोर्ड शाळेमध्ये दि. २२ ते २४ डिसेंबर या तीन दिवसांमध्ये शाळेच्या छत्रपती अग्रसेन महाराज सभागृहात १८ वे वार्षिक स्नेहसंमेलन जल्लोषात साजरे केले गेले. वर्षभरात परीक्षा, विविध शैक्षणिक उपक्रम यातून उसंत मिळावी व आपल्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा म्हणून स्नेहसंमेलनासाठी आसुसलेले विद्यार्थी या कार्यक्रमात हिरिरीने सहभागी झाले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना फुलविणार्या तसेच उत्साह निर्माण करणार्या या पर्वात विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व जोश पहावयास मिळला. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांना सर्वप्रथम शिक्षक सौरभ जोशी व दीपा देहाडे यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी मानवंदना दिली.

दि.२२ डिसेंबर रोजी सकाळ व दुपार या अनुक्रमे दोन सत्रात सकाळी पूर्वप्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी 'रेनबो' या शिर्षकांतर्गत आपल्या कलागुणाद्वारे प्रेक्षकांना सभागृहात बांधून ठेवले. रेनबो म्हणजे इंद्रधनुष्य ज्यात सात रंगाच्या छटा दिसतात व पावसाळी आसमंताला हे इंद्रधनु सुशोभित करते त्याचप्रमाणे चिमुकल्यांनी आपल्या कलागुणांच्या विविध छटांमधून रंगांचे स्वभाववैशिष्ट्ये दर्शवून रसीक प्रेक्षकांना दाद देण्यास भाग पाडले. त्यानंतर दुपारच्या सत्रात इ. १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांर्थ्यांनी 'विज्ञान आणि संस्कृती' या शिर्षकांतर्गत भारताच्या समृद्ध संस्कृतीचे वर्णन करतांना आजच्या विज्ञान युगात ती कशी श्रेष्ठ हे छोट्याछोट्या प्रसंगातून प्रेक्षकांसमोर सअभिनय व नृत्याद्वारे प्रस्तुत केले.

दुसर्या दिवशी दि. २३ डिसेंबर २०२४, सोमवार रोजी सकाळच्या सत्रात इयत्ता तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी 'सुधा मुर्ती' यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध कंगोरे आपल्या अभिनय व नृत्याद्वारे प्रेक्षकांसमोर जीवंत केले. विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा हाच या व्यक्तिविशेषाचा उद्देश. दुपारच्या सत्रात मानवी स्थायीभावाला कलेद्वारे प्रत्यक्ष रसनिर्मितीत कसे परिवर्तीत करता येते हे 'नवरस' यामध्ये दर्शविले. हास्य, करूण, रौद्र, वीर, भयानक, शृंगार, शांत, अद्भुत, बीभत्स या रसांनी युक्त नृत्याद्वारे प्रेक्षकांची वाहवा मिळवली.




दि. २४ डिसेंबर २०२४, मंगळवार रोजी सकाळच्या सत्रात इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी देवों के देव 'महादेव' यांना भोलेनाथ, नीलकंठ, कालभैरव, वीरभद्र, आदियोगी ही नावे कशी मिळाली हे विविध प्रसंग व नृत्य रूपात प्रेक्षकांसमोर सादर केले. दुपारच्या सत्रात इ. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांनी 'महाभारत' या शिर्षकांतर्गत नाटिका सादर करतांना प्राचीन काळातील भगवान श्रीकृष्ण व आधुनिक काळातील शिक्षक यांच्या भूमिकेमध्ये सहसंबंध साधून सामाजिक जागृती जागवण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाची सुरूवात प्रतिमापूजन, ईशस्तवन व थिमसाँगने करण्यात आली. प्रस्तुत स्हेनसंम्मेलाचा उद्देश्य केवळ मनोरंजन नसून विद्यार्थ्यांच्या आजच्या काळातील समस्या, त्यांचे सामाजिक भान व कर्तव्ये हा होता.

या तीन दिवसीय कार्यक्रमास उद्घाटकपदी अनुक्रमे पहिल्या दिवशीच्या सत्रात नंदकुमारजी घोडेले (माजी महापौर, छ. संभाजीनगर) व डॉ.सचिनजी सोनी (नेफ्रोलॉजी विभागप्रमुख, मेडिकव्हर हॉस्पिटल, छ. संभाजीनगर), दुसर्या दिवशीच्या सत्रात नितीनजी बगाटे (पोलीस उपायुक्त, छ. संभाजीनगर), कुंजबिहारीजी अग्रवाल (अध्यक्ष, अग्रवाल सभा), तिसर्या दिवशीच्या सत्रात डॉ.उल्हासजी गवळी, डॉ.पुरुषोत्तमजी दरक (एम.सीएच., यूरोलॉजी, एमबीबीएस, जनरल फिजिशियन) तर प्रमुख पाहुणे पदी शाळेचे विश्वस्त केशवजी लीला, मनीजी लीला यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास शाळा समितीचे विद्यमान अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, सत्यनारायणजी अग्रवाल (माजी अध्यक्ष, अग्रसेन विद्या मंदिर), किशोरजी अग्रवाल, संजयजी अग्रवाल, गोकुळचंदजी अग्रवाल अग्रवाल, नितीनजी बगडिया, सच्चानंदजी अग्रवाल, राकेशजी अग्रवाल, राजकुमारजी अग्रवाल तसेच इतर मान्यवर सदस्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधीक्षक अजय सोनुने यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रबद्ध लेखन व दिग्दर्शन सारिका हानवते, सविता आरबोले, योगिता लाळे व आकाश काळे यांनी केले. सुयोग्य नियोजनासाठी नृत्य विभागातील शिक्षक विक्रम शर्मा, सौरभ जोशी, दिव्या गुप्ता, तृप्ती तायडे व शितल श्रोत्रिय तसेच संगीत विभागातील नेहा नेरळकर, सागर नागापुरकर, सुप्रिया खरात, नंदा (बेबी) साळवे यांनी तर नाटिकेतील आकर्षक कलानेपथ्य मिनल शिरूडे, प्रीती केळगावकर व मिनल देशमुख यांनी केले.

दिनविशेषानुसार सुयोग्य रांगोळीद्वारे परिसर सुशोभनासाठी अंजली खरपुडे, पुनम अग्रवाल, आरती दिक्षीत, वैशाली देशमुख, संस्कृती अग्रवाल यांनी परिश्रम घेतले. भारतीय संस्कृती दर्शवणारे प्रमुख पाहुण्यांचे स्वागत मिनाक्षी खंडेलवाल व प्राजक्ता फोकणे यांच्या मार्गदर्शनखाली विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाच्या संपन्नतेसाठी विभाग प्रमुख सरिता काळे, स्मिता पाटील, लक्ष्मी दयालानी, उर्मिला करंगुला, सुचिता मुंदडा, नम्रता गील, सीमा धूत, दीपाली मोरे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अविरत परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन खुवी पाटणी, अक्षरा जसोरिया, श्रेया भापकर, यशी झा, उत्कर्ष जाधव, हरिश गुंजलेकर, नुपूर शुक्ला, प्राप्ती पवार, वैष्णवी सुरेका, आर्या भालेराव व वेदश्री खडके यांनी तर आभार प्रदर्शन कस्तुरी काथार, विधी कुटे, दिवीजा शहापुरकर, अक्षरा मुंदडा, भार्गवी पाटील, श्रुती रोटे यांनी शिक्षिका वैशाली खरात यांच्या मार्गदर्शनाखाली केले. संगीत शिक्षक नेहा नेरळकर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## ▶▶ क्राईम वृत्त...



### अप्पर जिल्हाधिकारी आरगुंडे यांचा सत्कार

**चाकूर, दि.२५ डिसेंबर -**

अप्पर जिल्हाधिकारी एच.व्ही. आरगुंडे यांची मुख्यमंत्री कार्यालय महाराष्ट्र राज्य मंत्रालय,मुंबई येथे मुख्यमंत्री यांचे उपसचिव म्हणून नुकतीच नियुक्ती झाली आहे.त्यांच्या या नियुक्तीबद्दल चापोली येथील युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी सत्कार करुन अभिनंदनपर शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्ञानेश्वर तोरे, आकाश चेवले, ईश्वर स्वामी, आदी जण उपस्थित होते.



### पानगाव शाळेत सुशासन दिन साजरा

**रेणापूर, दि.२५ डिसेंबर -**

नेहरू युवा केंद्र लातूर यांच्या वतीने सुशासन दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम पानगाव येथील सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तालुका रेनापुर येथे साजरी करण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद होता. कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्राध्यापक प्रल्हाद डोंगरे यांनी विद्यार्थ्यांना भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावरील विषयाचे मार्गदर्शन केले व गीते राघव, कांबळे संबोधी, साळवे दीक्षा, लोणकर संदीप, शिरसाट काशीराम, स्वामी अंजली, पार्थ अनगोटे, संजीवनी उपाडे, सौरभ सिरसाठ, इंगळे शुभांगी, श्रुती उजगिरे, शैक्षणिक साहित्य माय भारत नोटबुक व बॅच वाटून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमासाठी उपस्थित शाळेतील शिक्षक वृंद येडले, कलुरे, गोरे, पवार, शेंडगे, अमृता भंडारे, बरिदे अयोध्या आणि तालुका स्वयंसेवक अविनाश दुमपल्ले या कार्यक्रमासाठी जिल्हा नेहरू युवा अधिकारी साक्षी समैंय्या व लेखपाल संजय ममदापूर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला.



### महात्मा बसवेश्वर दिनदर्शिकेचे प्रकाशन

**चाकूर, दि.२५ डिसेंबर -**

लिंगायत महासंघाच्या वतीने काढण्यात आलेल्या महात्मा बसवेश्वर दिनदर्शिकेचे प्रकाशन दि.२५ डिसेंबर रोजी शिरुर ताजबंद येथे महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लिंगायत महासंघ अहमदपूर व चाकुर शाखेच्या वतीने ना. बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लिंगायत महासंघाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुदर्शन बिरादार, लिंगायत महासंघाचे चाकुर तालुकाध्यक्ष सुभाष शंकरे, तालुका कार्याध्यक्ष धीरज माकणे, शहराध्यक्ष संजय पाटील, जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पाटील, जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, अहमदपूर तालुका सरचिटणीस चंद्रशेखर हामणे, दत्तुसिंग वंगवाड, नवनाथ डोंगरे आदीसह संघटनेचे चाकुर, अहमदपूर तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



### 'उदयगिरी'त गणित दिवस साजरा

**उदगीर, दि.२५ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात गणित विभागाच्या वतीने राष्ट्रीय गणित दिवसाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गणित विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.बी.डी. करंडे हे अध्यक्ष म्हणून होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर.बी. अलापुरे व प्रा.डॉ.व्ही.एस. नागपूर्णे होते. कार्यक्रमास पूजा कोळी व स्नेहा नामवाड या माजी विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रा.डॉ.आर.बी. अलापुरे म्हणाले, गणित हा विषय माणसाला तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्यास प्रवृत्त करते. अध्यक्षीय समारोप करत असताना प्रा.डॉ. करंडे यांनी श्रीनिवास रामानुजन यांचा जीवन प्रवास सर्व विद्यार्थ्यास सांगितला. कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी अरुण मनोहर यांनी त्याचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी गणित विषयाचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत वाघमारे यांनी केले व आभार आशिष शिंदे यांनी मांडले.

### खेळाडूंची विद्यापीठ थलेटिक्स संघात निवड

**उदगीर, दि.२५ डिसेंबर -**

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील स्नेहा बुरपल्ले, आरती जाधव या खेळाडूंची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या थलेटिक्स संघात निवड झालेली आहे. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ थलेटिक्स स्पर्धा दि.२६ ते ३० डिसेंबर या कालावधीमध्ये कलिंग इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, भुवनेश्वर (ओडीसा) येथे होणार आहेत. या स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी या विद्यार्थ्यांची विद्यापीठ संघात निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे, प्रा. रोहन एनाडले यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी. पाटील तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



## महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद देवेंद्र फडणवीसांमध्ये : आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२५ डिसेंबर -**

औशाला मंत्रीपद मिळाले नाही यापेक्षा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री भाजपचा झाला. याचा अधिक आनंद औशाच्या जनतेने मानला पाहिजे. एका मंत्र्याप्रमाणेच तुमचा आमदार काम करेल यात कसलीही शंका तुमच्या मनात येऊ देऊ नका. औसेकरांना गेल्या अडीच वर्षांत विकास काय असतो ते मी दाखवून दिले आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने महाराष्ट्राच्या जनतेला कल्याणकारी मुख्यमंत्री मिळाला असून महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद मुख्यमंत्री फडणवीस यांच्यामध्ये असल्याचा विश्वास आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केला आहे.



औसा तालुक्यातील बुधोडा येथे आ. पवार यांचा सत्कारकरण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्रभाकर कोळपाक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सुर्यकांत सातपुते, भाजपचे तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, माऊली मिटापल्ले, कैलास पाटील, दत्ता चेवले, सुभाष पाटील, रवी चिलमे, बालाजी चामे, गुलाब सय्यद, सिताजी कदम, शिवानंद धाराशिवे, शिवाजी बंडकर, विनायक पवार, ज्ञानेश्वर बुधोडे, हेमंत पाटील, विजय कदम, ज्ञानेश्वर इंजे, कमलेश निलंगेकर, हर्षवर्धन धाराशिवे आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. आभिमन्यू पवार म्हणाले, देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून काम करताना शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक चांगले निर्णय घेतले. महाराष्ट्राचा कायापालट करण्याची ताकद देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये आहे. त्यांनी सुरू केलेल्या जल युक्त शिवार अभियानामुळे लातूर जिल्हा टॅकरमुक्त झाला आहे. पोखरा सारख्या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांनी काम केले आहे.असे सांगून ते म्हणाले की काम करणाऱ्या कार्यकर्त्याला आमदार म्हणून काम करण्याची दुसऱ्यांदा संधी मतदारांनी दिली आहे. विकासाच्या मुद्द्यावर बोलायला जागा नसल्याने विरोधकाकडून अनेक अफवा पसरविण्यात आल्या माझ्याबद्दल फेक नरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला मात्र हा सर्व डाव औशाच्या जनतेने उधळून लावला. विकासाच्या मुद्यावर लोकांनी मत दिले असल्याचे आ. अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

### शेतकऱ्यांची एक इंचही जमिन जाणार नाही...

काही दिवसांपूर्वी बुधोडा येथील काही शेतकऱ्यांना वक्फ बोर्डाची नोटीस आली होती,बुधवारी बुधोडा येथे आमदार अभिमन्यू पवार यांनी संबंधित शेतकऱ्यांसोबत बैठक घेऊन त्यांना आश्वासित केले. या बैठकीसाठी वक्फ बोर्डाचे चेअरमन आणि अधिकारी यांना बोलावून घेतले होते, सदरील जमीन ही शेतकऱ्यांच्या मालकीचीच आहे आणि आम्ही कोर्टातही तशीच भूमिका मांडू असा शब्द त्यांनी संबंधित शेतर्कयांना दिला आहे.तसेच आमदार अभिमन्यू पवार यांनी संबंधित शेतकऱ्यांशी संवाद साधत हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून शेतकऱ्यांनी काळजी करण्याची गरज नाही. शेतकऱ्यांची एक इंचही जमिन जाणार नाही असा विश्वास यावेळी बोलताना त्यांनी व्यक्त केला.

### १ जानेवारीपासून नवसपूर्ती पदयात्रा...

महाराष्ट्राच्या कल्याणासाठी ठाकरे सरकार जावे, आमचे सरकार यावे व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्हावे. म्हणून तुळजापूरची आई तुळजाभवानीच्या चरणी नवस केला होता. तो नवस पुर्ण झाला असून १ जानेवारी रोजी नवसपूर्ती पदयात्रा काढण्यात येत आहे. या औसा ते तुळजापूर अशी पायी निघणार असून या पदयात्रेचा पहिला मुक्काम आशीव येथे होणार आहे. तर दुसरा तुळजापूर तालुक्यात आशीव येथे रात्री नववर्षाची सुरुवात आध्यात्मिक कार्यक्रमाने व्हावी यासाठी जागरण गोंधळ, पोवाडा होणार आहे. या पदयात्रेत सहभागी व्हावे. आसे आवाहन आ. अभिमन्यू पवार यांनी केले आहे.

## मोहम्मद रफी यांना भारतरत्न मिळावा ही जनसामान्यांची भावना : माजी आमदार खंदाडे



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२५ डिसेंबर -**

विसाव्या शतकातील महान गायक स्वरसम्राट पद्मश्री मोहम्मद रफी साहेब यांच्या शंभराव्या जयंती निमित्त नामफलकाला पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करण्यात आले.

येथील साहित्य संगीत कला अकादमीच्या वतीने या अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी मतदार संघाचे माजी आमदार बब्रुवान खंदाडे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते गोपीनाथराव जोंधळे,माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे, माजी नगरसेवक शेषेराव ससाणे, इमरोजभाई पटवेगर, रिपाई नेते अरूणभाऊ वाघंबर, सामाजिक नेते अण्णाराव सूर्यवंशी, दयानंदराव वाघमारे, शेखूभाई शेख, सय्यद याखूबभाई, जकीभाई पिंजारी, गणीभाई पत्रे, शेख चांद सौदागर, शिला शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अकादमीचे अध्यक्ष युवक नेते डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी करून गेल्या बावीस वर्षापासून सूरू असलेल्या सांस्कृतिक चळवळीतील आढावा साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सचिन बानाटे,आकाश पवार, डॉ.बालाजी थिट्टे, माधव तिगोटे, प्रभाष कसादे, शिवाजीराव भालेराव, बालाजी वाघमारे, शेख जाबेर,अनिल वाघमारे, बालाजी वाघमारे, शेख कलिमभाई, शेख जहांगीर, दिनेश तिगोटे, डॉ. संजय वाघंबर, किरणकुमार कांबळे, चंद्रकांत कांबळे, शेख मतीनभाई आदींनी पुढाकार घेतला.

## उदगीर शहर भाजपच्या वतीने अटलबिहारी बाजपेयी यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२५ डिसेंबर -**

भारतीय जनता पक्षाचे दिवंगत नेते माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी बाजपेयी यांच्या जन्मशताब्दी दिनानिमित्त आज शहर भाजपच्या कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, सुधीर भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुपे, ॲड. सावन पस्तापुरे, रामेश्वर पवार, आनंद बुंदे साईनाथ चिमेगाव, यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी अटलबिहारी बाजपेयी यांच्या जयंती निमित्ताने शहर भाजपच्या वतीने काढण्यात आलेल्या वाजपेयी यांच्या चरित्रात्मक पत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी बोलताना माजी जि. प. अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी अटलबिहारी बाजपेयी यांनी संघर्षातून भारतीय जनता पक्षाची उभारणी केली आहे. त्यांच्या पंतप्रधान पदाच्या काळात केलेल्या अणूचाचणी मुळे भारताने जगात आपला दबदबा निर्माण केला. त्यांनी देशाच्या विकासाला नवी दिशा देणाऱ्या अनेक महत्वपूर्ण योजना राबवून देशाला प्रगतीपथावर नेण्याचे काम केले आहे. आजच्या भाजप कार्यकर्त्यांसाठी एक प्रेरणादायी ऊर्जा देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून अटलजींच्या नेतृत्वाकडे पाहिले जात असल्याचे मत राहुल केंद्रे यांनी व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. दत्ता पाटील यांनी केले. यावेळी चंद्र चकोर कारखाने, दिलीप मजगे, रामेश्वर चांडेश्वरी,आनंद साबणे, सुजित जीवने, मारोती कोटलवार, सुनील गुडमवार, मनोज धावडे, धोंडीराम मोरे, मारुती शिरनिवार, दीपक नागठाणे, संतोष बडगे, वेंकट काकरे, संजय पाटील,चेतन सूर्यवंशी, विजय पवार, रमेश गड्डमवार, रवी कसले, साई वाघमोडे, सरोजा वारकरे, श्यामला कारामुंगे, उषा माने, शिवकर्णा अंधारे, जया काबरा, मंदाकिनी जीवने, बबिता पांढरे, शिवगंगा बिरादार यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची राज्यस्तरीय विकसित भारत पीपीटी चॅलेंज स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२५ डिसेंबर -**

शिवाजी महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थिनी वैष्णवी श्रीकांत पाटील हिने भारत सरकारच्या युवक व क्रीडा मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय युवा महोत्सव विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२४ अंतर्गत घेण्यात येत असलेल्या स्पर्धेमध्ये पहिले दोन टप्पे अनुक्रमे प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा यशस्वीपणे पार केली असून तिची २६ डिसेंबर २०२४ रोजी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बालेवाडी पुणे येथे होत असलेल्या राज्यस्तरीय विकसित भारत पीपीटी चॅलेंज स्पर्धेसाठी निवड झालेली आहे.

त्याबद्दल शिवाजी महाविद्यालयाच्या वतीने तिचा यथोचित सत्कार करण्यात आला व तिला राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## जेवढे कष्ट जास्त तेवढे मोठे यश : जाधव



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ डिसेंबर -**

तालुक्यातील जेवरी येथील महाराष्ट्र विद्यालयात भारतीय थोर गणिततज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त २२ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय गणित दिवस म्हणुन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी जाधव एम.एम. यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरील उदगार काढले. शाळेत विद्यार्थ्यांनी गणित रांगोळी, गणितीय कोडी, गणितीय उखाणे, गणित प्रश्नमंजुषा व गणित कार्यशाळा या विविध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उस्फुर्त असा प्रतिसाद नोंदविला. विशेष गणित कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषद जेवरि शाळेचे प्राथमिक पदवीधर तथा सामाजिक कार्यकर्ते जाधव एम.एम. यांच्या हस्ते करण्यात आले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक नागेश तूबाकले उपस्थित होते.

विचारपिठावर प्रमुख पाहुणे कलशेट्टी पी.एस. उपस्थित होते. जाधव पुढे म्हणाले की यशाला शॉर्ट कट नसतो.जे जे शास्त्रज्ञ, गणित तज्ञ यांना कष्ट सोसावे लागले आहेत. या शाळेत विविध उपक्रम राबविले जातात याबद्दल विशेष अभिनंदन केले.

या कार्यशाळेस प्रशालेतील गणित शिक्षक देवसाळे, मोहोळकर, सपकाळे यांनी विद्यार्थ्यांस मार्गदर्शन केले. प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत उस्फुर्त सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रशालेतील सर्व शिक्षक तसेच जि.प. शाळेतील विद्यार्थी व शिक्षक तसेच प्रशालेतील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी भौमितिक रांगोळ्या व स्वतः गणितिय शैक्षणिक साहित्य निर्मिती केली. गणित अध्यापक मंडळामार्फत घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले.

सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे गणित शिक्षकांचे प्रशालेचे मुख्याध्यापक तसेच प्रमुख अतिथी यांनी मनापासून अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तसेच आभार शालेय विद्यार्थिनींनी मानले.

## सायकलिंग ग्रुप सदस्यांनी १२ तासात पूर्ण केले मैलारचे अंतर

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२५ डिसेंबर -**

अहमदपूर रनर्स व सायकलिंग ग्रुपचे सदस्य भरत इगे आणि सूर्या साकोळे यांनी अहमदपूर सायकलिंग ग्रुप च्या या सदस्यांनी HDOR हा १०० दिवस रोज सायकल चालविण्याचा करण्याचा संकल्प केला होता.



या अंतर्गत पहाटे ४:३० वाजता अहमदपूर येथून सुरुवात केली. उदगीर कमालनगर मार्गे १०:३० वाजता मैलार येथे पोहचले तेथे खंडोबा दर्शन घेऊन परत अहमदपूर येथे सायंकाळी ६ वा येत सदर अंतर १२ तासात पूर्ण केले. त्यांच्यासोबत १४ अन्य सदस्यांनी या मध्ये सहभाग नोंदवला होता. १०० दिवस सायकल प्रवास काय असतो याची माहिती श्री सूर्या साकोळे यांनी सर्वाना दिली ५ km पासून सुरुवात करून १०० व्या दिवशी २२१ km सायकलींग करण्याची कामगिरी केली. या स्पर्धेत नामदेव बरुरे, कृष्णा काळे, नवनाथ हांडे, लुल्ला शेख, धनंजय तोकले, संतोष पाटील, कपिल बिरादार, अभिजीत कराड, राहुल हिप्परगेकर, अजबसिंग, वेदांत राठोड व वय ६७ वर्ष राहूनही तरुणासोबत त्याच जोशाने सायकलिंग करणारे तम्मेवार यांनी सहभाग घेतला.

वेगवेगळ्या ५ स्टेज मधील या स्पर्धेत नवनाथ हांडे व कृष्णा काळे यांनी डायमंड मेडल, भरत इगे यांनी प्लॅटिनम मेडल तर बरुरे, साकोळे, तम्मेवार व अजबसिंग यांनी गोल्ड मेडल आणि इतर सदस्यांनी सिल्वर मेडल मिळविले.

## भाजपच्या कार्यकर्त्यांचा व पदाधिकाऱ्यांचा योग्य तो सन्मान करणार : माजी मंत्री आ. बनसोडे

### भाजप कार्यालयात आ. बनसोडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२५ डिसेंबर -**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीत महायुतीचा उमेदवार म्हणून मला निवडून आणण्यासाठी भाजपच्या नेते व कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले आहे. त्यांचे उपकार मी कधीही विसरू शकणार नाही. आगामी काळात भाजपच्या सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा आपण योग्य तो सन्मान करू अशी निःसंदिग्ध ग्वाही माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी दिली.

विधानसभा निवडणुकीत उदगीर मतदारसंघातुन महायुतीचे उमेदवार माजी मंत्री आ. संजय बनसोडे हे दुसऱ्यांदा ऐतिहासिक मतांनी निवडून आल्याबद्दल भारतीय जनता पक्षाच्या वतीने भाजपच्या शहर कार्यालयात माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, सुधीर भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, तालुकाध्यक्ष शिवशंकर धुपे, बापूराव यलमटे, विजय निटूरे, मनोहर भंडे, नंदकुमार नलंदवार, रामचंद्र मुक्कावार, ऍड. बस्वराज पाटील कोळखेडकर, ॲड. सावन पस्तापुरे, गणेश गायकवाड यांच्यासह भाजप पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांचा भाजपा महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आ. बनसोडे यांच्यावर पुष्पवृष्टी करून औक्षण करून उत्साहात स्वागत केले.

यावेळी बोलताना माजी मंत्री आ. बनसोडे म्हणाले की, मागच्या पाच वर्षात आपण मोठ्या प्रमाणात विकासकामे करून उदगीर मतदारसंघाचा कायापालट केला आहे.

आगामी काळातही आपणा सर्वांच्या सहकार्याने हा विकासाचा वेग आणखी वाढविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सांगून आ. बनसोडे यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघात विकासाची कामे करीत असताना कसलाही दुजाभाव न करणार नसल्याचे ते म्हणाले. विधानसभा निवडणुकीत भाजपच्या बुथप्रमुख, शक्तीप्रमुख, यांच्यासह प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वतःला उमेदवार समजून मला निवडून आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत याची मला जाणीव असून



या सर्वांना सोबत घेऊन महायुती बळकट करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आ. बनसोडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे यांनी भाजप कार्यकर्त्यांच्या आमदार महोदयाकडून असलेल्या अपेक्षा व्यक्त करून आगामी काळात महायुती आणखी भक्कम करण्यासाठी एकमेकांच्या हातात हात घालून काम करणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ॲड. दत्ताजी पाटील यांनी केले. यावेळी नगरसेवक लखन कांबळे, रामेश्वर पवार, आनंद बुंदे, अमोल अंक्कल्ले, उदय ठाकूर, सुजित जीवने, मारोती कोटलवार, भोसले, दीपक शिंदे, रवी कासले, अनिल मुदाळे, अमर सूर्यवंशी, अशोक वाकुडे, सुनील गुडमेवार, राहुल आपटे, चैतन सूर्यवंशी, केशव रंगवाड, अनिकेत गुडमेवार, विजय मामुलवार, शक्तिमान मद्देवार,सुशील आपटे, साई आपटे, विजय पवार, सरोजा वारकरे, श्यामला कारामुंगे, उषा माने, शिवकर्णा अंधारे, जया काबरा, मंदाकिनी जीवने, बबिता पांढरे, शिवगंगा बिरादार यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## विज्ञान प्रदर्शनात ऋतुजा कापसेचे नेत्र दीपक यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २४ डिसेंबर-**
शिक्षण विभाग, पंचायत समिती लातूर व राजगुरू विद्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने राजगुरू विद्यालय लातूर येथे ५२ वे तालुकास्तरीय दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनामध्ये येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील कु. ऋतुजा जगन्नाथ कापसे इ.६वी ते ८वी गटामध्ये सर्वप्रथम आली आहे. लातूर तालुक्यातून एकूण १६५ शाळांनी या प्रदर्शनात सहभाग नोंदवला होता.

या प्रदर्शनात कु. ऋतुजा कापसे हिने Li- Fi With Smart Village हा प्रयोग सादर केला. त्यात गावामध्ये अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा वापर करून ऊर्जा निर्मिती, सांडपाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेली घरे, प्रकाशाच्या माध्यमातून माहितीची देवाणघेवाण इत्यादी प्रयोग सादर करण्यात आले.

या प्रयोगामध्ये तिला कु.ऋतुजा कापसेने सादर केलेल्या प्रयोगाच्या कामात तिला कु.नवमी पांचाळ, कु. अमृता तुपे, कु.त्रिशा दत्तनगिरे, कु. श्रावणी जाधव,चि सुहास पेटकर चि. अथर्व गिराम व चि.अदनान शेख या विद्यार्थ्यांनी मदत केली. विज्ञान शिक्षक शरद पांचाळ यांनी मार्गदर्शन केले.

कु.ऋतुजा कापसे व तिला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रविण सरदेशमुख संजय गुरव विष्णु सोनवणे ,केशवराज विद्यालय शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर ,कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक अनंत कोपले, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक संदीप देशमुख, राजश्री कुलकर्णी, बबनराव गायकवाड,अंजली निर्मळे यांच्यासह इतर विद्यार्थी यांनी केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...

### हरंगुळ-पुणे रेल्वेला मुरुडला थांबा द्यावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
हरंगुळ-पुणे, पुणे-हरंगुळ या रेल्वे गाड्यांना मुरुड येथे थांबा देण्याची मागणी आमदार रमेश कराड व ग्रामपंचायत कार्यालय यांच्यातर्फे विभागीय रेल्वे व्यवस्थापक सोलापूर विभाग यांच्याकडे करण्यात आली आहे. धाराशिव व लातूर जिल्ह्यातील अनेकजण नोकरी, उद्योग, रोजगार, शिक्षणासाठी पुणे येथे रेल्वेने जातात. हरंगुळ रेल्वे स्थानकावरून सध्या पुणे-हरंगुळ ही सुपरफास्ट रेल्वे पुणेसाठी धावत आहे. परंतु, हरंगुळ ते धाराशिव या दोन रेल्वे स्थानकांदरम्यान या रेल्वे गाड्यांना कुठेही थांबा नाही. त्यामुळे थांबा देण्याची मागणी केली आहे.

### जागतिक ध्यान धारणा दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
नुकताच बिडवे अभियांत्रीकी महाविद्यालयामध्ये जागतिक ध्यान धारणा दिवस साजरा करण्यात आला. या निमित्त महाविद्यालयामध्ये ध्यान वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. योग शिक्षीका प्रा.सुवर्णा आर्य यांनी सर्व उपस्थितांना ध्यान धारणेबद्दल सखोल माहिती दिली. ध्यान धारणेचे शारीरिक आणि मानसिक फायदेही त्यांनी यावेळी विषद करून सांगितले. तसेच ध्यान धारणा प्रक्रिये बद्दल विस्तृत मार्गदर्शन करुन सर्व उपस्थितांकडुन प्रात्यक्षिक करून घेतले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुरेश हल्लाळी तसेच ईतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने या ध्यान वर्गात सहभाग नोंदवला.

### वाले स्कूलमध्ये ख्रिसमस उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
वाले इंग्लिश स्कूलमध्ये ख्रिसमस हा सण चिमुकल्यांनी आनंदात व उत्साहात साजरा केला. मुला मुलींनी वेगवेगळ्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. यावेळी शाळेचे प्राचार्य श्री. भोगडे सर यांनी विद्यार्थ्यांना ख्रिसमस व आपल्या जीवनातील येशू ख्रिस्तांच्या विचारांचे महत्त्व विशद केले. यावेळी विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. कार्यक्रमावेळी शाळेचे उपप्राचार्य श्री. बाकलीकर सर, पर्यवेक्षिका सौ. सावे मॅडम, व पर्यवेक्षिका सौ. भारती मॅडम उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### बहुजनांचा मुक्तिदाता ग्रंथाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
मुलांच्या जडणघडणीसाठी नैतिक शिक्षण देणारी ग्रंथसंपदा प्रत्येक शाळांमध्ये असायला हवी. विद्यार्थ्यांनी त्याचे वाचन करून चिंतन केले पाहिजे. यासाठी पालक, शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे सीईओ अनमोल सागर यांनी मंगळवारी अरोमा सभागृहात आयोजित सोहळ्यात केले.

याप्रसंगी लेखक दयानंद बिरादार लिखित बहुजनांचा मुक्तिदाता सानेगुरूजी ग्रंथाचे प्रकाशन झाले. गुणवंतीबेन ठक्कर सेवाभावी संस्थेच्या सहकार्याने संपन्न झालेल्या प्रकाशन सोहळ्यास सीईओ अनमोल सागर, कवी योगिराज माने, उद्योजक अजय ठक्कर, धर्मराज हल्लाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी सीईओ म्हणाले, नैतिक शिक्षण उत्तमरीत्या झाले तर समाजात वाईट गोष्टी घडणार नाहीत. असेच मूल्याधिष्ठित शिक्षण देणारा दयानंद बिरादार लिखित सानेगुरूजी ग्रंथ प्रत्येक शाळेत पोहोचला पाहिजे. प्रारंभी लेखक दयानंद बिरादार म्हणाले, मानवी शक्तीचा विकास झाला नाही तर ती गंजत जाते असे ते म्हणाले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

### लातूर येथे २६ रोजी पेन्शन अदालत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
जिल्हास्तरीय पेन्शनधारक, कुटुंब निवृत्तीधारक यांच्या अडचणीची सोडवणूक करण्यासाठी लातूर येथील शासकीय महिला तंत्रनिकेतन येथे २६ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे. या अदालतीमध्ये उपस्थित राहून आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी डॉ. उज्ज्वला पाटील यांनी केले आहे. महालेखापाल कार्यालय नागपूर व लातूर जिल्हा कोषागार कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ही पेन्शन अदालत होणार आहे. अदालतीमध्ये लातूर कोषागारमधून निवृत्ती स्वीकारलेल्या निवृत्ती वेतनधारकांच्या अडचणींचे निराकरण करण्यात येणार आहे. पेन्शनधारकांनी काही अडचणी असल्यास पुराव्यासह निवेदन द्यावेत, असे आवाहन संयोजनकांनी केले आहे.

## लातुरात मुख्याध्यापकांचे राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
अखिल महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त महामंडळ, पुणेच्यावतीने २८ व २९ डिसेंबर २०२४ रोजी लातुरात मुख्याध्यापकांच्या ६१ व्या राज्यस्तरीय शैक्षणिक संमेलनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती लातूर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा प्रदेश उपाध्यक्ष प्रकाश देशमुख यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.



औसा रोडवरील थोरमोटे लॉन्स येथे लोकनेते विलासराव देशमुखनगरीत पार पडणाऱ्या या दोन दिवसीय शैक्षणिक संमेलनाचे उद्घाटन २८ डिसेंबर रोजी सकाळी अकरा वाजता सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष पदाची जबाबदारी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून प्राचार्य बाबूराव जाधव तर कार्याध्यक्षपदी हनुमंत साखरे हे आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार डॉ. शिवाजी काळगे, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार अमित देशमुख, आमदार संभाजी पाटील -निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार सतीश चव्हाण, आमदार रमेश कराड, माजी आमदार धीरज देशमुख, लातूर विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सुधाकर तेलंग, विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपतराव मोरे, मुख्याध्यापक संयुक्त महामंडळाचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब आवारी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

शनिवारी दुपारच्या सत्रात ३ वाजता 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, 'आरसीसी'चे प्रा. शिवराज मोटेगावकर यांचे व्याख्यान तर दुपारी चार वाजता 'मुख्याध्यापक : कर्तव्य व जबाबदाऱ्या' या विषयावर व्याख्यान होणार आहे. सायंकाळी ५ वाजता 'अशैक्षणिक कामे आणि शैक्षणिक गुणवत्ता' या विषयावरील शोधनिबंध मराठवाडा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघ, हिंगोली हे सादर करणार आहेत. रात्री सात ते साडेआठ या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रम होतील.

२९ डिसेंबर रोजी सकाळच्या पहिल्या सत्रात आरटीई ॲक्ट २००९ अंमलबजावणीबाबत विदर्भ मुख्याध्यापक संघ शोध निबंध सादर करतील. सकाळी साडेदहा ते साडेअकरा या वेळेत व्याख्यान होणार आहे. सकाळी साडेअकरा वाजता 'लातूर पॅटर्न : एक दृष्टीक्षेप' या विषयावर प्रा. सतीश पवार यांचे व्याख्यान होईल. दुपारी बारा वाजता 'जीवन सुंदर आहे' या विषयावर सिनेअभिनेत्री निशिगंधा वाड यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारच्या सत्रात खासदार डॉ. काळगे, आमदार काळे यांचा सत्कार होणार आहे. त्यानंतर खुले अधिवेशन होणार असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

### प्राथमिक विभागात ६१ जणांना मिळाली पदोन्नती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर,दि. २५ डिसेंबर-**
जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने शिक्षक संवर्गातील पदोन्नतीची प्रक्रिया मंगळवारी जि.प.चे सीईओ अनमोल सागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यात सर्व पदोन्नत कर्मचाऱ्यांना समुपदेशनाने पदस्थापना देण्यात आली आहे. एकूण ६१ कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली असून, ११ जणांनी पदोन्नतीस नकार दिला आहे. अराजपत्रिक मुख्याध्यापक पदासाठी २ जणांनी पदोन्नती स्वीकारली असून, सहा जणांची शिक्षण विस्तार अधिकारी वरिष्ठ, १६ जणांची शिक्षण विस्तार अधिकारी कनिष्ठ, केंद्रप्रमुख पदासाठी १६, मुख्याध्यापक पदासाठी २१ जणांना पदोन्नती मिळाली आहे. तर अराजपत्रित मुख्याध्यापक १, शिक्षण विस्तार अधिकारी २अशांना पदोन्नती मिळाली आहे.

## फरार आरोपी अखेर जेरबंद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
शहरातील गंजगोलाई परिसरात दारूच्या नशेत किरकोळ भांडणातून मित्राचा खून करून फरार झालेल्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने महाराष्ट्र-कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागातून अटक केली आहे.



शहरातील गंजगोलाई परिसरात १० ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री सुलतान गफार कुरेशी (रा. शहावली मोहल्ला, लातूर) याने त्याचा मित्र पैगंबर हाजीमलंग सय्यद (वय २८, रा. अंजलीनगर, लातूर) याच्यासोबत झालेल्या किरकोळ भांडणातून तीक्ष्ण हत्याराने गळ्यावर वार करून खून केला होता. या प्रकरणी मयताच्या पत्नीच्या तक्रारीवरून गांधी चौक पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर आरोपी सुलतान हा फरार होता. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्त्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपी सुलतान कुरेशी याचा शोध घेत होते. पथकाकडून हैदराबाद, बिदर, सोलापूर, उदगीर, बीड येथे जाऊन आरोपीचा शोध घेतला. परंतु, सुलतान हा नातेवाईकांच्या संपर्कात नसल्याने त्याचा शोध घेण्यात अडचणी येत होत्या. दारूचे व्यसन असल्याने त्याला घरातून हाकलून देण्यात आले होते.

दरम्यान, आरोपी हा सोलापूर व कर्नाटक राज्याच्या सीमावर्ती भागात लपून बसल्याची माहिती मिळाली. पथकाने सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील एका छोट्याशा गावात सापळा लावून शिताफीने आरोपीला ताब्यात घेऊन गांधी चौक पोलिसांच्या स्वाधिन केले.

पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कऱ्हे हे करीत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्त्वात पोलीस अंमलदार रियाज सौदागर, मनोज खोसे, जमीर शेख, राजेश कंचे, सायबर सेलचे पोलीस अंमलदार गणेश साठे, संतोष देवडे यांनी ही सेवा बजावली.

## 'त्या'मारेकऱ्यांवर ३०२ चा गुन्हा दाखल करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
बहुचर्चित परभणी घटनेतील मयत सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळेच झाला असून त्याच्या शवविच्छेदन अहवालानुसार त्यांच्या मारेकऱ्यांवर ३०२ चा गुन्हा दाखल करावा. त्याचप्रमाणे लोकनेते विजय वाकोडे यांच्यावर खोटा गुन्हा दाखल केल्याच्या मानसिक तणावातून त्यांचा मृत्यू झाला आहे. वाकोडे यांच्या मृत्यूसही पोलीसच जबाबदार असल्याचा आरोप भारतीय दलित पँथरचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष संजय कांबळे यांनी मंगळवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केला.

संजय कांबळे पुढे म्हणाले की, सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्यानंतर विविध राजकीय पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या घरी जाऊन सांत्वन केले आहे. शवविच्छेदन अहवालात त्यांचा मृत्यू पोलिसांच्या मारहाणीमुळे झाल्याचा उल्लेख असतानाही अद्यापपर्यंत मारेकऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. तसेच गुन्हा दाखल करण्याबाबत कोणीही पुढाकार घेतलेला नाही. त्यांच्या अंत्यविधीच्या दिवशी आंबेडकरी समाजाची गुन्हा दाखल करण्याची संतापजनक मागणी होती.

परंतु संतापलेल्या समाजाला ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी शांत राहण्याचे आवाहन केल्यामुळे आंबेडकरी समाज शांत राहिला. ही संधी पोलिसांना मिळाल्याने त्यांनी चक्क सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू श्वसनाच्या आजारामुळे झाल्याचा अहवाल तयार करून मुख्यमंत्र्यांकडे पाठविला. तो अहवाल विधिमंडळात वाचून दाखवून मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करणार असल्याचे सांगितले आहे. या प्रकरणात विरोधी पक्ष, विविध राजकीय पक्षाचे नेते सांत्वनपर भेटी देऊन प्रकरणाचे राजकारण केले जात असल्याबद्दल कांबळे यांनी तीव्र शब्दात संताप व्यक्त केला.

सोमनाथ सूर्यवंशीचा मृत्यू पोलिसांच्या अमानुष मारहाणीमुळेच झाला असल्याने त्यांच्या मारेकऱ्यांवर तात्काळ ३०२ चा गुन्हा दाखल करावा आणि त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळवून द्यावा. तसेच लोकनेते विजय वाकोडे यांच्यावर सुद्धा पोलिसांनी दंगलीचा खोटा गुन्हा दाखल केल्याने त्या मानसिक तणावातच त्यांचा मृत्यू झाला असून त्यांच्या मृत्यूलाही पोलिसच जबाबदार आहेत. याबाबतही गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी आपली मागणी आहे. सध्या राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे गोरगरीब जनतेमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. दुसरीकडे राज्यातील अंबाजोगाई, नांदेड, पुणेसह ११ जिल्ह्यांमध्ये बनावट औषधांचा पुरवठा ठेकेदारांमार्फत झाला असून सदर बनावट औषधांमुळे किती रुग्णांवर प्रतिकूल परिणाम झाला आहे, याची भीती जनमानसात आहे. या प्रकरणाचीही सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणीही भारतीय दलित पँथरच्या वतीने करण्यात येत असल्याचे संजयभाऊ कांबळे यांनी सांगितले.

## संविधानप्रेमी नागरिक मंचचे धरणे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संसदेतील अवमान, मस्साजोग येथील क्रूर हत्याकांड आणि परभणी येथील मानवी हक्काची पायमल्ली याबाबत शासनाने कठोर कार्यवाही करावी, अशी मागणी करीत मंगळवारी संविधानप्रेमी नागरिक मंचच्यावतीने येथील महात्मा गांधी चौकात धरणे आंदोलन करण्यात आले.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संसदेत एकेरी उल्लेख करून अवमान करणारे गृहमंत्री अमित शहा यांना गृहमंत्री पदावरून बडतर्फ करावे. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्याकांडातील सर्व आरोपींना तत्काळ अटक करावी. सदर घटनेतील साक्षीदारांना संरक्षण द्यावे. तसेच कर्तव्यात कसूर केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहआरोपी करावे. सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण खून प्रकरणाचा खटला निः पक्षपातीपणे चालण्यासाठी खटला इतर जिल्ह्यात वर्ग करावा.

संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणातील आरोपींचे लागेबांधे मंत्री धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्याशी सकृत दर्शनी दिसत असल्याने या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत मंत्री मंडळातून बडतर्फ करावे. परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबास आर्थिक मदतीसोबत कुटुंबातील सदस्यास सरकारी नोकरी द्यावी. संविधानाच्या उद्देशिकीची तोडफोड करणाऱ्या समाज कंटकाविरुध्द कार्यवाही करावी. सोमनाथ सूर्यवंशी व इतर निष्पाप नागरिकांवर अमानूष लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांविरुध्द खून आणि मारहाणीबाबत गुन्हा दाखल करून दोषींना तत्काळ अटक करावी. तसेच नागरिकांच्या मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीची भरपाई शासनाने द्यावी. या मागण्यांची राष्ट्रपती, पंतप्रधान, राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांनी दखल घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनावर भाई ॲड. उदय गवारे, कॉ. संजय मोरे, उत्तरेश्वर बिराजदार, पांडुरंग देडे, दिलीप अरळीकर, ॲड. सुशील सोमवंशी, भाई सतीश देशमुख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या अध्यक्षपदी डॉ. कुंभार यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
पुणे येथील एस. पी. महाविद्यालया मध्ये २६ , २७ आणि २८ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये संपन्न होणाऱ्या महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषदेच्या चाळीसाव्या तीन दिवसीय संमेलना च्या अध्यक्षपदी येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांची निवड करण्यात आली आहे.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि वैचारिक साहित्याला वाहिलेल्या विचारशलाका या नियतकालिकाचे संपादनही प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार करतात. या संमेलनाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या शुभहस्ते होणार आहे. समारोप उपकुलगुरू प्रा डॉ पराग काळकर यांच्या हस्ते होणार आहे.

प्राचार्य डॉक्टर नागोराव कुंभार यांनी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य मागास वर्ग आयोग, महाराष्ट्र राज्य गॅजेटियर, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ आणि तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश समिती आदी ठिकाणी सदस्य म्हणून कार्य केलेले आहे. त्यांनी आठ ग्रंथाचे लेखन व ५० ग्रंथाचे संपादन केलेले आहे. आता पर्यंतचे त्यांचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकामध्ये २० पेक्षा जास्त शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. या निवडीबद्दल लातूर शहर व परिसरातून डॉ. नागोराव कुंभार यांचे अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रपतींनी अमित शहांचा राजीनामा घ्यावा

### आ.अमित देशमुख यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत संसदेत संतापजनक वक्तव्य केले. त्यांच्या वक्तव्याचा देशभरातून निषेध होत आहे. अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे, परंतु, केंद्र सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत असून आता राष्ट्रपतींनीच या प्रकरणात हस्तक्षेप करुन अमित शहा यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी आ. अमित देशमुख यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केली.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबतीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ दि. २४ डिसेंबर २४ रोजी काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी मंत्री आमदार अमित देशमुख व खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या नेतृत्वात दुचाकी रॅली काढून जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घूगे यांना निवेदन देण्यात आले.

त्याप्रसंगी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना माजी मंत्री आमदार अमित देशमुख बोलत होते, येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून दुचाकी रॅलीस सुरुवात झाली. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या अभिवादन केले.नंतर दुचाकी रॅली मेन रोडने लोकमान्य टिळक चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, दयानंद गेट, संविधान चौक, एक नंबर चौक, पाच नंबर चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर पोचली. तेथे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर-घुगे यांना केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी राजीनामा द्यावा, या मागणीचे निवेदन दिले.

या दुचाकी रॅलीत माजी आमदार वैजनाथराव शिंदे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड़ किरण जाधव, काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष ॲड़ बाबासाहेब गायकवाड, अल्पसंख्यांक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड़ फारुक शेख, माजी महापौर ॲड़ दीपक सुळ, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, प्रविण सूर्यवंशी, दगडुअप्पा मिटकरी, ॲड़ देविदास बोरुळे-पाटील, समद पटेल, अहेमदखॉ पठाण, नामदेव इगे, युनूस मोमीन, मारोती पांडे, संजय ओव्हळ, इम्रान सय्यद, व्यंकटेश पुरी, अतिष चिकटे, राजू गवळी, ॲड़ गोपाळ बुरबुरे, सचिन बंडापल्ले, यशपाल कांबळे, विद्याताई पाटील, लक्ष्मीताई बटनपूरकर, सुभाष घोडके,नागसेन कामेगावकर, पप्पू देशमुख, रविशंकर जाधव, धोंडीराम यादव, विजयकुमार साबदे, जालिंदर बरडे, कुणाल वागज, फारुक शेख, पवन गायकवाड, असलम शेख, सिराज शेख, आसिफ बागवान, अजिज बागवान आदी सहभागी झाले होते.

## मांजरा परिवारातील कारखाने ३ हजार दर देणारः देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ डिसेंबर-**
मांजरा परिवारातील साखर कारखान्यांनी सातत्याने शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले असुन साखर उद्योगात. सक्षम व यशस्वी साखर कारखाने म्हणून मांजरा परिवारातील साखर कारखान्यांची देशभरात ओळख आहे. चालु २०२४-२५ मध्ये गाळप झालेल्या ऊसाला मांजरा परिवारातील कारखान्याकडून किमान दर प्रति टन ३,००० (तीन हजार रुपये) देणार असल्याची माहिती मांजरा परिवाराचे मार्गदर्शक, माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी मांजरा कारखाना येथे साखर पोते पूजन प्रसंगी मंगळवारी येथे बोलताना दिली आहे. त्यामुळें लातूर, रेणापूर तालुक्यांतील उस उत्पादक शेतकऱ्यांना अधिक भाव मिळणार आहे .

मांजरा साखर कारखान्यातील साखर कारखान्यांनी चालू गळीत हंगामात २०२४-२५ साठी गाळप झालेल्या ऊसाला पहिली उचल २७००/- (दोन हजार सातशे रु.) दिलेले आहे. चालू वर्षी उत्तम पाऊस असल्याने साखर उतारा चांगला प्राप्त होत आहे. त्यामुळे निश्चितच ऊसदर हा किमान३००० /-रुप ये असणार असुन हंगाम समाप्ती नंतर जर ३००० /- पेक्षा अधिक दर निघत असेल तर तो देखील दिला जाईल असे दिलीपराव देशमुख यांनी सांगीतले. मांजरा कारखान्याच्या २,२२,२२२ उत्पादित साखर पोत्यांचे पुजन यावेळी विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील उत्पादित २,२२,२२२ व्या (५० कि.) साखर पोत्याचे पुजन दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.